म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय : नाटक
दा. क्र. : ११९२५

११९२५

IRBK-0119925
IRBK-0119925

1 MAY 2001
18 JUN 2001
14 NOV 2001
20 DEC 2001
06 MAR 2002
2 JUN 2002

नाटक
९९९२५
घ१०८३

# वाहतों ही दुर्वांची जुडी

[ स्वतंत्र सामाजिक कौटुंबिक नाटक ]

बाळ कोल्हटकर

बारा रुपये

IRBK-0119925
IRBK-0119925

जोशी ब्रदर्स बुक सेलर्स ॲण्ड पब्लिशर्स
अप्पा बळवंत चौक, पुणें २

आठव्या आवृत्तीच्या प्रकाशनाव्यतिरिक्त सर्व हक्क स्वाधीन.

—बाळ कोल्हटकर

प्रमाणपत्राचा क्रमांक डी.आर.एम्. ४७३/६४, दि. ३० जून १९६४

□ □ □

तूर्त या नाटकाच्या प्रयोगाची कुणालाहि परवानगी देतां येत नाहीं, क्षमस्व ! पण...

या नाटकाच्या प्रयोगाची **परवानगी द्यायला मी जेव्हां सुरुवात करीन त्या वेळीं** परवानगी मागणारांनीं १०—०० रु. पुण्याच्या 'रेफरमेटरी स्कूल'ला मदत देऊन ती पावती मला पाठवून मगच परवानगी घ्यावी. अर्थात् आवश्यक तें मानधन देऊन !
या नाटकाच्या प्रयोगाचे सर्व हक्क सौ. शीला कोल्हटकर, २१बी/१३८१ आदर्श नगर, वरळी, मुंबई २५ यांच्या स्वाधीन आहेत.

—बाळ कोल्हटकर

आवृत्ती आठवी : १९८२

---

प्रकाशक : केशव वामन जोशी, □ २५ बुधवार पेठ, □ अप्पा बळवंत चौक, □ पुणें २.

मु द्र क : शशिकान्त महादेव देव, □ सुलभ मुद्रणालय, □ २९१ शनिवार पेठ, □ पुणें ३०.



# आमच्या दिवंगत नेत्याला

## ही आमची श्रद्धांजलि

ज्या दिवशीं पहांटेच सूर्य मावळला
विश्वशांतीचा संदेश घेऊन
उडून गेलेलं कबूतर, पुन्हां धरतीवर
उतरलंच नाहीं !

असंख्य येतिल, अनंत जातिल
वेद आपुला शब्द बदलातिलं
परंतु असलें शुभ्र कबूतर
पुन्हां भारतीं कधीं न येइल ॥ १ ॥

असंख्य वर्ण अनंत जाती
गुलाब फुलातिल खंडोगणंती
परी पांढऱ्या कोटावरचा–
गुलाब हंसरा, सभासभांतुन
केव्हां येइल ? ॥ २ ॥

—बाळ कोल्हटकर

## शुभेच्छा !

श्री. बाळ कोल्हटकर हे मराठी रंगभूमीवर गेली दोन तपे यशस्वीपणे वावरत आहेत. त्यांच्या ' दुर्वांची जुडी ' या नाटकाचे आता जवळजवळ हजार प्रयोग होत आले आहेत. या नाटकाच्या पुस्तकाची सातवी आवृत्ती निघत आहे यावरून या नाटकाने किती लोकप्रियता संपादन केली आहे हे कुणालाही सहज कळू शकेल.

व्यावसायिक रंगभूमीवरील लोकप्रिय नाटकांचा एक निराळा वर्ग केला पाहिजे. कलेच्या किंवा प्रयोगशीलतेच्या दृष्टीने त्यांची चिकित्सा करण्यापेक्षा जनमनाचे रंजन व उद्‌बोधन ही नाटके किती प्रमाणात करतात यावरच त्यांची लोकप्रियता अवलंबून असते. या विशिष्ट दृष्टीने ' दुर्वांची जुडी ' हे नाटक अत्यंत यशस्वी ठरलं आहे. त्याच्या आवाहनाच्या मुळाशी भारतीय संस्कृतीला अभिप्रेत असलेल्या संस्कारांचा पुरस्कार ही गोष्ट आहे.

या नाटकाच्या यशाचे मला कौतुक वाटते. श्री. बाळ कोल्हटकर यांना रंगभूमीवर यशस्वीपणे संचार करायला सतत स्फूर्ती मिळो असे मी या प्रसंगी मनःपूर्वक इच्छितो.

कोल्हापूर–१
२५-१०-७५

वि. स. खांडेकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १९९२५ नों. दि. ६।१२।८३
वि. नाटक ... क्र. ..................

"जय देवी श्री सरस्वती"

# गुडीचं निवेदन

मराठी रंगभूमीचा राजहंस नीरक्षीर विवेकासाठीं स्वर्गीच्या गंधर्व नगरींत पोंचतो न पोंचतो तोंच दुसरा धक्का म्हणजे, माझे या नाटकाचे सहकारी सूत्रधार कै. नटश्रेष्ठ बाबूराव पेंढारकर यांच्या स्मृतींनीं काजळकांठ ओले झाल्याविना ही प्रस्तावना पुरीच होऊं शकत नाहीं. 'कै. बाबूरावांनीं आम्हांला फसवलं. आरोपी जामीन चुकवून पळाला!' पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना लिहिली त्या वेळीं आणखी बत्तीस वर्षांचं आयुर्दाय आपल्या संग्रहीं असल्याचं त्यांनीं सांगितलं होतं. साक्षीदार कु. आशा काळे. पण ३२ मधला पुढचा २ चा आकडा नियतीनं पुसून टाकला आणि ३ च वर्षांत एक कणखर– प्रेमळ सहकारी व्यक्तित्व सर्व आयुष्य हंसतमुखानं जीवनाशीं सहज टक्कर देत जगलं– तितक्याच प्रेमानं मृत्यूला सहज सामोरं जाऊन– चिरंजीव झालं!

'पपा', तुमच्या सहवासांत अनेक अमोल क्षण मीं अनुभवले. आतां राहिल्या फक्त आठवणी– आणि आठवणीगणिक ओघळणारे आमचे अश्रू हीच आमची श्रद्धांजलि!

# प्रस्तावना

ज्या नाटकाचे शेंकडो प्रयोग आत्तांपर्यंत मराठी रंगभूमीवर झाले आहेत त्याच्या पांचव्या आवृत्तीला प्रस्तावना लिहिण्याची कांहीं गरज आहे असें वाटत नाहीं ! कारण त्या नाटकाची नि प्रेक्षकांचीं अन् वाचकांची एवढी जान-पछान आहे कीं, त्याबद्दल त्यांना आणखी कांहीं तरी नवीन सांगण्याचा प्रयत्न करणें हास्यास्पद होणार आहे ! 'नाटक' हें प्रयोगासाठीं असतें आणि त्याचें यशहि प्रयोगांत असतें; त्याचीं पुस्तकें खपणें हा त्याच्या यशाचा दुय्यम भाग आहे.

अलीकडच्या काळांत 'दुर्वांच्या जुडी' इतकें यश क्वचितच दुसऱ्या एखाद्या मराठी नाटकाला लाभलें असेल. मराठी मनाची पकड घेण्याचें विलक्षण सामर्थ्य या नाटकांत आहे. मध्यमवर्गीय पांढरपेशा घरांतली ही एक अत्यंत हृदय-द्रावक कहाणी आतिशय घरगुती घटनेंत आणि भाषेंत मोठ्या नाट्यपूर्ण पद्धतीनें लेखकानें सांगितलेली आहे ! प्रत्येक पात्र आपल्या इतकें परिचयाचें वाटतें कीं, तें कुठें ना कुठें तरी आपण पाहिलें आहे असाच एकसारखा भास होत असतो ! एवढें असूनहि त्या त्या पात्राचें वैशिष्ट्य अगदीं ठळक शब्दांत लेखकानें चितारून नाटकाच्या मनोरंजकतेंत आणि आकर्षकतेंत चैतन्य निर्माण केलें आहे ! या नाटकाचा नायक सुभाष हा गुन्हेगारप्रवृत्तीचा असूनहि प्रेक्षकांची सर्व सहानुभूति तोच खेचून बसतो. त्याच्या रूपानें शिक्षणांतली एक महत्त्वाची समस्या नाटककारानें समाजांतील विचारवंतांपुढें मांडलेली आहे ! मुलाच्या मूळच्या प्रवृत्ति कितीहि चांगल्या असल्या आणि घरांतलें वातावरण कितीहि सोज्ज्वळ असलें तरी त्याच्या आयुष्याची बरीवाईट घडण बाहेरच्या जगांतील संस्कारांनीं होते. म्हणून जगांत प्रवृत्तीपेक्षां संगतीला जास्त महत्त्व आहे. आपण चुकतों आहोंत याची जाणीव सुभाषला एकसारखी होत असते; पश्चात्तापानें त्याचें अंतःकरण प्रतिक्षणीं जळत असतें. पण जीवनांत एकदां

माणसाचा पाय घसरला म्हणजे त्याला आपला तोल पुन्हां सावरणें किती कठीण असतें याची अत्यंत हृदयस्पर्शी धडपड सुभाषच्या जीवनांत प्रेक्षकांना पहावयाला व अनुभवायला मिळते. त्यामुळें आरंभापासून अखेरपर्यंत हें नाटक कारुण्यरसानें ओथंबलेलें आहे. सुभाषची ताई तर या नाटकांतल्या कारुण्याची पुष्करिणीच होय. भावाच्या कल्याणासाठीं ती आपल्या सुख-सर्वस्वाची आहुति देण्यासाठीं सिद्ध होते. मूळ कथाभागाच्या भावना-प्रक्षोभांत भर घालील अशाच तऱ्हेच्या पात्रांची सभोंवार योजना झाल्यामुळें यशस्वी नाटकाला आवश्यक असलेला रसपरिपोष एकसारखा खळाळत नि उचंबळत राहतो, हेंच या नाटकाच्या यशाचें बीज आहे. विषय आणि पात्रें यांच्याइतकेंच नाटकामध्यें संवादांना महत्त्व आहे. ह्या नाटकाची भाषा कमालीची प्रासादिक आणि प्रभावी आहे. जवळजवळ प्रत्येक वाक्य म्हणजे एक सुभाषित आहे. भावना, जिव्हाळा आणि प्रेमळपणा यांचा विलक्षण समन्वय पदोपदीं संवादांत झालेला आढळतो. आणि त्या संवादांना मनाला मंत्रमुग्ध करणाऱ्या जिवंत काव्याची आणखीनच जोड मिळालेली आहे. सारांश, प्रयोग आणि वाङ्मय या दोन्ही कसोट्यांच्या कसाला शंभर टक्के हें नाटक उतरलें असल्यानें, तें प्रेक्षकांच्या चित्तवृत्ति शेवटपर्यंत खेंचून धरूं शकतें. मध्यमवर्गीतील एवढी महत्त्वाची शैक्षणिक आणि सांसारिक समस्या एवढ्या कलात्मक आणि नाट्यपूर्ण रीतीनें महाराष्ट्रापुढें मांडण्यांत श्री. बाळ कोल्हटकर यांनीं जें अपूर्व यश मिळविलें आहे, त्याबद्दल त्यांना आशीर्वाद नि धन्यवाद ! विद्यमान काळीं मराठी रंगभूमीचें भूषण ठरलेलें हें त्यांचें नाटक मराठी नाट्याचें चिरंतन भूषण होईल याविषयीं माझ्या मनांत तिळमात्र शंका नाहीं !

शिवशक्ति

५-३-१९६८

**प्रल्हाद केशव अत्रे**

रसिकहो !

ही एका सभ्य घरांतल्या बहीण-भाऊ-वडिलांची गोष्ट आहे! भाऊ हा गुन्हेगार प्रवृत्तीचा व वृत्तीचा कवि असून बहीण ही त्याला पाठीशीं घालणारी आहे; वडील... असूं दे ! तुम्ही म्हणाल ही प्रस्तावना वाचण्यापेक्षां नाटक वाचलेलं काय वाईट ? खरं आहे ! आणि खरं नाहींहि ! नाटक वाचण्यापेक्षां पहा ! बरं वाटलं तर मोकळेपणानं मान्य करा ! रसिक असलांत तर टीकाकारहि व्हा ! छिद्रान्वेषी असाल तर छिद्रं फार म्हणून टाकून द्या ! नसाल तर विणलेलं जाळं चांगलं आहे म्हणा ! तें आपल्या सहृदयतेवर वा निर्दयतेवर अवलंबून ! 'सीमेवरून परत जा !' या नाटकापाठोपाठ एक वर्षाच्या आंत हें दुसरं नाटक मीं लिहिलं आहे ! हें चुकून झालं ! नाहीं तर कमींत कमी तीन वर्षं एक नाटक लिहायला मला वेळ लागतो ! थोडा कमी बुद्धीचा परिणाम ! कळतच नाहीं ! कुठं काय बोलावं, कसं लिहावं. किती लिहावं ! काय करतां, तारतम्य नाहीं ! माफ करा ! "अपराध मीं केला शिक्षा तुमच्या कपाळीं !' या अपराधांतले माझे भागीदार सांगतों, म्हणजे बरीवाईट शिक्षा मला एकट्याला सोसावी लागणार नाहीं ! माझे पहिले साथीदार ज्येष्ठ नटवर्य बाबूराव पेंढारकर ! माझी कांहीं चूक नाहीं हो ! हें नाटक त्यांनीं मला लिहायला लावलं ! गोडीगोडीनं काम करून घेण्यांत प्रवीण ! हें नाटक मी केव्हां लिहायला लागलों तें मला कळलं नाहीं... लिहून केव्हां पुरं झालं तें समजेपर्यंत ! जबाबदार बाबूराव ! धरा त्यांना, आणि शतायुषी होईपर्यंत सोडूं नका ! अडुसष्ट वर्षांचा वृद्ध तरुण पन्नाशी उलटल्यानंतर उलट्या चालीनं ३२ वर्षांचा झाला आहे. पुन्हा पहिल्या वर्षाचा होईपर्यंत त्यांनीं वाट चालावी. बाळची इच्छा आहे, त्यांनीं माझ्याएवढं व्हावं ज्या वेळीं मी त्यांच्याएवढा असेन ! वयानं ! अपराधी नंबर दोन वसंत शांताराम देसाई ! न्यायखात्याशीं अत्यंत घनिष्ठ संबंध असलेल्या

या माणसानं माझ्यावर मात्र अतोनात अन्याय केला ! त्यांनीं चुका काढल्या आमच्या पहिल्या वाचनांतच ! मीं त्या सुधारल्या नसत्या तर हा अपराध घडलाच नसता– नाटक रंगभूमीवर आणण्याचा ! आप जिम्मेदार हैं ! मैं नहीं ! तिसरे श्री. हरिभाऊ मोटे आणि सौ. कृष्णाबाई मोटे ! उगीच चढवतात मला ? चांगलं लिहिलंय म्हणतात, रडतात, हंसतात; वाचतांना मला वाटतं आपलं हें नाटक छान होणार, आणि मी लिहीत जातों ! संवय त्यांची; चूक माझी नाहीं ! या वेळीं मला आणखीन दोन माणसं भेटलीं कोल्हापूरचीं. एक रावसाहेब या टोपणनांवानं ओळखले जाणारे श्री. काळे आणि त्यांच्या अर्धांगिनी सौ. विमलाबाई काळे. त्यांनीं दाखविलेल्या आशा आणि दिलेला उत्साह त्यांना अपराधाच्या जबाबदारींतून मुक्त करू शकत नाहीं ! यानंतरचा चोर पुण्याच्या ' पूना गेस्ट हाउस ' चा तरुण संचालक चारुदत्त सरपोतदार. अहो, यानं मला स्वतंत्र खोली दिलीन् म्हणजे लॉजमध्येंच ! पण मध्यें मध्यें नाटक ऐकलंन् आणि प्रयोग चांगला झाला पाहिजे म्हणून मला दम देत आला ! आतां नाटक चांगलं लिहिलं गेलंय असं मला वाटलं. चूक कुणाची ? माझी ? आपण नाहीं मान्य करणार !

पेंटर फडके आणि जोशी ब्रदर्स, बुकसेलर्स यांचीं दुकानं समोरासमोर अप्पा बळवंत चौकांत ! एक...नवीन नाटकं रंगभूमीवर यावींत, चालावींत म्हणून धडपडणारे, आणि दुसरे...नाटक बघितलं कीं साक्षी–पुराव्यानिशीं लेखकाला पकडून पुस्तकांत छापणारे ! वेळ आली तर त्या दोघांनाहि मी साक्षीला बोलावीन ! आणखी राहिले केळकर. चित्रशाळेचे श्री. केळकर ! त्यांनीं या नाटकाचे सेटस् केले ! कल्पना माझी, पण सेट्स् त्यांचे ! बरे सांपडले !

हो ! एक गृहस्थ राहिलेच. असला सज्जन आणि सात्त्विक माणूस या प्रकरणांत सांपडावा हें आश्चर्य नव्हे; हा त्यांचा उद्योगच ! सुरुवातीचा अर्धा अंक ऐकल्यावर भरल्या डोळ्यांनीं आणि गहिंवरल्या कंठानं मला म्हणाले...

‘ लवकर पुरं करा नाटक ! ’ आणि मीं केलं हो पुरं ! चूक झाली ! पण कारण पंडित महादेवशास्त्री जोशी !

असो, इतक्यांच्या अपराधांचा पाढा मीं वाचला. मी आतां आभार मानून टाकतों एकरकमी; म्हणजे चुकून चांगलं झालं नाटक तर त्यांनीं मला दोष द्यायला नको !

दादरच्या ‘ रेक्स फोटो स्टुडिओ ’चे वृद्ध चालक श्री. राजाध्यक्ष यांनीं एका रात्रींत फोटो काढून पुस्तकांत घालण्यासाठीं माझ्या हातीं दिले ! त्यांचा या वयांतला उत्साह अवर्णनीय आहे !

झालं माझं काम– आतां तुम्ही रसिक आणि हें नाटक ! तुमच्या हातीं दिलंय, सांभाळून घ्या. पित्याचं काम झालंय, आतां मुलाचं काम करण्यासाठीं रंगपटाकडे वळतों; आणि त्यापूर्वीं बरीवाईट बुद्धि देणाऱ्या...

गजाननाच्या चरणीं... —वाहतों ही दुर्वांची जुडी !

—बाळ कोल्हटकर

## पांचव्या आवृत्तीच्या निमित्तानें

‘ वाहतों ही दुर्वांची जुडी ’ या नाटकाचे वाचक, प्रेक्षक आणि समीक्षक हो !

आचार्य प्र. के. अत्रे, यांनीं प्रस्तावना लिहून द्यायचं कबूल केलं हीच माझी पांचव्या आवृत्तीची प्रस्तावना.

आमचे कांहीं गैरसमज होते, असा गैरसमज बाहेर पसरलेला ऐकतों ! खरं सांगायचं तर समजच कांहीं नव्हता ! इतका मी लहान ! वयाच्या नात्यानं-सुद्धां ते ‘ वडील ’, ‘ नाटककार ’ मी– ‘ बाळ ’ कोल्हटकर !

कुठल्याहि लोभानं व प्रलोभनानं ही प्रस्तावना केलेली नाहीं, हे विज्ञापना.

—बाळ कोल्हटकर

या नाटकाचा पहिला प्रयोग मराठी रंगभूमीच्या जन्म-गांवीं– सांगली येथें **भावे नाट्य–मंदिरांत** १९ जून १९६४ रोजीं रात्रीं ९॥ वाजतां श्री. **भालचंद्र पेंढारकर** यांचे अध्यक्षतेखालीं **नाट्य–मंदार** या संस्थेनें सादर केला.

**प्रवेशानुक्रमें पात्र-परिचय**

| | |
|---|---|
| ताई | कु. आशा काळे |
| बाबा | श्री. जोगळेकर |
| रंगराव | श्री. शंतनुकुमार राणे |
| बाळू आपटे | श्री. गणेश सोळंकी |
| सुभाष | श्री. बाळ कोल्हटकर |
| पठाण | श्री. कदम |
| शारदाबाई गोखले | सौ. तारा दीक्षित |
| अविनाश गोखले | काका केणी |
| पो. इन्स्पेक्टर | ? |
| पोलिस | दुदवडकर<br>टिपणीस |
| पोस्टमन | अनंत मिराशी |

नेपथ्य : केळकर चित्रशाळा, पुणें २.

फोटो : राजाध्यक्ष, रेक्स फोटो स्टुडिओ, मुंबई

लेखक, दिग्दर्शक, संगीत-दिग्दर्शक

**बाळ कोल्हटकर**

सूत्रधार

**बाळ कोल्हटकर**

‘ लवकर पुरं करा नाटक ! ’ आणि मीं केलं हो पुरं ! चूक झाली ! पण कारण पंडित महादेवशास्त्री जोशी !

असो, इतक्यांच्या अपराधांचा पाढा मीं वाचला. मी आतां आभार मानून टाकतों एकरकमी; म्हणजे चुकून चांगलं झालं नाटक तर त्यांनीं मला दोष द्यायला नको !

दादरच्या ‘ रेक्स फोटो स्टुडिओ ’चे वृद्ध चालक श्री. राजाध्यक्ष यांनीं एका रात्रींत फोटो काढून पुस्तकांत घालण्यासाठीं माझ्या हातीं दिले ! त्यांचा या वयांतला उत्साह अवर्णनीय आहे !

झालं माझं काम— आतां तुम्ही रसिक आणि हें नाटक ! तुमच्या हातीं दिलंय, सांभाळून घ्या. पित्याचं काम झालंय, आतां मुलाचं काम करण्यासाठीं रंगपटाकडे वळतों; आणि त्यापूर्वीं बरीवाईट बुद्धि देणाऱ्या...

गजाननाच्या चरणीं... —वाहतों ही दुर्वांची जुडी !

—बाळ कोल्हटकर

## पांचव्या आवृत्तीच्या निमित्तानें

‘ वाहतों ही दुर्वांची जुडी ’ या नाटकाचे वाचक, प्रेक्षक आणि समीक्षक हो !

आचार्य प्र. के. अत्रे, यांनीं प्रस्तावना लिहून द्यायचं कबूल केलं हीच माझी पांचव्या आवृत्तीची प्रस्तावना.

आमचे कांहीं गैरसमज होते, असा गैरसमज बाहेर पसरलेला ऐकतों ! खरं सांगायचं तर समजच कांहीं नव्हता ! इतका मी लहान ! वयाच्या नात्यानं-सुद्धां ते ‘ वडील ’, ‘ नाटककार ’ मी— ‘ बाळ ’ कोल्हटकर !

कुठल्याहि लोभानं व प्रलोभनानं ही प्रस्तावना केलेली नाहीं, हे विज्ञापना.

—बाळ कोल्हटकर

या नाटकाचा पहिला प्रयोग मराठी रंगभूमीच्या जन्म-गांवीं— सांगली येथें **भावे नाट्य–मंदिरां**त १९ जून १९६४ रोजीं रात्रीं ९॥ वाजतां श्री. **भालचंद्र पेंढारकर** यांचे अध्यक्षतेखालीं **नाट्य–मंदार** या संस्थेनें सादर केला.

**प्रवेशानुक्रमें पात्र-परिचय**

| | |
|---|---|
| ताई | कु. आशा काळे |
| बाबा | श्री. जोगळेकर |
| रंगराव | श्री. शंतनुकुमार राणे |
| बाळू आपटे | श्री. गणेश सोळंकी |
| सुभाष | श्री. बाळ कोल्हटकर |
| पठाण | श्री. कदम |
| शारदाबाई गोखले | सौ. तारा दीक्षित |
| अविनाश गोखले | काका केणी |
| पो. इन्स्पेक्टर | ? |
| पोलिस | दुदवडकर<br>टिपणीस |
| पोस्टमन | अनंत मिराशी |

नेपथ्य : केळकर चित्रशाळा, पुणें २.

फोटो : राजाध्यक्ष, रेक्स फोटो स्टुडिओ, मुंबई

लेखक, दिग्दर्शक, संगीत-दिग्दर्शक

**बाळ कोल्हटकर**

सूत्रधार

**बाळ कोल्हटकर**

“ जय देवी श्री सरस्वती ”

# वाहतों ही दुर्वांची जुडी

## अंक पहिला

[ पडदा उघडल्याबरोबर समोर एका लहान चौकोनी खिडकीवर गणपतीचं चित्र दिसतं. तें नाहींसं होऊन चार-पांच गजांची एक खिडकी आणि त्यापलीकडे हात जोडून उभा असलेला सुभाष दिसतो. त्या खिडकीच्या पुढें पण जमिनीवर ५-६ पणत्या ठेवलेलें ताट दिसतें. त्या पणत्यांच्या प्रकाशामुळे. बाकी सर्वत्र अंधार आहे. ]

त्या अंधारांतच—

**सुभाष :** गजाननाला वंदन करुनी,
सरस्वतीचें स्तवन करोनी,
मंगल शिवपद मनीं स्मरोनी;
सद्भावानें मुदित मनानें,
अष्टांगांची करुनि ओंजळ,
वाहतों ही दुर्वांची जुडी ॥ १ ॥
बालपणींचे दिवस सुखाचे,
आठवतों घडोघडी
आठवणींना, आठवणींची
वाहतों ही दुर्वांची जुडी ॥ २ ॥
आठवणींचे सखे सोबती,
आठवणींना अजुनि झोंबती,
कांहीं सज्जन कोणी दुर्जन,
तरुण कोणी कुणी वृद्ध पण;
या सर्वांनीं विविध गुणांनीं,
जशी घडवली, तशीच घडली,
आयुष्याची घडी
वाहतों ही दुर्वांची जुडी ॥ ३ ॥

[ हे संपल्यावर पुन्हां गणपति दिसूं लागतो, आणि हळूहळू अंगणाची एक आडवी भिंत दिसते. डाव्या हाताला एक आडवं लाकडी फाटक दिसतं, त्या फाटकांतून रस्त्यापलिकडे एक पार. पारावर मारुतीचं बैठं देऊळ; त्यावर एक वडाचं झाडं, त्यामागं शंकराच्या देवळाचा कळस दिसतो. अंगणाच्या मध्यावर एक तुळशीवृंदावन दिसतं. त्याच्यापुढें असलेल्या ताटांतच पणत्या ठेवलेल्या आहेत. उजव्या-डाव्या हाताला उंच भिंती आहेत. उजव्या भिंतीला एक दरवाजा आहे, स्वयंपाकघरांत जाण्याचा. त्या दरवाजावर एक माडीची खिडकी आहे, त्या खिडकींतून बाहेर आलेल्या काठीला एक आकाशदिवा टांगलेला आहे. त्याच्या बरोबर खालीं एक खाट टाकलेली आहे. त्या खाटेवर पांघरूण घेऊन कोणसं झोपलेलं दिसतं आहे. समोर फाटकाबाहेरची रांगोळी पुरी करून एक मुलगी तुळशीपुढं येत असतांना आंतून फटाकड्यांचे आवाज ऐकूं येतात. लांब-- देवळाच्या घंटा, आणि एकतारीच्या सुरावर चाललेलं भजन ऐकूं येत असतं—

**उठा उठा हो सकळिक**
**वाचे स्मरावा गजमुख**
**ऋद्धिसिद्धीचा नायक**
**सुखदायक सर्वांसी ॥**

पुन्हां फटाकड्यांचे आवाज. हें संपत असतांना एक वृद्ध गृहस्थ बाहेरून अंगणांत येतात.

बाहेरची रांगोळी पाहून आंत आल्यावर डाव्या हाताच्या पारिजातकाखालीं असलेल्या नळावर पाय धुऊन ताईकडे येतात. ]

[ **बाबा**— श्लोक म्हणत— " कैलास राणा... "— प्रवेश करतात व रांगोळी पाहून— ]

**बाबा :** ताई, छान घातलीस हं रांगोळी !

( ताई तुळशीपाशीं रांगोळी घालीत आहे. )

**ताई :** चांगली आहे ना ? आईनेंच शिकवली होतीन् चौतीस ठिपक्यांची. पण बाबा, देवपूजा करून तुम्ही कुठं गेलां होतात बाहेर सोवळयानं ?

**बाबा :** शंकराला जाऊन आलों. एरव्हीं पेठेंत देव असून दर्शन होत नाहीं. दिवाळीच्या दिवशीं जातों. तुझ्या आईचं व्रत होतं. मी चालवतों पुढें. त्या सुभाषला उठव. स्नान व्हायचं असेल ना त्याचं ? सगळं गांव जागं झालंय तरी याची झोप अजून उडत नाहीं. सुभाष, ए सुभाष. ए ताई, उठव त्याला, तेल–उटणं लाव, आंघोळ घाल, मग एकदमच बसूं या फराळाला. मी कपडे बदलून येतों. दिवाळीच्या दिवशीं तरी लवकर उठत जा म्हणावं त्याला. ( अंथरुणाकडे बघून बाहेर जात असतांना— )

**सुसंगति सदा घडो सुजन वाक्य कानीं पडो ।**
**कलंक मतिचा झडो विषय सर्वथा नावडो ॥**

( ह्या दरम्यान ताईची रांगोळी पुरी होऊन ती तुळशीपुढें नीरांजन लावते आणि– )

**ताई :** **लावितें मी नीरांजन तुळशीच्या पायापाशीं ।**
**भाग्य घेउनिया आली आज धनत्रयोदशी ॥**
**आज दिवाळी दिवाळी, पहांटेच्या त्या अंघोळी ।**
**घरोघरीं जागविते माय मुलें झोपलेलीं ॥**
**घरोघरीं दीपज्योती वरसाचा मोठा सण ।**
**क्षणोक्षणीं होते आई तुझी आठवण ॥**
**चार वरसांमागें होता हात तुझा अंगावरी ।**
**कधीं नाहीं जाणवली हिंवाळयाची शिरशिरी ॥**
**आज झोंबतो अंगाला पहांटेचा थंड वारा ।**
**कुठें मिळेल ग आई तुझ्या मायेचा तुषारा ॥**
**तुझ्यामागुती बाबांनीं दुःख दाखविलें नाहीं ।**
**त्यांच्या पंखांत वाढलों तुझा भाऊ आणि ताई ॥**
**तुझ्याविना आई घर सुनें सुनेंसें वाटतें ।**
**आणि दिवाळीच्या दिशीं तुझी आठवण होते ॥**

( डोकें टेकून, तुळशीपुढें बसते. कपडे बदलून बाबा बाहेर येतात. )

**बाबा :** ताई, आईची आठवण झाली का ग ?

**ताई :** बाबा—( असं म्हणून त्यांच्या पायांत घुसते. )

**बाबा :** ऊठ, ऊठ ! ( तिचे डोळे पुसतात. ) एखाद्या पोक्त्यापुरवत्या बाईसारखं सगळं घर वर्षभर सांभाळतेस आणि नेमकी दिवाळीच्या दिवशीं लहानाहून लहान होतेस, आईची ताई होतेस.

**ताई :** पण बाबा—( हुंदके देते... )

**बाबा :** असूं दे, असूं दे. अग, आठवणीनं डोळ्यांत पाणी येतं, पण म्हणून तें पुसायला आठवणी हात होऊन नाहीं येत बाहेर. जाणाऱ्याला असणाऱ्यांची चिंता नाहीं, गेलेल्याची मात्र सगळ्यांना चिंता. तुझ्या आईनं विचार केला होतान् का जातांना ? तूं, भाऊ...दोघं मुलं तुम्ही, तुम्हांला पोरकं करून, सावली काढून गेलीच ना तुम्हांला उन्हांत टाकून ? तिनें नाहीं विचार केला ? मग, तूं कशाचा विचार करतेस ? तुझा नाहीं विचार केला, माझासुद्धां नाहीं केला. मी नाहीं तिची आठवण काढत. माझ्याशीं सात पावलांची जोडीदारी करण्याच्या करारावर माझ्या घरांत आली आणि चार पावलं माझ्यासाठीं ठेवून आपण मात्र तिसऱ्याच पावलाला उठून गेली. माझा काय विचार केलान् ? मला नाहीं तिची आठवण येत. वज्रचुडेमंडित होण्याचा आशीर्वाद घेऊन आली या घरांत. चुडा ... वज्रासारखा मी अभंग टिकून आहे अजून ! फक्त ती नाहीं. मला नाहीं तिची आठवण येत. माझं एक राहूं दे. आपला भाऊ—सुभाष — स्वभावानं हा असा, हाताबाहेर गेलेला त्याचा स्वभाव. ( अंथरुणाकडे पाहून ) ऐकत असेल तो पांघरुणाखालीं. संवयच आहे त्याची ती. ऐकूं दे. ऐकायलाच हवं होतं त्यानं एकदां. त्यानें केलेले सगळे वयाला न शोभणारे, घराला न शोभणारे, मला न शोभणारे अपप्रकार तिला न कळवतां, उरांत दडवून बसलों होतों सगळीं दुःखें मी तिच्या आजारीपणांत तिला दुःख होऊं नये म्हणून. तिनं नको होती याची जाणीव ठेवायला ? गेली आपली एकटीच उठून. मला नाहीं तिची आठवण येत. तूं — तूं तर बारा वर्षांची होतीस चिमुरडी परकरी पोर ! आज लग्नाला आली आहेस, पण त्या वेळीं त्या वयांत सगळी घरची जबाबदारी तुझ्यावर टाकून कां निघून गेली ती ? कां नाहीं विचार केला तिनं ? मग तूं कशाला तिची आठवण काढतेस ! मला नाहीं तिची आठवण येत. तुला आठवतो तुझा पहिला स्वयंपाक ? तो दिवस ? मोठ्या दिमाखानं तूं भाकरी करायला

बसली होतीस—

**ताई** : हो, सुभाष शाळेंत जायचा होता. त्याला भाकरी लागत असे. आई देत असे. मला देतां येत नाहीं असं त्याला वाटूं नये म्हणून...

**बाबा** : भाकरी करायला बसली होतीस आईच्या ऐटींत, पण तव्यावर टाकतांना भाकरीचे होत होते तुकडे. तुझी दया येऊन मी बसलों भाकरी करायला, आठवतं तुला ?

**ताई** : हो, आठवतं. पण तुम्हांला तरी कोठें करतां आली ? तुमचीसुद्धां मोडलीच कीं !

**बाबा** : ( हंसतात, हंसतां हंसतां गहिंवरतात... ) हो हो हो, मोडली; पण तिला नाहीं वाटलं त्याचं कांहीं. गेली आपली एकटीच उठून. तिनं नाहीं आठवण केली, मला नाहीं तिची आठवण येत. तिनंच लावलीय ना ही तुळस ? आमची आठवण घेऊन गेली. स्वतःची आठवण ठेवून गेली. मला नाहीं तिची आठवण येत, आणि कशासाठीं आठवण करायची ? काय कमी आहे म्हणून ? दरवर्षीं दिवाळी येते, साजरी होते. निघून जाते. सांग तिला, म्हणावं, तुझ्या-माघारीं छान चाललंय देवधर-कुटुंबाचं. भाऊच्या शिक्षणाचा प्रश्न सुटलेला आहे, माझा वकिलीचा पेशा... तोहि थांबलेला आहे. एक तुझं लग्न झालं ताई, म्हणजे मी मोकळा झालों घरावर तुळशीपत्र ठेवून काशीचा रस्ता धरायला. बरं झालं गेली तें. कसले मायापाश तरी उरले नाहींत. तुझ्यामाघारीं तीन वर्षं कार्य करायचं नाहीं म्हणून थांबलो होतों. अन्नपूर्णे,– प्रथमच दाखवून आणलीय ताईला, सांगलीच्या गोखल्यांकडे. आतां आईप्रमाणं मुलालाही पसंत पडली तर तेंहि होऊन जाईल, चक्रनेमिक्रमानं. तें एकदां झालं कीं, घरांत सुभाष आणि मी दोघं नसल्यासारखे. त्याला कोणी नको म्हणून, आणि माझं कोणी नाहीं म्हणून— इतका वेळ मी इथं बोलतोंय— ढिम्म ! आहे का त्याला त्याचं कांहीं ? सात वाजलेत. सगळीं गांवांतलीं मुलं आंघोळ करून मोकळीं झालीं असतील आणि हा बघ. सुभाष, ए सुभाष, अरे ऊठ, अरे सुभाष,– ( असें म्हणून त्याच्या अंगावरचं पांघरूण काढतात. आंत नुसत्या दोन उशा आहेत. ) का ग ताई ! पांघरूण कुणी घातलं हें ? कुठं गेलाय सुभाष ?

**ताई** : पहांटे पळायला जातो हल्लीं.

**बाबा :** असं मोकळ्या गादीवर पांघरूण टाकून ?

**ताई :** कदाचित तुम्हांला आवडणार नाहीं—

**बाबा :** पहांटे पळायला जाणं, यांत न आवडण्यासारखं काय आहे !

**ताई :** असं त्याला वाटलं असेल—

**बाबा :** त्याला का तुला ? आणि त्यानं कधीं माझ्या आवडण्या न आवडण्याची पर्वा केलीय ? मी खात्रीनं सांगतों ताई तुला, रात्रभर हा मुलगा घरांत नसला पाहिजे. हें तुला समजलं असेल आणि हें मला कळूं नये म्हणून तूंच हें पांघरूण घातलं असशील. खरं सांग.

**ताई :** हो. तो कुठं गेलाय तें मला माहीत नाहीं. पण पांघरूण मींच घातलंय.

**बाबा :** त्याची आई गेल्यापासून हेंच तूं करत आली आहेस आणि सुभाष बिघडत गेला. आणखीन जाईल. अरे, तुम्हां बायकांना मायेवांचून कांहीं करतां येतं कीं नाहीं ? अपराध्याला पाठीशीं घालणं हा फार मोठा अपराध आहे ताई. विझविण्यासाठीं फुंकर घातली तरी विस्तव हा फुलतच असतो ताई. मला अंधारांत ठेवण्यासाठीं तुझ्या सांत्वनानं त्या विस्तवावर राख सांठत गेली तर एक दिवस न कळत तुझाच पाय त्याच्यावर येईल. चटका बसला म्हणजे चूक कळेल. ( आंत घंटा वाजते. ) त्याला सुधारण्याचा हा मार्ग नव्हे ताई. रात्रभर हा कुठं गेला होता हें मला कळायलाच हवं, नाहीं तर आज रात्रीं त्याला या घराचा दरवाजा बंद !

**ताई :** असं करूं नका बाबा. पण हल्लीं तो तसा वागत नाहीं. चांगला वागतो.

**बाबा :** ( अंथरुणाकडे बोट दाखवून ) हा त्याचा पुरावा !

**ताई :** पण त्यानं मला सांगितलंय बाबा...

**बाबा :** कीं यापुढं मी चांगला वागेन म्हणून, होय ना ?

**ताई :** होय.

**बाबा :** हें त्याचं वाक्य मला पाठ झालंय ताई. चेहरा सदा कावराबावरा, डोळ्यांत केल्या अपराधाचं भय. पूर्वीं सुभाष असा नव्हता. किती फरक पडलाय या पोरांत ! इंग्रजी चौथीपर्यंत हुशार, वर्तनानं प्रामाणिक, अभ्यासांत चोख. संगतीनं फुकट गेला. ( रंगराव दरवाजांत येतो. ) नको ती संगत

तो सोडूं शकत नाहीं. नको तो स्वभाव तो काय सोडणार आहे ?

( दरवाजांत एक मुलगेलासा गृहस्थ येऊन उभा राहतो. धोतर, कपाळाव[र] टिकली. पिवळा नेहरू शर्ट. वांकडी टोपी. )

**रंगराव :** नमस्कार बाबाशाब.

**बाबा :** नमस्कार, या; मीं ओळखलं नाहीं आपल्याला.

**रंगराव :** हां, ते ड्रेशामुळें. पेशा तसा वेश करावा लागते. मी आप[ले] सुभासच्या वर्गामंधी व्हते. आम्ही दोघे पर बराबरच रेस्टिकेट झाला ना[य] का साळांतून, दोघांच्या नाव पर एकदमच काढूनशी टाकला साळामंदून, प[ण] साळा सुटला म्हणून काय नडून राह्यला नाय. आमची बाप सुंदर-भवन काढल[ा]. मीच चालवते. साळाच्या जवळच काढला. साळाच्या उरावर.

**बाबा :** मीं आपलं नाव विचारलं. उद्योग नव्हे.

**रंगराव :** रंगराव, मालक, सुंदर-भवन. ( ताई आंत जाते. )

**बाबा :** रंगराव ! म्हणजे आमच्या सुभाषचे सन्मित्र !

**रंगराव :** हां तेच मी आश्चर्य केली. तुम्ही ओळखली कसा नाय ? को[ठे] गेली, सुभास ?

**बाबा :** आपण शाळेत असतांना दाखविलेल्या रस्त्यानेंच चालू आहे त्याच प्रवास. शाळा सुटल्यानंतरहि.

**रंगराव :** साळाचा काय बाबाशाब, शिक्सनावाचून काय नडतय नाय.

**बाबा :** खरं आहे तें, सरळ मार्ग नाहीं, आडमार्ग सही, कसं त[री] आयुष्याचं ध्येय गांठायचं. भलं असो, बुरं असो.

**रंगराव :** कई बोल्या—( असं म्हणून टाळी मागतो. बाबा पाठीव[र] हात टाकून फेरी मारतात. ) बरोबरीचे नाय तुमी. तरी पर टाळी मागितल[ी] माफ करूनशी द्या. ते संवय लागला. आमचे बरोबरीनं मास्तर लोकबी बसते[त]. आमचेच मास्तर. विनोद करतेत. सिगारेट वढतेत. आमचे शेजारी गल्ल्याव[र] बसून, टाळी मागतेत, टाळी देतेत, बरोबरी दावतेत. ( हळू आवाजांत ) उदारी मागूं ने म्हणून. ते संवय लागला. हात पुढें केला तुमी टाळी न[ाय] दिला; काय वाटला नाय. कारण धंद्यामंदी लाज बाळगुनशी नाय भाग[त]. ( खुर्ची घेऊन बसतो. ) ते सुभासला तुमी हॉटेल का नाय काढून देत ? धं[दा] चांगला करेल.

**बाबा :** लाज नाहीं म्हणून आणि एक दिवस तोहि मला टाळी मागेल म्हणून.

**रंगराव :** फस्कलास इनोद केला पर आता टाळी नाय मागते. पेटी आहे का काड्याचा ? अरे बाबाशाब, हे हॉटेलचा धंदा लई प्रोफिटेबल ! ज्या साळातून आमाला काडला त्या साळचा समदा इद्यार्थी आज आपला गिऱ्हाक हाय. ( तुळशीजवळ सिगरेट पेटवतो. )

**बाबा :** म्हणजे सूड म्हणून सगळी शाळाच बिघडवायची म्हणतां ?

**रंगराव :** खरी वार्ता काय बाबाशाब. बिघडनेचा मतलबच सुदरून गेला एकदम. ( सिगरेट पेटवतो व पणती विझवतो. ) आमी सिगरेट वढली... फी बुडवला. म्हणून रेस्टिकेट झाला साळामंदून. पर हल्लीचे हे पोरं-पोरी इंग्रजी, हिंदी सिनेमा बघतेत. सिनेमात बघतेत तसे जगात वागतेत. हॉटेलमंदी येऊन बघतेत तर प्रत्येक वेळ फॅमिली रूममंदी हाऊसफुल्ल. ( बसतो. ) आत डोकावून बघलेत तर हुशार हुशार पोरं, मधले सुटीत सिगरेट वढतेत. फॅमिली नसलेला फॅमिली होतेत. मॅट्रिकचा पोरगा, नववीची पोरगी, टेबलखाली पायाला पाय लावून सिनेमा करतेत. तरी पण साळात सिकतेत, रेस्टिकेट व्हतेत नाय. मंग सिकून आम्ही जर हेच करणार व्हतो तर रेस्टिकेट झाला म्हून बिघडला काय ? हॉटेलचा धंदा लई बेस्ट. समदा पिढीच बिघडून गेला, बिघडणेचा मतलबच सुदरून गेला एकदम.

**बाबा :** आपण माझ्याकडं काय हेतूनं आलां होतां ? हॉटेलचं गिऱ्हाईक वाढविण्याच्या दृष्टीनं माझा आपल्याला कांहीं उपयोग होणार नाहीं.

**रंगराव :** अरे, अमी तर तुमचा गिऱ्हाईक होऊनशी आले. ( खांद्यावर हात ठेवतो. बाबा बघतात काढून घेतो. )

**बाबा :** माझं गिऱ्हाईक ?

**रंगराव :** हां, तुमचा सुभास सांगत व्हती का तुमचा वकिली तुमी बंद करूनशी बसले. पर आमचा एक केस हाय, तरी तो सुभास म्हणाली आमचा बापाला चालवायला दे. गेरंटीसे सुटेल.

**बाबा :** म्हणजे माझी वकिली त्यानं केलीन्. त्याची गरज नव्हती. गिऱ्हाईक नाहीं म्हणून मी माझी वकिली बंद केली नाहीं. माझीं ध्येयं, माझे विचार... जाऊं दे. त्या गोष्टी आपल्या बुद्धीच्या आणि वृत्तीच्या पलीकडच्या आहेत.

**रंगराव :** तर आमचा एक लफडा हाय !

**बाबा :** तें मला कशाला सांगतां ?

**रंगराव :** न्हाय, थोडा साखरेचा भानगड. पचास पोती साखर साला एक्स्ट्रॉमंदी घेतला. साला सापडूनशी गेला. बरं पोलीस, ते नवा आलाय इन्स्पेक्टर, साला पैसा पर खाते नाय.

**बाबा :** हें पाहा, हें सभ्य माणसाचं घर आहे. शिवी न वापरतां शब्द वापरा.

**रंगराव :** हां, सभ्य तर साला आपणभी हाय. पैसा सभ्य हाय शब्दाला. माफ असते पैशाची. तर तेनं केला कोर्ट केस. तर आपण जर आमची केस घेल तर मी पण सुटून जायेल, तुमाला पर चार पैसा मिळून दिवाळीसाठी खर्चाला होयेल. हे तुमच्यासाठनं धोतरजोडी आणि शिलीक आणला हाय इसार म्हून, तर आपण शब्द खर्चून मॅजिस्ट्रेटची मूठ दाबेल तर तुम्हालाच कायम काम देयेल. दुसरा वकील बघेल कशाला ? कोठे ठेवू हे सामान ? हे फराळाचा करंडी. ताईसाहेब !

**बाबा :** शंकराच्या देवळाबाहेर आंधळे पांगळे बसले असतील हात पसरून भीक मागण्यासाठीं त्यांना वांटा अन् त्या निमित्तानं या घरांतून जा म्हणजे मला दरवाजा लावून घेणं सोईचं पडेल.

**रंगराव :** म्हणजे मी जावा म्हणते का तुम्ही ? नाहीं, तुमी जा म्हणाली त्याचा राग नाय, कारण धंदेमंदी लाज बाळगून नाय भागत. तर मग आमचा केस ?

**बाबा :** तुम्हाला समजलं नाहीं. मला स्वीकारतां येत नाहीं. वकिली हा माझा पेशा होता, धंदा नव्हे. आणि अपराधाला पाठीशीं घालण्यासाठीं मी पूर्वी वकिली करीत नव्हतों, आतां करत नाही आणि पुढेंहि करणार नाहीं.

**रंगराव :** तुम्ही अपराधाला पाठीशी घालते नाय मग वकिलीचा धंदा करते कसाला ? हे सुब दिवस हाय ! लक्षिमपूजनचे दिवशीं लक्षिमिस टाकूं नाय !

**बाबा :** हें पाहा, माझ्या बरोबरीनं येऊन आपण मला मघाशीं टाळी मागितली, नंतर खांद्यावर हात ठेवण्याचा प्रयत्न केलांत, आतां शुभ-अशुभाचं ज्ञान सांगतां. जरा वेळानं आशीर्वादहि द्याल ! पण खरं सांगूं ? आपण या

घरांत आलांत यापरतां आणखी कोटला अपशकुन असूं शकेल असं मला वाटत नाहीं. आपण या घरांतून जा, पुन्हां या घरांत येऊं नका अशी सांगण्याची गरज नाहीं, तरी पण सांगतों. कारण धंद्यांत जी गोष्ट तुम्ही टाळतां ती लाज आम्ही सांभाळतों, या चार भिंतींच्या आड! मी जिवंत आहें तोंवर हें घर माझं आहे. आणि माझ्या घरांत फक्त माझे संस्कार चालतात. माझ्या मुलावर तुम्ही संस्कार करतां आहांत ते करा, पण या चार भिंतींच्या बाहेर. त्याला हॉटेल काढून द्या, कपबशा विसळायला ठेवा, पण बाहेर. हें गृहस्थाचें घर आहे. बाहेरच्या पाप-पुण्याला स्पर्श करून आलेलीं पावलं अंगणांतल्या नळावर धुतलीं गेलीं तरच देवघरांत जाऊं शकतात...हे या घराचे संस्कार आहेत. हे संस्कार तुम्ही शिकून या. मी होऊन तुमच्या खांद्यावर हात टाकेन, टाळी देईन, बरोबरीनें स्पर्श करण्याला योग्य समजेन, माझ्या दृष्टीनें स्पृश्य समजेन. पण नंतर...तोंवर नाहीं.

**रंगराव :** म्हणजे तुमी आम्हाला असरर्श म्हणते काय? आम्ही स्पर्शा-अस्पर्श मानते नाय. तसा सरकारी कायदा हाय. येथे वर्णभेद नाय असा होटेलमंदी बोर्ड हाय. तुमी कायद्याने आम्हाला अस्पर्श म्हून गुन्हा करते. आम्ही केस

**बाबा :** शक्य आहे. समजुतीचं, ज्ञानाचं आणि तुमचं वैरच आहे, त्याला तुम्ही तरी काय करणार? तुम्हांला काय हवं तें करा, पण या घराबाहेर—

**रंगराव :** जाते. (हातांतली सिगरेट तुळशीच्या कट्ट्यावर विझवतो.) पर जातांना हे मिठाईचा करंडा घेऊनशी जाते, दिवाळीचे दिवशी गोडवा घेऊन जाते घरांतला, आता पाडव्याचे दिवशी येल, कडू लिंबाचा पाला घेऊन. सुभास-वरचे आमचे सर्वे संस्कार पूर्ण झाल्यावर येएल. त्याला बिघडवणारा म्हणून येल. कारण बिघडणेचा मतलबच साला सुदरून गेलाय एकदम. मी 'साला' म्हणून गेले काय चुकून? ते बरोबर. ते साला संवय लागला. साळामंदी आपण 'साला' इक्ता एकच शब्द शिकला. तुम्हाला राग आला असेल, पण त्याला विलाज नाय. कारण धंद्यामंदी लाज बाळगुनशी नाय भागत. ते सुभासला सांगा का ते होटेलचं बिल तिकता चुकता करूनशी जा. त्याला होटेलमंदी पाठवा. पाय धुऊन आला नाय तरी चालेल. कारण आम्ही वर्णभेद मानते नाय. तुम्ही आम्हाला अस्पर्श म्हणाली काय? आम्ही तुमचा समदा

घरानाच बिघडवून टाकेल नाय, अस्पर्श नाय करेल तर आमची बाप आमची नाव रंगराव ठेवली, तेंच काय पर साला बापाचाभी नाव बदलुनशी देल. जाते, मिठाईचा करंडी घेऊनशी जाते. [ जातो. ]

**बाबा** : ( दरवाजा बंद करून दरवाजाला टेकून कपाळावर हात मारतात. ) हे आमच्या सुभाषचे मित्र. ऐकलेंस अन्नपूर्णे, " एथवरी आहे हा ऐसा प्रकार." [ ताई येते. ] ऐकलंस ताई ?

**ताई** : बाबा !

**बाबा** : तूं म्हणतेस ती हीच का त्याची सुधारणा, ताई ?

**ताई** : पण हल्लीं भाऊ त्याच्याकडे जात नाहीं बाबा. म्हणूनच हा चिडून आला असेल त्याचं देणं वसूल करायला.

**बाबा** : देणं वसूल करायला ? म्हणजे त्याला देणं होतं हें सिद्ध होतं कीं नाहीं यावरून ?

**ताई** : हो.

**बाबा** : ही गोष्ट तुला पूर्वींच समजली होती कीं नाहीं ?

**ताई** : हो.

**बाबा** : तरीहि तूं माझ्यापासून दडवून ठेवलीस ?

**ताई** : हो.

**बाबा** : कां ? कां ? पण कां, कशासाठीं ?

**ताई** : बाबा, तुम्हांला दुःख होऊं नये म्हणून.

**बाबा** : मला, दुःख होणारच असेल तर तें आतां झालं नसेल का ? केलेलं वेळेवारी समजलं असतं तर कृतीची पुनरुक्ति झाली नसती. सुभाष घडत घडत बिघडत गेला. दुर्जनांनीं कुमार्ग दाखवला आणि सज्जनांनी पाठीशीं घातला म्हणून सुभाष बिघडला. माझ्या दुःखापेक्षां त्याच्या भविष्याची तूं चिंता का नाहीं करत ? आज तूं त्याचे अपराध झाकते आहेस ताई, पण एक दिवस त्याच्याच पायीं तुझ्या हातांतून असा एखादा अपराध घडेल कीं, तो कबूल करणं तुला अवघड होऊन बसेल. अशा विलक्षण पेंचांत तूं सांपडशील कीं त्यांतून तोच काय पण मीहि तुला सोडवूं शकणार नाही. ( घंटेचा आवाज. ) ठीक आहे. इच्छा नियतीची ! नशीब त्याचं ! तुझ्या सदिच्छा तरी त्याचं भलं करो ! बरं ताई, एवींतेवीं तो येईपर्यंत थांबावंच लागणार आहे. मी जरा त्या

पानसरे वकिलांच्याकडून जाऊन येतों. दिल्लीहून काल आले असतील ते. आमची ती केस सुप्रीममध्यें आहे. विश्वनाथ सोमण– ज्याच्यासाठीं वकिली बंद करून बसलोंय मी, त्याच्यावर झालेल्या अन्यायाच्या परिमार्जनासाठीं अपराधी नसतांना जन्मठेप भोगतो आहे विश्वनाथ सोमण.

**ताई :** पण बाबा, माणूस तर मारला गेला जगन्नाथ सोमणाकडून, तो तर फांसावर गेलासुद्धां, मग आता विश्वनाथाला जन्मठेप कशासाठीं ? त्यांत विश्वनाथाचा काय गुन्हा ?

**बाबा :** जगन्नाथाचा तो भाऊ होता हा विश्वनाथाचा गुन्हा, कायद्याच्या दृष्टीनं. तो सुटून आला पाहिजे. हा अन्याय्य कायदा बदलला पाहिजे. आयुष्यांत माझी हरलेली पहिली केस विश्वनाथ सोमण, आणि आयुष्यांत हरलेली माझी दुसरी केस आमचा भाऊ. एकाला निष्कारण शिक्षा झाली हा माझा पराभव आणि कारण असून भाऊला शिक्षा होत नाहीं हा माझा दुसरा पराभव. ( बाहेरून ' भाऊ ! ' अशी हांक येते. ) कोण आहे बघ. ( दरवाजांतून बाळू आपटे. कपाळावर गंध, पांढरा शर्ट, पॅंटमध्यें खोंचलेला. पण पट्टा नाहीं. डोक्याला टोपी. सदा हंसतमुख. )

**बाळू :** मी आहे, बाळू आपटे.

**ताई :** बाळू, अरे ये ये. बाबा, बाळू आहे आपट्यांचा.

**बाबा :** अं ?

**ताई :** वेणूचा भाऊ !

**बाबा :** वेणूचा भाऊ, हां. हां. आप्पांचा मुलगा. ये रे ये, बाळू, कसा काय आलास इतक्या सकाळीं ?

**बाळू :** आतां कसली सकाळ ! पहांटे चार वाजतांच आंघोळी झाल्या, आतां फटफटीत उजाडलं, ऑफिसांत जाण्याची वेळ झाली इतकें वाटतें. असें वाटतें कीं अकरा वाजले.

**ताई :** भाऊकडे का आला आहेस ?

**बाळू :** छे, छे, बाबांच्याकडे आलों.

**बाबा :** कां रे बाबा ?

**बाळू :** आप्पांनीं सांगितलें, म्हणून पेढे देण्यासाठीं आलोंय.

**बाबा :** कसले पेढे ?

**बाळू :** तें सांगतों नंतर. पण आप्पांनीं सांगितलें कीं, कुठलेंहि शुभ-वर्तमान कळलें कीं, पहिला नमस्कार शंकराला करीत जा आणि दुसरा बाबा देवधराला. देवधराला असें ते म्हणतात, मी देवधरांना म्हणतों. म्हणून नमस्कार करण्यासाठीं आलों. ( पटादिशीं वाकून नमस्कार करतो. )

**बाबा :** ( हात उचलून आशीर्वाद देतात. ) हं, ऊठ. अरे, पाया देवाच्या पडायचं, माणसाच्या नाहीं.

**बाळू :** कशावरून ?

**बाबा :** कशावरून म्हणजे ?

**बाळू :** मग ? वडिलांच्या पायां कशासाठीं पडतात ?

**बाबा :** अरे, वडील ते देवच. ' पितृदेवो भव ' हें शास्त्रवचन आहे.

**बाळू :** मग तुम्ही ' पितृवत् देवो भव ' म्हणून केला नमस्कार. तुमच्या पत्रामुळे मला नोकरी नाहीं का लागली मामलेदार कचेरींत ?

**बाबा :** ती तुझ्या पात्रतेमुळें लागली.

**बाळू :** तर आतां ट्रान्स्फरवर आलों.

**ताई :** इथं ?

**बाळू :** हो. मी पर्मनंट झालों, सहा वर्षांत क्लार्कचा पर्मनंट क्लार्क झालों. ॲंबिशन पुरी झाली. लाइफमध्यें ॲंबिशन पाहिजे. नोकरी लागली त्या वेळीं म्हणालों होतों मनांत, इथें नोकरी करेन पण एक दिवशीं पर्मनंट होईन, तेव्हांच बाळू आपटे हें नांव सांगेन. आतां हेडक्लार्क व्हायचें. दुसरी ॲंबिशन, तीही पुरी होईल, पण या निमित्तानं गांवांत बदलून आलों तें काय थोडें झालें ? म्हणजे तिकडचा खर्च वांचला खानावळीचा. तेवढीच आप्पांना मदत होते या उतारवयांत. ( पुडी सोडून ) हा पेढा—

**बाबा :** शंकराला वाहिलास ना ? पावला मला. ताईला दे.

**बाळू :** होय. तिलाहि देतोंय. भरपूर आहेत. पाव किलो आणलेत. आज नाहीं खर्च करायचा तर करायचा केव्हां ? घे ग ताई.

**ताई :** मला दिलास आणि भाऊला ?

**बाळू :** त्याला विसरेन असं तुला वाटलें काय ? कोठें आहे तो ? इथेंच असतो ?

**ताई :** होय.

**बाळू** : सहा वर्षांत भेटला नाहीं. कसें आहे त्याचें ? बरें आहे ना ?

**ताई** : बरं आहे.

**बाळू** : त्याला नाहीं टाकलें कोठें चिकटवून ? पगार आला तर उपयोगी होतात पैसे, कळालें काय ? याच वयांत तरुणांनीं मिळवायचें व वृद्धांनीं बसून खायचें. मॅट्रिक झाला असेल नव्हे तो ?

**बाबा** : मी येतों जरा बाहेर जाऊन. अग ताई, या बाळूला दिवाळीचं फराळाचं देशील कीं नाहीं ?

**ताई** : देतें ना !

**बाळू** : हाँ, मी उद्यां येईन !

**बाबा** : बरं बरं !– सुभाष येईल रे आतां, त्याला भेटून जा. छान करा हं नोकरी. आप्पांना संभाळा. आतां आधार तुमचाच त्यांना. ( ' असाच उरलों कसा पतित मी नसे काय कीं । कृपाच सरली असेंहि न घडे जगन्नायकी ॥ ' असें म्हणत बाहेर जातात. )

**बाळू** : बाबा आतां थकल्यासारखे वाटतात नाहीं काय गे ताई !

**ताई** : नाहीं रे, फार दिवसांनीं पाहतो आहेस म्हणून तुला वाटत असेल. बैस ना, बैस. असा उभा कां ? ( बाळू मांडी घालून पैटकन खालीं बसतो. ) अरे, हें काय, जमिनीवर काय बसलास ? कपडे नाहीं का मळायचे ? वर बैस !

**बाळू** : धुतां येतील, लहानपण कसं धुऊन टाकतां येईल मनावरचं ? इथं या घरांत आलं आणि असं जमिनीवर बसलं ना ताई, म्हणजे लहानपणांत परत आलों असं वाटतंय, कळलं काय ? शाळेंत असतांना दर श्रावणी सोमवारीं तुझी काकू बोलवत नसे काय जेवायला ? सुभाष आणि मी एकाच वर्गांत नव्हे काय ? काकू म्हणायच्या, अरे, मुंजा मुलगाच बोलावायचा तर आपल्यांच्या बाळूला कां नाहीं बोलवीत आणि मी यायला लागलों. मग येथून जायचें शाळेंत दोऱ्याला लावलेली दौत फिरवीत फिरवीत शाई न सांडतां. तशी शाई सांडत नाहीं, नियम आहे सायन्सचा. तसें लहानपणापासून माझें सायन्स पक्कें हो ! तीच तपश्चर्या उपयोगी पडतेय. पर्मनंट झालों. मामलेदार कचेरींत सहा वर्षांत डायरीवर एकहि शेरा नाहीं साहेबाचा; कॉन्फिडेन्शलसुद्धां नाहीं. थोड्याच दिवसांत हेडक्लार्क व्हायचे– मग मामलेदार. लाइफमध्ये ॲंबिशन पाहिजे. पहिली ॲंबिशन पुरी झाली. आतां दुसरी, मग तिसरी– एवढा वेळ गुडघ्याभोंवतीं

हात, वांकडी मान, डोळ्यांत कौतुक भरून आश्चर्यानें ताई त्याच्याकडे बघत असतांना अचानक बाळूचें लक्ष जातें. ) अशी काय बघतेस ताई ?

**ताई :** सुभाष तुझ्या बरोबरीचा ना ?

**बाळू :** इंग्रजी चौथीपर्यंत. पण पुढं मी मॅट्रिक झालों तरी तो चौथींतच होता. भारी हुशार हो. पण ताई, शाळेच्या गॅदरिंगच्या दिवसांत शाळेचा लाडका. नकला काय करील, कविता काय म्हणेल, मला आठवतंय ना. समस्यापूर्तीची चढाओढ होती शाळेंत. " कठिण समय येतां कोण कामास येतो ! " ही होती समस्यापूर्तीची ओळ. सगळ्यांनीं कविता केल्या ती ओळ शेवटीं घालून, पण शेवटीं बक्षीस मिळालें त्यालाच. वाचली कविता त्याचीच मास्तरांनीं शाळेंत... " **झडकरि चढ रामा आम्रवृक्षावरी या । वदति सकल टाकी राशि खालीं फळांच्या ॥ सकल पळुनि गेले खालिं जेव्हां पडे तो । कठिण समय येतां कोण कामास येतो ॥** " सगळीं मुलें हंसलीं. आणि आश्चर्याची गोष्ट– मीसुद्धां हंसलों ! म्हणजे मला काव्य समजलें, तुला कळलें काय ? भारी हुशार पण व्रात्य, मोठा हूड. मला आठवतं ना... पुढच्या बाकावर बसायचा माझ्या शेजारीं रोज. एक दिवस दिसला नाहीं, उशिरा आला. बरोबर मला वाटतं रंगराव होता. आणि बरं का ताई, मागं जाऊन बसला. तेव्हापासून मागेंच. मी तीन वर्षें पुढें गेलों. मागें वळून पाहिलें, पण हा मागेंच.

**ताई :** तुझ्याबरोबर असता तर तोहि एक दिवस मामलेदार झाला असता, नाहीं रे ?

**बाळू :** मामलेदार काय म्हणतेस ? तो व्हायचा कलेक्टर, मामलेदार व्हायचे आम्ही. अँबिशन पाहिजे मात्र. तो झाला असता कलेक्टर. बाबासाहेबांचा मुलगा, बुद्धीचें वरदान घराण्याचें; पण आमचेंसुद्धा घराणें लहान नाहीं हो. पण आमचे आप्पा म्हणजे तलाठी– पण तलाठी म्हणजे वकील नव्हे हो. म्हणून म्हठलें...आम्ही व्हायचे मामलेदार, सुभाष कलेक्टर. कुठें आहे तो ? बरें आहे ना त्याचें ?

**ताई :** आहे तसंच आहे.

**बाळू :** असूं दे, तसेंच असायला हवें हो. म्हणजे म्हातारपणीं आधार त्याचा नव्हे काय बाबांना ?

ताई : तो बाबांचाच आधार आहे.

बाळू : तो असायलाच हवा हो. म्हणजे मुलांच्या जन्माचें हेंच सार्थक. ' यासाठीं जन्मा यावें, जन्माचें सार्थक व्हावें । ' शाळेंत पाठ केलेलें म्हटलें हो. नाहीं तर तुला वाटेल मीं केलें का काय काव्य. छान छान ! बरें वाटलें हो ऐकून. त्याला आठवणीनें दे हं पेढा. उपयोगी पडायचा, पैसे मिळवितो ना ?

ताई : हो. अपेक्षेपेक्षां जास्त मिळवितो.

बाळू : नोकरी कोठें करतो ?

ताई : कुठंच नाहीं.

बाळू : तरीहि मिळवितो, म्हणजे भाग्यवान् आहे म्हणेनास काय ! आम्हांला चार रुपये महागाई हवी असली कीं बाकीच्यांना संप करायला लागतो, मी कधीं संपांत नसतों म्हणून म्हटलें हो ' बाकीच्यांना ' म्हणून. या दिवाळीला मिळालेत ना आम्हांला दोनशें पन्नास रुपये सगळे मिळून महागाईवाढ. कुठून मिळवितो पैसे ?

ताई : कुठून तें सांगत नाहीं, पण त्याच्या पैशाची भीति वाटते. बाळू, दिवाळीच्या दिवशीं आलास, माझें एक काम करशील ?

बाळू : हो, करेन.

ताई : जरा आमच्या सुभाषकडे लक्ष ठेव.

बाळू : म्हणजे ?

ताई : कांहीं नाहीं. तूं मित्र आहेस ना त्याचा ? त्याची वाईट संगत सोडव. बाबा आतां थकले. बाबा तरी कुठवर खस्ता खाणार ? हा कुठं नोकरीहि करीत नाहीं.

बाळू : चिंता करूं नकोस ग, मी बघतों त्याचेकडे, मी देतों त्याला चिकटवून कुठें तरी ! जरा मला मामलेदार होऊं दे. बाबासाहेबांनीं माझ्यावर उपकार केलेत, मला कर्तव्य केलें पाहिजे.

ताई : आई गेल्यापासून बाबा थकल्यासारखे वाटतात. रोज संध्याकाळीं एकटेच बसतात, विचार करीत. घरांत आई नाहीं. सुभाष हा असा. मीहि या घरांतून एक दिवस जायची...

बाळू : खरेंच तें— कन्याधन परक्याचें.

ताई : मग बाबा एकटेच. त्यांचे हाल होतील. कारण आमचा भाऊ.

आमचा भाऊ आईचा फार लाडका. आई मला जातांना सांगून गेली होती— वयानं तो मोठा असला तरी तूं त्याची ताई हो. भाऊला आईची उणीव भासूं देऊं नकोस. एक मात्र सांगतें हो...बाबांच्या तो हाताबाहेर गेला असला तरी तो माझ्याशीं खरं बोलतो. पण मला त्याची भीती वाटते ती बाबांच्या काळजीनें— तिन्हीसांजेच्या वेळीं बाबा एकटेच खिडकीशीं विचारांत बसलेले दिसले कीं भडभडून येतें आणि ह्याची संगत ही अशी. म्हणून म्हटलं तुला, त्याच्यावरती लक्ष ठेव.

( सुभाष येतो चोरपावलांनीं. चप्पल्स काढून ठेवतो. आवाज न करतां पाय धुतो. घरांत डोकावून पाहतो, आणि आपल्याविषयीं कांहीं बोलतात काय याचा अंदाज घेण्यासाठीं त्यांच्या मागं जाऊन उभा राहतो.)

**बाळू** : चिंता नको हो. मी आलों ना येथें बदलून. बरोबर लक्ष ठेवीन त्याच्यावर. डोळे पूस बघूं; रडतेस काय ?

**सुभाष** : तुला रडलेंच पाहिजे ताई, मला रडलं पाहिजे, याला रडलं पाहिजे. अश्रू हा आयुष्याचा पाया आहे. ट्रॅजिडी इज द बेस ऑफ लाइफ.

**ताई** : हें असं कांहीं बडबडत असतो.

**सुभाष** : ए बाळ्या, केव्हां आलास ! कशी चालली आहे सर्व्हिस ?

**बाळू** : पर्मनंट झालों. तुझें कसें ?

**सुभाष** : फर्स्ट क्लास !

**बाळू** : काय करतोस ?

**सुभाष** : कविता.

**बाळू** : कविता ? तसा दिसत नाहींस.

**सुभाष** : कवि असावा लागतो, दिसावा नाहीं लागत.

**बाळू** : कुठें नोकरी कां नाहीं करीत ?

**सुभाष** : त्यांत काय चार्म आहे ? चुकलं आमचं. काव्याविषयीं आम्ही तुझ्याजवळ बोललों. काव्याचा तुझा संबंध काय ? बरं जाऊं दे ! बाळ्या, शाळेंत असतांना तुझा भूगोल पक्का होता, नाहीं ?

**बाळू** : हं ! माझं विशेष म्हणजे सायन्स हो ! तीच तपश्चर्या उपयोगी पडते आहे. आज पर्मनंट झालों मामलेदार कचेरींत.

**सुभाष** : सायन्सच्या तपश्चर्येचा फायदा का ? पण भूगोलाचें काय ?

**बाळू** : भूगोलाचं काय ?

**ताई** : त्याच्याकडे काय लक्ष देतोस बाळू ?

**सुभाष** : तूं गप्प बैस ग ! ( बाळूस ) एकूण माती किती आहे रे जगांत ?

**बाळू** : माती ? म्हणजे...काय विचारतोय ग हा ?

**सुभाष** : एकूण पृथ्वीवर पाण्याच्या मानानें.

**बाळू** : असे विचारतोस होय ? एक-चतुर्थांश मातीला तीन-चतुर्थांस पाण्याचा वेढा.

**सुभाष** : हं, म्हणजे पाणी जास्त. तें शाश्वत जगांतलं. माती खोटी, प्रलयाच्या दिवशीं पाण्याला मिळते.

**बाळू** : वेळ आहे रे त्याला अजून. दिवाळीच्या दिवशीं भलतें काय बोलतोस !

**सुभाष** : हेंच तें खोटं वाटणं, खोटं हंसणं, खोटं समाधान, अशाश्वताचं सुख जें निश्चित जाणारं आहे, वर्षांतून एकदां येणाऱ्या दिवाळीसारखं, त्याचा आनंद. एकूण माणसाचं आयुष्यच खोटं.

**बाळू** : तत्त्वज्ञान सांगतोय, ऐकलंस ताई ?

**ताई** : ऐकतें. चोराची इसापनीति.

**बाळू** : बाकी लहानपणापासून हा हुशारच हो.

**ताई** : वायां गेलेला.

**सुभाष** : तर तूं मला सांग, ए बाळू, आपण जन्माला कसं येतों ?

**बाळू** : कसं म्हणजे ? भलतेंच काय विचारतोस ! तुझी संगत वाईट बाहेर म्हणून असले प्रश्न विचारतोस घरांत ?

**सुभाष** : तसं नाहीं रे. कसें म्हणजे कसें ?

**बाळू** : म्हणजे कसें ?

**सुभाष** : हंसत कीं रडत, आठवतं तुला ?

**बाळू** : हो.

**सुभाष** : आश्चर्य आहे !

**बाळू** : आठवतें म्हणजे, आई सांगत असलेलें आठवतें हो. मी जन्माला आलों म्हणे रडत.

**सुभाष** : म्हणजे माझ्यासारखा. ताईसारखा. एकूण माणसासारखा. तें सत्य आहे. अश्रु खरे, आणि जन्माला आल्यावर आपण प्रथम काय शिकतों ?

**बाळू** : श्रीगणेशा.

**सुभाष** : ए गणेशा, मीं तसं नाहीं विचारलं. प्रथम म्हणजे प्रथम. तान्ह्या मुलाची आजी रडणाऱ्या तान्ह्या मुलाच्या ओठाला करंगळी लावून त्याला काय शिकवते ? हंसायला शिकवते. शिकवते म्हणजे जे बरोबर आणलेलें नसतें तें शिकवते, तें खोटं. समुद्रवलयांकित पृथ्वीसारखं. एकचतुर्थांश हंसण्याला, तीन-चतुर्थांश अश्रूंचा वेढा. दॅट इज जीवन. माणूस जन्माला येतांना अश्रू घेऊन येतो, आल्यावर हंसणं शिकतो. जातांना हंसणं घेऊन जातो. अश्रु येथें ठेवून जातो. तें शाश्वत जगांतलं म्हणून म्हटलं ताई, तुला रडलं पाहिजे, मला रडलं पाहिजे. आणि एक दिवस या बाळ्यालाहि रडलं पाहिजे. अरे, अश्रू हा आयुष्याचा पाया आहे. ट्रॅजिडी इज द बेस ऑफ लाइफ.

**ताई** : भाऊ, इतकं चांगला बोलतोस. तसा चांगला वागत कां नाहींस रे ?

**बाळू** : ताई, त्याला पेढा दे बघू. कशाचा समजलास, संगत चांगली ठेवल्याचा परिणाम. मी पर्मनंट झालों.

**सुभाष** : तुझ्याजवळचा दे कीं.

**बाळू** : हा घे, पण संगत चांगली ठेव.

**सुभाष** : आणि ताईला ?

**ताई** : मला नको.

**सुभाष** : माझ्यावर रागावलीस ? पण त्याचा पेढा कां नको म्हणतेस ?

**ताई** : त्यानं दिलाय मला.

**सुभाष** : बरं जाऊं दे, बाबा कुठें गेले ग सकाळीं ?

**ताई** : रात्रभर तूं कुठें होतास त्याचा पत्ता काढायला !

**सुभाष** : पण मी कुठं ... ?

**ताई** : एक अक्षर बोलूं नकोस, पाणी तापलेलं आहे, तेल-उटणं तयार आहे. आंघोळ करा. फराळाचं तयार आहे.

**सुभाष** : नको मला. शिव्यांनीं पोट भरतं माझं. दिवाळीच्या दिवशीं अन्न नाहीं लागत मला.

**ताई** : खाऊं नकोस. [ घरांत जाते. ]

**सुभाष** : देऊं नकोस ! बाळू, तुझा पेढा घे ! ( बाळू घेत नाहीं असें पाहून बाहेर टाकणार इतक्यांत— )

**बाळू** : हें चांगलें करत नाहींस हो !

**सुभाष** : मी कांहींच चांगलं करत नाहीं ! निंदा चालली होती ना माझी मी घरांत नसतांना ?

**बाळू** : आडून ऐकलेंस ?

**सुभाष** : ऐकायला कशाला हवंय, माझी खात्रीच आहे.

**बाळू** : निंदा होईल अशी, मग स्तुति होईल असें वागावें बाहेर म्हणजे निंदा होणार नाहीं घरांत.

**सुभाष** : म्हणजे मी वाईट वागतों हेंच सांगितलंन् ना ताईनं ? आई गेल्यापासून घरांत आम्हांला सदा हिडिसफिडिस, एक शब्द कोणी सरळ बोलत नाहीं.

**बाळू** : त्यांचें म्हणणें बरोबर रे. वास्तविक, तू एव्हांना मॅट्रिक होऊन बी. ए. व्हायला पाहिजे होतेंस ! कुठें तरी नोकरी करून संसाराला हातभार लावण्याचें हें तुझें वय.

**सुभाष** : तें करतोंच मी. हातभार माझाच आहे संसाराला. मिळवून कोण आणतं घरांत माझ्याशिवाय ? पण आमचे पैसे कोणी घेतच नाहीं घरांत. मग आम्ही खर्च करतों, तर म्हणतात उधळ्या !

**बाळू** : नोकरी करत नाहींस मग मिळवतोस कोठून ?

**सुभाष** : तें आमचं खाजगी आहे. रंगरावाबरोबर माझी भागीदारी आहे, एका खाजगी धंद्यांत.

**बाळू** : त्याची भागीदारी बरी नव्हे हो. त्याच्या खाजगी धंद्याचा लौकिक चांगला नाहीं. त्याची संगत सोड बघूं. नाहीं तर एखादे दिवशीं त्याचेबरोबर तूंहि अडकशील. तुझा मित्र म्हणून सांगतोंय तुझ्या हिताचं, त्याची संगत सोड. मी तुला देईन कुठें तरी चिकटवून, जरा मला मामलेदार होऊं दे.

**सुभाष** : खरंच देशील मला नोकरी ?

**बाळू** : खरेंच देईन, पण संगत चांगली ठेव.

**सुभाष** : इतकंसुद्धां आपुलकीनं चौकशी करणारं नाहीं रे कुणी या घरांत. बाबांची वकिली बंद झाली. त्यांची दया येऊन— कांहीं करावं म्हटलं तर मला पाहिल्यावर त्यांच्या कपाळावर आठ्या. माझं नशीबच तसलं बघ.

**बाळू** : रडतोस काय, डोळे पूस बघूं. चिंता करूं नकोस. मी आलोंय ना येथें ?

**सुभाष** : ( मुसमुसत ) ताईबद्दल मला काय वाटतं हें तिला कधींच कळलं नाहीं. आणि माझं नशीब असं कीं, तिच्यासाठीं भाऊबीज द्यायला हवी म्हणून वर्षभर काटकसर करून पैसे ठेवले होते सांठवून तेहि गेले काल.

**बाळू** : चोरीला?

**सुभाष** : नाहीं रे, अरे, ते त्यानें घेतले उसने. तो व्ही. ई. नव्हता का आपल्या वर्गात ?

**बाळू** : देशपांडे ?

**सुभाष** : हं, त्यानं घेतले. घरीं अडचण आहे म्हणाला. मित्रासाठीं मन कळवळलं, दिले. माझ्या जागीं तूं असतास तर तूं नसतेस का दिले ?

**बाळू** : द्यावेच लागतात. अडचणींत मित्रांना मदत करायला नको ?

**सुभाष** : तर आतां नेमकी हिला द्यायला भाऊबीज नाहीं. तिला वाटेल माझं तिच्यावर प्रेम नाहीं. तुझ्या संगतींत राहून अभ्यास केला असता, तर मीहि लागलों नसतों का नोकरीला ! कशाला अडचण आली असती ?

**बाळू** : खरेंच तें. तूंसुद्धां पर्मनंट झाला असतास; वर्षाची महागाई मिळाली असती दोनशें पन्नास रुपये.

**सुभाष** : तुला मिळाली ?

**बाळू** : अरे, चांगल्या संगतीचें आणि मेहनतीचें फळ मिळतेंच हो.

**सुभाष** : माझें सुद्धां बरेंच येणें आहे त्या रंगरावाकडून. दिवाळीचा हिशोब झाला कीं ते पैसे घेतों, आणि तुझ्या सांगण्याप्रमाणें देतों त्याची संगत सोडून. मग मलाहि एक दिवस नोकरी लागेल, मग मीहि पर्मनंट होईन. मग मलाहि वर्षाची महागाई मिळेल एकदम दोनशें पन्नास रुपये. तोंपर्यंत माझं एक काम करतोस ? पांच रुपये देतोस उसने ? ताईला सांगूं नकोस हो. नाहीं तर उसने घेतलेले पैसे म्हणून ती भाऊबीज घ्यायची नाहीं. पाच-सहा दिवसांत देऊन टाकीन.

**बाळू** : परत दे हो मात्र. धाकट्या भावाची फी भरायची आहे, त्यांत अडचण नको.

**सुभाष** : नाहीं, तुझी अडचण असेल तर नको देऊंस.

**बाळू** : नाहीं, तसं नाहीं. पैसे घे. बाबासाहेबांच्या मुलाकरितां एवढी अडचण करायला नको ? जातात कुठें पळून ? पण संगत चांगली ठेव हो !

तुलाहि नोकरी लागेल. अरे, चांगल्या संगतीचें आणि मेहनतीचें फळ हें मिळतेंच. घे बघू पैसे.

**सुभाष :** घेतों, तूं इतका आग्रह करतोस तर घेतों. पण ताईला सांगू नकोस.

( पैसे खिशांत घालीत असतांना ताई येते. )

**ताई :** काय सांगूं नको म्हणाला रे मला तो ?

**सुभाष :** मी कविता करतों हें तिला सांगूं नको असं म्हणालों.

**ताई :** हो, कविता करतो म्हणे, विश्वास बसेल का जगाचा. दिवसाउजेडीं तोंड लपवायचं आणि चांदण्यावर कविता करायच्या. कारण मनांत तेंच ना नेहमीं. चांदणं.

**सुभाष :** चोराच्या ! ऐकलेंस बाळू, आमच्यावरचा विश्वास.

**ताई :** खिशांत काय घातलेंस तें ?

**सुभाष :** कागद आहे.

**ताई :** कसला कागद ?

**सुभाष :** तुझा विश्वास बसायचा नाहीं म्हणून सांगितलं ना ? कवितेचा कागद आहे; मी एक कविता-संग्रह लिहितोंय्— ' वाहतों ही दूर्वांची जुडी'.

**ताई :** दिवे ओवाळा !

**सुभाष :** ओवाळा. त्यांतलीच एक कविता केली आहे ! याला म्हणून दाखवीत होतों ! होय कीं नाहीं रे बाळू ?

**ताई :** होय रे बाळू ?

**बाळू :** तुला सांगूं नको म्हणून सांगितलेन् यानें. उगाच खोटें कशाला बोलूं ? म्हणून कांहीं दाखविली नाहीं. आतां असेल त्याच्याजवळ कविता, तर असेलहि कविता.

**सुभाष :** अग पण, माझ्यावर विश्वास कां ठेवत नाहीं कोणी ? याला पाहून मला माझं बालपण आठवतं—

**बालपणींचे दिवस सुखाचे आठवती घडीघडी,**
**आठवणींना आठवणींची वाहतों ही दुर्वांची जुडी ॥**
**बालपणींचे सखे सोबती, आठवणींना अजून खोवती**
**कांहीं सज्जन कोणी दुर्जन, तरुण कोणी कुणी वृद्ध पण**
**या सर्वांनीं विविध गुणांनीं जशी घडविली**

**तशीच घडली, आयुष्याची घडी,**

**वाहतों ही दुर्वांची जुडी ॥**

**बाळू** : हुशार हो, हुशार, बाकी हूड. याची कविता तर राहिलीच; यालाहि समजणें अवघड. छान केलीस हो कविता, कळाली नाहीं. पण केलीस छान. बरं ताई, येतों. चिंता करूं नकोस. मी ठेवेन लक्ष बरोबर. अरे भाऊ, येतों ! चार-पांच दिवसांनीं भेटेन. कळलें काय ?

**सुभाष** : माझ्या लक्षांत आहे.

**ताई** : काय लक्षांत आहे ?

**सुभाष** : आत्तां केलेली कविता– [ बाळू जातो. ताई दरवाजापर्यंत त्याला पोहोंचवायला जाते. एवढ्यांत सुभाष उठतो. ताई स्वैंपाकघरांत जाणार अशी संधि साधून सुभाष बाहेर जाऊं लागतो. ]

**ताई** : सुभाष !

**सुभाष** : आं... हो...

**ताई** : कुठं निघाला होतास ?

**सुभाष** : मी नाहीं.

**ताई** : असा माझ्यासमोर उभा राहा.

**सुभाष** : काय आहे ?

**ताई** : कुठं गेला होतास रात्रभर ?

**सुभाष** : रात्रीं कुठं, मी पहांटे गेलों होतों पळायला.

**ताई** : सुभाष, खोटं बोलूं नकोस.

**सुभाष** : आम्ही नेहमीं बोलतों तें खोटं. आई गेल्यापासून आम्हांला कोणी नाहीं. करा आमचा छळ !

**ताई** : कांगावा करूं नकोस. छळतो आहेस तूं बाबांना म्हातारपणीं. ( कान धरून त्याला तुळशीपुढं नेते. ) राहा आईपुढें उभा, घे तिची शपथ आणि सांग मला रात्रभर घरांत होतों म्हणून–

**सुभाष** : चुकलं माझं. पुन्हां मी असं करणार नाहीं. बाबांना सांगूं नकोस.

**ताई** : कुठं होतास तूं रात्रभर ?

**सुभाष** : तमाशाला गेलों होतों. भैरोबाच्या टेकडीवर, जत्रा होती तिथं. लावण्या ऐकायला.

**ताई :** तमाशाला !– लावण्या ऐकायला ! ! गेल्या वर्षीं बाबांनीं बंदी केली होती ना रे तुला तिथं जायला ?

**सुभाष :** म्हणूनच गेलों होतों मुद्दाम. न बघण्यासारखं काय आहे तें पाहण्यासाठीं. सगळं जग जातं, मग आम्ही गेलों तर काय बिघडलं ?

**ताई :** सगळं जग म्हणजे ?

**सुभाष :** खूप माणसं होतीं. समोरचा गुरवसुद्धां होता. रंगरावदेखील आला होता. म्हणून मीहि गेलों होतों.

**ताई :** त्याच्याबरोबर तूं आणि तें तुझं जग. अरे पण त्या माणसांच्या बरोबर तूं राहूं नयेस असं वाटतं बाबांना. त्यांच्याबरोबर कां फिरत असतोस तूं नेहमीं ?

**सुभाष :** काय वाईट आहे त्या माणसांत ? आमचे मित्र तेवढे वाईट.

**ताई :** नाहीं, तुझे वडील आणि ताई हीं सोडून सगळीं माणसं चांगलीं आहेत जगांतलीं !

**सुभाष :** असं कुठं म्हटलं मीं ?

**ताई :** त्या रंगरावाबरोबर फिरणार नाहीं, त्याच्या हॉटेलांत जाणार नाहीं असं कबूल केलं होतंस ना तूं ?

**सुभाष :** त्यानं काय नुकसान केलंय तुमचं ?

**ताई :** त्यानं नुकसान केलंय तुझं !

**सुभाष :** मुळींच नाहीं. उलट शाळेंतून रस्टिकेट झाल्यापासून त्याच्याइतकं कुणींच जवळ केलं नाहीं मला. उलट बाबांना मदत व्हावी म्हणून तो किती धडपड करीत असतो ! बाबांचं नांवसुद्धां मीं रिकमेन्ड केलं होतं त्याच्याजवळ.

**ताई :** तूं बाबांचं नांव रिकमेन्ड केलं होतंस ?

**सुभाष :** त्यानं बाबांना वकिली द्यावी म्हणून.

**ताई :** हो. आला होता तो सकाळीं इथं.

**सुभाष :** बघ, मीं सांगितलं नाहीं ?

**ताई :** हो, म्हणूनच भांडण करून गेला बाबांच्याजवळ.

**सुभाष :** हो, ते बोलले असतील त्याला कांहीं तरी. माझा मित्र आहे ना तो.

**ताई :** हो, मित्र आहे ना तुझा, म्हणूनच उधारी मागून गेला बाबांच्याजवळ तूं केलेली.

**सुभाष :** बाबांच्याजवळ ? हलकट ! एवढ्यासाठीं लवकर परत आला होय ? साला ! काढतों त्याचा कांटा, पुन्हां भेट तर होऊं दे !

**ताई :** कसली भाषा बोलतोस सुभाष ? कुठें शिकलास रे ? तूं एका प्रतिष्ठित वकिलाचा मुलगा आहेस. दरोडेखोरांच्या टोळींत का सामील होणार आहेस ? कसले शब्द बोलतोस ? आपल्या भविष्याचा कधीं विचार केलास का ? जिथं जावं तिथं बाबांना तुझ्यापायीं मान खालीं घालावी लागते. प्रत्येक ठिकाणीं तुझं देणं. प्रत्येक दुकानीं तुझी उधारी. कांहीं दिवसांनीं बाबांना गांवांत तोंड दाखवणं अवघड होऊन बसेल, तुझ्यापायीं. असं करूं नये रे सुभाष, आई नाहीं आहे आपली घरांत. बाबासुद्धां आतां थकलेत.

**सुभाष :** ताई, माझं चुकलं. पुन्हां मी असं करणार नाहीं.

**ताई :** प्रत्येक वेळी तूं असंच बोलतोस. आणि रागारागानं बोलायला जावं, तर अशी केविलवाणी मुद्रा करतोस कीं, दगडालाहि तुझी कींव यावी, त्यानंहि तुझी बाजू घ्यावी. बाबांना त्रास होऊं नये, म्हणून प्रत्येक वेळीं मी तुझी बाजू घेतें. चार दिवस सरळ वागतोस, पुन्हां तुझं आपलं ये रे माझ्या मागल्या. बाबांच्या सगळ्या आकांक्षांवर पाणी पाडलंस. वकिली बंद केल्यापासून तुझे सगळे अपराध आईपासून दडवून आईचेच दागिने विकून त्यांनीं तुला शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. आणि सुभाष, शेवटीं फी बुडवली या आरोपाखालीं तूं शाळेंतून रस्टिकेट झालास. मी खात्रीनं सांगतें सुभाष, बाबांनीं बोलून दाखवलं नाहीं, पण हीच गोष्ट आईला कळली आणि हाय खाऊन ती गेली ऐन दिवाळीच्या दिवशीं. मी तुला सांगून ठेवतें सुभाष, बाबांचा स्वभाव तुला कळला नाहीं, तू कधीं कळून घेतला नाहींस. एखादे दिवशीं असह्य झालं तर तुलाच काय, पण मलाहि न कळवतां ते या घरांतून जातील ! मग तुला त्यांची किंमत कळेल.

**सुभाष :** नाहीं, तसं नाहीं ताई ! आज दिवाळी आहे, मी खरंच सांगतों ताई, यापुढं मी त्यांना हवा तसा वागेन, ते सांगतील तें काम करीन, ते म्हणत असतील तर मी पुन्हां शिकेन, म्हणतील तर म्हणतील तिथं नोकरी करेन. अगदीं आईच्या साक्षीनं सांगतों.

( बाहेरून बाबा येतात. )

**ताई :** ( सुभाषच्या हातांतला रुमाल पाहून ) भाऊ ! काय झालं रे तुझ्या हाताला ?

**सुभाष :** काहीं नाहीं ! वाटेंत येतांना लोखंड्यांच्या लाकडांच्या वखारीला आग लागली होती ती विझवायला गेलों होतों. तिथं जळतं लाकूड हातावर पडलं आणि हात भाजला !

**ताई :** आई ! आई ! औषध तरी लावलंस कीं नाहीं ?

**सुभाष :** नाहीं ! मला कांहीं जास्त भाजलं नाहीं ! ते बाबा आले ! बाबा, मला तुमच्याशी कांहीं बोलायचं आहे !

**बाबा :** ताई, रात्रभर हा मुलगा कुठं गेला होता ?

**ताई :** कुठं नाहीं बाबा ! लोखंड्यांच्या वखारीला आग लागली होती, ती विझवायला गेला होता ! बघा ना बिचाऱ्याचा हातसुद्धां भाजला आहे !

**बाबा :** घरांत आगी लावा आणि बाहेरच्या विझवा !

**ताई :** पण यापुढें तो चांगला वागणार आहें बाबा ! धर रे बाबांचे पाय, चुकलों म्हण, मला आतां जें जें बोललास तें तें सगळं बाबांना सांग—

**सुभाष :** बाबा, माझं चुकलं !

**बाबा :** ताई, मला तुला कांहीं सांगायचं आहे, तूं जरा आंत चल ! मी जरा शांत चित्तानें वाचीत बसणार आहे देवघरांत—

**सुभाष :** बाबा, माझं जरा ऐकून तरी घ्या. ( बाबांच्या पायां पडतो. )

**बाबा :** ( आंत जातांना— )

> **अनुदिनिं अनुतापें, तापलों रामराया...**
> **परमदिनदयाळा नीरसीं मोहमाया**
> **अचपल मन माझें नावरें आवरीतां...**

( म्हणत बाबा आंत निघून जातात व पाठोपाठ ताईहि आंत जाते. )

**सुभाष :** ( दरवाजापर्यंत जाऊन ) बाबा, माझं चुकलं ! क्षमा मागायला जावं तरी शिक्षा करतात. ( तुळशीजवळ जाऊन बसतो. ) आई, कां ग गेलीस तूं मला एकट्याला सोडून ? तूं माझं निदान ऐकून तरी घेतलं असतंस. आई, मी अगदीं वाईट आहें, वाईट आहें, वाईट आहें ! काय केलं मीं जगांत जन्माला येऊन ?

संस्कारांची कधीं न केली चिंता ।
खंत न चारित्र्याची ।
आयुष्यावर पुरी लगटली माळच दुष्कृत्यांची ।
त्या माळेंतुन नित्य मोजतों मी कृतकर्माच्या घडी ।
वाहतों ही दुर्वांची जुडी ॥

**ताई** : ( बाहेर येऊन ) सुभाष, तूं रडतोस ?

**सुभाष** : ताई, माझं चुकलं.

**ताई** : आणखी किती चुकणार आहेस ?

**सुभाष** : काय झालं ?

**ताई** : बाबा आतां पानसरे वकिलांच्याकडून आले. त्यांच्या बायकोकडनं पांच रुपये उसने आणले होतेस ?

**सुभाष** : मी पण, ताई—

**ताई** : खोटं बोलूं नकोस, खरं सांग.

**सुभाष** : घेतले होते.

**ताई** : सुभाष, कां घेतलेस ?

**सुभाष** : ते आमच्या ओळखीच्या मुलानें मागितले होते.

**ताई** : कोण मुलगा ?

**सुभाष** : देशपांडे व्ही. ई.

**ताई** : मास्तरांचा वसंत काय ?

**सुभाष** : हो.

**ताई** : तो कशाला आला होता तुझ्याकडे पैसे मागायला ?

**सुभाष** : औषधासाठीं पैसे हवेत म्हणाला. त्याची आई आजारी होती.

**ताई** : उगीच कोणाची तरी आई आजारी पाडूं नकोस. थांब, विचारतें त्याच्या घरीं जाऊन.

**सुभाष** : नको, तो गांवाला गेलाय, त्यानं पैसे दिलेत मला आणून.

**ताई** : केव्हां ?

**सुभाष** : गांवाला जाण्याच्या आधीं. ( खिशांतून पैसे काढून दाखवितो. ) हे बघ, आमच्यावर कुणाचा विश्वासच नाहीं. आम्ही बोलतों तें नेहमीं खोटं. आम्हांला एकदां हाकलून द्या घरांतून. ( रुसून खाटेवर जाऊन बसतो. )

**ताई** : ( त्याच्याजवळ येत... ) अरे, तसं नाहीं म्हटलं मीं, पण बाबांची किती मान खाली झाली असेल ! दिलेत ना त्यानं पैसे, सांगतें बाबांना. काढतें त्यांची समजूत. पण तूं रुसूं नकोस बाबा. माझे दोन्हींकडून हाल ! अरे, मी तुझ्या वाइटाचं का सांगतें ? चांगल्यासाठींच सांगतें ना ? ए सुभाष, सुभाष, एवढं नाहीं का ऐकणार माझं ? तुझी चूक नाहीं बाबा, चूक माझी ! सुभाष, सरस्वती भेटली होती मला दामल्यांची. तुझी आठवण काढत होती.

**सुभाष** : ( अर्धवट हंसत हंसत ) मला हंसविण्यासाठीं बोलतेस ना हें ? पण ताई, तूं चांगली आहेस. मी खोटा आहें. खोटं बोलतोंय. वाईट आहें. कळतंय तरी बोलतोंय.

**ताई** : नाहीं रे बाबा, मीं उगीचच तुझा संशय घेतला. दे बघूं ते पैसे इकडे. बाबांना नेऊन देतें– म्हणजे त्यांची समजूत पटेल.

**सुभाष** : नाहीं, पैसे नको, ते मी नेऊन देईन ज्याचे त्यांना.

**ताई** : पण पैसे दाखविल्याशिवाय बाबांचा विश्वास नाहीं बसायचा.

**सुभाष** : घे एकदांचे–( असं म्हणून खिशांतले पैसे बाहेर काढतो. पैशां-बरोबर एक पाकीट बाहेर पडतें.)

**ताई** : पाकीट रे कसलं ?

**सुभाष** : अग मी विसरलोंच, पहांटे येतांना पोष्टमननं तार दिली बाबांच्या नांवाची.

**ताई** : तार कसली ?

**सुभाष** : बाबांची तार, मी कशी फोडूं ?

**ताई** : वाच आधीं. कसली तार आहे कोणास ठाऊक ? एखादे दिवशीं भयंकर नुकसान करून ठेवणार आहेस घराचं ! कसली तार आहे, वाच आधीं. बाबा देवघरांत बसले आहेत.

**सुभाष** : ( वाचतो. ) ताई– ( हुंदका देतो. )

**ताई** : अरे काय आहे ? काय झालं तें सांगशील कीं नाहीं ?

**सुभाष** : गोखल्यांची तार आहे. बोलणीं पक्कीं करण्यासाठीं येत आहेत. ताई, तुझं लग्न ठरलंय !

**ताई** : मग मेल्या, रडायला काय झालं ?

**सुभाष** : बाबा माझ्याशीं बोलत नाहींत, आई तर नाहींच. पण ताई, तूं

गेल्यावर मला कोण ?

**ताई :** बाबांना नेऊन दे तार.

**सुभाष :** मी देणार नाहीं. बाबा माझ्यावर रागावतील. तूंच दे नेऊन.

**ताई :** अरे, मी कशी नेऊन देऊं ?

**सुभाष :** कां, नांव घ्यावं लागेल म्हणून ?

**ताई :** नांव म्हणजे ?

**सुभाष :** नांव नाहीं का त्यांचं तारेंत, अविनाश गोखले. बाबांना तार नेऊन द्यायची, म्हणजे नांव घ्यावं लागेल ना त्यांचं हातांत देतांना, म्हणून लाजतेस ?

**ताई :** चांबरटपणा करूं नकोस, तार दे नेऊन बाबांना.

**सुभाष :** देणार नाहीं, नुसती लांबून टाकेन. कारण बाबा देवघरांत बसलेत आणि देवघरांत जायची मला लाज वाटते. मग बाबा ती वाचतील, मग ती मंडळी येतील. कोण कोण आहेत ग घरीं ?

**ताई :** मला नाहीं ठाऊक.

**सुभाष :** म्हणजे नवरा मुलगा असेल, आई असेल, म्हणजे त्याची. त्याची म्हणजे त्यांची, म्हणजे तुझी सासू. सासरा असेल. मग ते येतील, मग साखर-पुडा होईल. मग मांडव, भटजी, मंगलाष्टकं, सनई, चौघडा, लग्न, घर भरून माणसं येतील, जमतील, मग एक दिवस मांडव रिकामा. सगळीं माणसं घरांतून जातील, ताईला घेऊन जातील. मग घरांत आम्ही दोघंच, न बोलणारे बाबा आणि न ऐकणारा सुभाष. आमचं कांहीं नाहीं, पण ताई, तुझा छळ होईल का ग सासरीं ? नाहीं होणार. मी सांगेन तुझ्या सासूला, आमची ताई चांगली आहे म्हणून.

**ताई :** तूं जा बघूं घरांत, साबण आणि टॉवेल आण, पलंगपोस आण, त्या खाटेवर टाक. जा, जा लवकर.

**सुभाष :** ते येणार म्हणून ?

**ताई :** जातोस का नाहीं—( सुभाष आंत जातो. ) मी त्याच्या अपराधा-वर पांघरूण घालतेंय, म्हणून बाबा रागावतात; पण परमेश्वरसुद्धां असाच नाहीं का ? क्षणापूर्वीं येऊन गेलेल्या दुःखावर, सुखाचं पांघरूण आणि क्षणिक सुखावर पुन्हा दुःखाचं पांघरूण. ( दरवाजांत एक पठाण येऊन उभा राहतो. )

**पठाण :** किधर है वो लडका ?

**ताई :** कोण बाबा, कोण हवंय तुला ?

**पठाण :** वह देवधर वकीलका लडका किधर है ?

**ताई :** कोण ? सुभाष ?

( सुभाष आंतून येतो. त्याला पठाण दिसलेला नाहीं. )

**सुभाष :** हो, बाबांनीं तार वाचली, घड्याळ पाहिलं आणि पुढें ज्ञानेश्वरी वाचायला लागले.

**ताई :** हा कोण आलाय बघ तुझ्याकडं.

( सुभाष पलंगपोस खाटेवर फेकून, बादली पुढें घेऊन नळापर्यंत येतो आणि पठाणाला पाहून— )

**सुभाष :** कोण, लाला ?

**पठाण :** ( आंत येत ) मैं हूँ लाला !

**ताई :** घरांत नको येऊं बाबा, समोरचे लोक पाहात असतील. कशाला आलास ?

**पठाण :** वह पैसा कब देगा छोकरा ? पैसा लेते वक्त लाला लाला कहता है और देते वक्त मुँह काला करके भाग जाता है ! पैसा कब देगा ? आज हम पैसा लेके जायगा. पैसा नहीं देगा, तो चौकमें जाकर बोंब मारेगा, इज्जत निकालेगा !

**ताई :** बाबा, तूं या घरांतून जा.

**पठाण :** काय को जायेगा, पैसा लेके जायेगा !

**ताई :** कसले रे पैसे सुभाष ?

**सुभाष :** मी घेतले होते.

**पठाण :** पूछो इसको, पैसे लेके जाता है, बादमें मुँह छिपाता है !

**ताई :** हळू बोल बाबा, हळू बोल. माझे वडील देवघरांत बसलेत. त्यांच्या कानांवर तुझे शब्द पडले तर ते जिवाचं बरंवाईट करून घेतील. तूं आधीं या घरांतून जा व आणखी पंधरा दिवसांनीं ये. मी करतें कांहीं तरी व्यवस्था.

**पठाण :** तुम करेगा ? पैसा देगा ?

**ताई :** देईन बाबा, देईन. पण आता तूं या घरांतून जा.

**पठाण :** जाता है, फिर आयेगा. पंधरा दिनके बाद आयेगा. ए छोकरेको

म्हणालना. बडे घरका लडका है, पठाणसे पैसे कभी नहीं लेना, पठाणका जात बडा म्हणराब रहता है.

( पठाण जातो, ताई मटकन् तुळशीजवळ बसते, पायांतला त्राण गेल्या-सारखी, नजर एकटक कुठें तरी लावलेली... )

**सुभाष** : ताई, ए ताई, ताई. बोल ग माझ्याशीं कांहीं तरी. ताई, ए ताई, माझं चुकलं, पण तूं बोल. अशी रुसून बसूं नकोस. कांहींहि बोल, रागाव माझ्यावर, माझ्या मुस्कटांत मार. ताई, ए ताई, मला तुझी भीति वाटते. ताई ग, मी काय करूं, ताई—

**ताई** : सुभाष— कशासाठीं पैसे घेतले होतेस तूं ?

**सुभाष** : फार जणांचे पैसे द्यायचे होते. रंगरावचे बिल, लायब्ररीची फी, आणखी किती तरी माणसं. म्हातारपणीं त्या गोष्टी बाबांना कळून त्यांना त्रास होऊं नये म्हणून.

**ताई** : असल्या माणसाकडून पैसे घेतलेस ? अरे, पण दिवाळीच्या दिवशीं पठाण आपल्या घरांत आला, हें समोर कळलं तर— समोरचा गुरव गांवभर शिंग फुंकत जाईल आपल्या घरच्या बेअब्रूचं, याचा कांहीं विचार केलास का ?

**सुभाष** : माझी चूक झाली. बाबांना सांगूं नकोस.

**ताई** : अरे, बाबांना सांगेन म्हटलं तरी माझ्या जिभेचा दगड होईल. किती पैसे घेतले होतेस ?

**सुभाष** : घेतले होते थोडे, पण सगळं व्याज मिळून, तो आतां तीनशें रुपये मागतोय !

**ताई** : तीनशें ! अरे चांडाळा, मी कुठून इतके पैसे देऊं ? आणि बाबा तरी... तूं एक दगड घे— बाबा देवघरांत बसलेत, त्यांच्या डोक्यांत नेऊन घाल. म्हणजे जिवंतपणीं तुझ्याकडून मिळणाऱ्या यातनांतून तरी वांचतील ! मुलां-मुलींना जन्म द्यायचा तो यासाठीं. सुखाची तरी कोणती अपेक्षा करायची त्यांनीं आपल्यापासून ?

( दारांत एक वृद्ध विधवा... शारदाबाई गोखले... उभी आहे. हातांत फिरकीचा तांब्या. )

**शारदा०** : देवघरांचं घर हेंच कां मुलांनो ?

**सुभाष** : होय. कोण पाहिजे ?

**शारदा०** : मी शारदाबाई गोखले, आमची तार नाहीं का मिळा बे
**सुभाष** : तार ? अग ताई ! सासूबाई ! आणखी नाहीं कुणी आले ख
**शारदा०** : अविनाश टांग्याचे पैसे चुकते करतोय्.
**सुभाष** : मी बाबांना सांगून येतों. ताई, दार उघड !
**ताई** : आपण आंत यावं. ( तपेलीभर पाणी काढून तिच्यापुढें ठेवते, सासूनें पाय धुतल्यावर मग पायां पडते... )
**शारदा०** : सौभाग्यवती हो बाळ !
( अविनाश सूटकेस घेऊन दारांत येतो. ताईची व त्याची नजरानजर होते. एक क्षण. ताई मान खालीं घालते. )
**ताई** : बाबांना देते हो पाठवून. ( ती आंत जाते. )
**शारदा०** : अविनाश, ही मुलगी करायची ना रे ?
**अविनाश** : म्हणजे काय आई, तूं पाहिलीस, पसंत केलीस आणि कारायची असं ठरवूनच तर आपण इथं आलोंत !
**शारदा०** : तें झालंच रे, पण माझं म्हणणं इथल्या संस्कारासाठीं करायची. हात-तोंड घे धुऊन. ( अविनाश अंगणांतल्या मोरींतील नळ सोडून पाय धुतो. ) इथं आल्यावर कसं प्रसन्न वाटलं, नाहीं ? घरंदाजपणाची छाया, घराच्या अवघ्या वास्तूवरच पडलेली असते.
**अवि०** : पण आई, बाबांच्या मागं इतक्या घाईनं कार्य उरकायचं, म्हणजे मनाला जरा अवघड वाटतं, नाहीं ग ?
**शारदा०** : अरे बाबा, प्राक्तनाचं टळलंय् का ? वर्षाच्या आंत नाहीं उरकलं, तर पुढं तीन वर्षं थांबावं लागतं, म्हणून घाई. नाहीं तर हौस का आलीय कोणाला, वर्षभरांत. जाणाऱ्याची छाया जागी असते घरावरची असं म्हणायचं आणि त्याच्याच इच्छेनं हें स्थळ पदरीं पडतंय असं समजायचं.
**अवि०** : पण आज बाबांची फार आठवण होतेय नाहीं ? ( सुभाष येतो. )
**सुभाष** : बाबा येताहेत.
**अवि०** : आंऽ !
**सुभाष** : ज्ञानेश्वरी वाचत होते. मी घेऊं सूटकेस ? नीट ठेवतों. या ना. बसा ना, इथं बसा. इथं म्हणजे आंत अंधार आहे जरा म्हणून इथं. वर आहे माडी, पण तिथं बाबा बसतात, म्हणजे वकिलीचं काम असतं तेव्हां,

म्हणजे होतं तेव्हां. आई, तुम्ही इथंच बसतां, कीं आंत येतां स्वैंपाकघरांत ? म्हणजे माजघराच्या पुढें स्वयंपाकघर, मग आंत देवघर आणि मग परस... खूप मोठं आहे घर आमचं. बसा— बाबा येताहेत.

**शारदा०** : नांव काय मुला तुझं ?

**सुभाष** : सुभाष, म्हणजे देवधरच, म्हणजे ताईचा मी भाऊ, पण माझ्याकडे पाहून ताईला नका हं ती कशी आहे तें ठरवूं. म्हणजे ती चांगली आहे, दिसायलासुद्धां. आणि सगळं काम करते घरांतलं. आई गेल्यापासून तीच आई आहे घरांतली. म्हणजे आमचे बाबासुद्धां चांगले आहेत; रागावत नाहींत तिला कधीं, मलासुद्धां नाहीं, पण माझं वेगळं. ते मोठे आहेत ना, फार मोठे आहेत, आज मी खूप बोलतोंय काय हो ?

**अविनाश** : नाहीं, नाहीं, बोला तुम्ही.

**सुभाष** : उगीच नाहीं बोलत. मला आनंद झालाय् ना खूप म्हणून— आनंद म्हणजे लग्नाचा म्हणून नाहीं, तो तर आहेच, पण तो माझ्यापेक्षां ताईला जास्त व्हायला हवा. लग्न म्हणजे बदल, आयुष्यांतला. तिचा आनंद निराळा, म्हणजे कोषांतून बाहेर आल्यावर, सुरवंटाचं फुलपांखरूं होतांना, त्या सुरवंटाला कसा आनंद होत असेल ?

**अविनाश** : कांहीं कल्पना नाहीं.

**सुभाष** : म्हणजे फुलांच्या पाकळ्यांचे पंख, शरिराला चिकटल्यावर, शरीर कसं होत असेल, हलकं फूल झाल्यानंतर हवेंत तरंगण्याचा आनंद घेतांना आधींच्या कांटेरी सुरवंटाला काय वाटत असेल ?

**अविनाश** : अवघड आहे प्रश्न !

**सुभाष** : आहे ना गंमत, पण माझी एक ' आयडिया ' आहे.

**अविनाश** : कसली ?

**सुभाष** : म्हणजे विनोदी आहे.

**अविनाश** : असं, म्हणजे ऐकल्यावर हंसायचं का ?

**सुभाष** : नाहीं, तसं नाहीं; पण ते जुने कवि मुलींना फुलपांखरूं म्हणतात ना, तें चूक.

**अविनाश** : कां ?

**सुभाष** : म्हणजे सुरवंटाचं फुलपांखरूं होतं का नाहीं, पण या मुली लहान-

पणीं फुलपांखरूं असतात आणि नंतर त्या सासरच्या कोषांत गेल्या कीं त्यांचे सुरवंट होतात. कोणाचा स्पर्श त्यांना होणं, म्हणजे दोघांच्या अंगावर कांटा. ( शारदाबाईंना उद्देशून ) पण खरं सांगूं का, तुम्हांला पाहिलं, आणि मला आज आई आल्यासारखं वाटलं घरांत, म्हणजे माया करणारं कुणी यावं ना तसं वाटलं. म्हणजे बाबासुद्धां माया करतात, पण म्हणजे आईची माया कराल ताईवर. कराल ना ? म्हणून आनंद झालाय मला.

**अवि०** : शिक्षण किती झालंय ?

**सुभाष** : ताईचें ना ? ती मॅट्रिक झाली आहे, म्हणजे कन्याशाळेची मॅट्रिक.

**अवि०** : तुमचं ?

**सुभाष** : माझं ना ? माझं...बाबा आले. [ बाबा येतात. ]

**बाबा** : काय चाललंय ?

**सुभाष** : नाहीं, कांहीं नाहीं.

**बाबा** : बसा ना आपण. बसा. अरे सुभाष, घरांत ताईला काय मदत करतां आली तर पहा. [ तो जातो. ] कांहीं तरी अचाट बडबडत असेल ना ?

**शारदा०** : नाहीं, नाहीं; हुशार आहे मुलगा.

**बाबा** : बसा ना आपण, उभ्या कां ? पुरुषांच्या बरोबरीनं बैठकींत कसं बसायचं म्हणून ? छे, छे, अहो— झालीं आपलीं वयं. आतां या तरुण पिढीच्या मनांत जवळीक उत्पन्न करायची म्हणजे आपण सुधारणेनं त्यांच्या बरोबरीचं व्हावं लागतं. आपण बाळगतों तो संयम म्हणून, आणि तरुणांना वाटतं आपण मागासलेले. बसा आपण, बसा. ( शारदाबाई बसतात. )

**अवि०** : आमची तार केव्हां मिळाली ? रात्रींच केली तार.

**बाबा** : असं ! माझ्या हातीं आत्तां पडली. ताई सांगत होती, सुभाषला सकाळीं मिळाली. तो विसरला द्यायला. बाकी वकिली बंद केल्या दिवसापासून घरांतच असतों मी वाचीत-लिहीत.

**अवि०** : तो सगळा इतिहास कानावर आहे आमच्या, आणि खरं सांगायचं तर कायदा कांहींहि म्हणो, आपली बाजू अत्यंत खरी आहे, हें प्रत्येकाचं मत आहे. थोरल्या भावानं खून केला म्हणून विश्वनाथ सोमण जन्मठेपेवर जाण्याचं कांहीं कारण नाहीं. आपण वकिली सोडली ना तें योग्य केलंत !

**बाबा** : तुम्हांला ती केस कशी टाऊक ?

**अवि०** : कशी ठाऊक ? हिमालयाची उंची हिमालयाला कशी कळावी ? ती सह्याद्रीनंच मोजावी. आपल्या करारी स्वभावानं आमच्या पिढीच्या मनांत उत्पन्न झालेल्या आदरामुळें, आपल्याला पाहायला मिळणं हें भाग्याचं लक्षण समजतों आम्ही.

**शारदा०** : आणि निव्वळ या घराशीं संबंध जोडावा या एका हेतूनं, मीं मुलगी पाहिली, आणि आपलं नांव कळतांच, यानं पसंतीची तार केली.

**बाबा** : भाग्य ताईचं !

**शारदा०** : वर्षाच्या आंत लग्न व्हायला हवं, नाहीं तर पुढं तीन वर्षं कार्य लांबतं म्हणून ऐन दिवाळीच्या दिवशीं परंपरा बाजूला सारून, अशा अवस्थेंत आम्हांला इथं यावं लागलं.

**अवि०** : कारण घरांत आम्हां दोघांना फक्त आम्ही दोघंच आहोंत.

**बाबा** : बरं, व्यवहार म्हणून कांहीं बोलणीं ?

**शारदा०** : एकच अट, तुळशीच्या लग्नादिवशीं लग्न व्हायला हवं. कुठलाहि समारंभ न करतां एकुलत्या एक मुलाचं कार्य उरकायचं जिवावर येतं...

**बाबा** : दुःख मानलं तर डोंगराएवढं होत जातं. आल्या प्रसंगाला धीरानं उभं राह्यचं...कसलाहि समारंभ करायचा नाहीं, ही आपली लौकिक अडचण; आणि पहिलं कार्य असूनहि समारंभ करतां न येणं ही माझी आर्थिक अडचण. ( सुभाष चहाचा ट्रे ठेवून जातो. ) कन्याधन म्हणून, मुलीबरोबर तिच्या आईचा, उरलासुरला एक अलंकार...एक मोहनमाळ, यापलीकडं हुंडापांडा, मानपान, पोषाख मी कांहीं करूं शकत नाहीं; कारण माझी वकिली...

**शारदा०** : असं पाहा, धनासाठीं कन्या स्वीकारण्याइतकी, आमचीहि परिस्थिति ओढघस्तीची नाहीं. परमेश्वरकृपेनं त्यांनीं खूप मिळवून ठेवलं आणि ते– ( डोळे पुसते. ) ... याच्याहि हाताला देवदयेनं यश आहे. शिवाय आपली कन्या आम्ही स्वीकारतों आहोंत, ती या घराच्या संस्कारासाठीं. तिच्या धुतल्या पावलांचे संस्कार आमच्या घरांत यावेत; ही आणि एवढीच इच्छा. चांगले संस्कार पूर्वसुकृतानं मिळतात, पैशांनीं विकत नाहीं घेतां येत.

**बाबा** : आपलं हें बोलणं ऐकलं आणि माझी मुलगी सुस्थळीं पडल्याचं समाधान मिळालं. आतां स्वतःच्या मुलीचं जास्त कौतुक करणं हें माझ्या स्वभावांत बसणारं नाहीं. तरी पण सांगितल्याशिवाय राहवत नाहीं, म्हणून

मांगल्या हंसवी सुखास नटवी बाळे पदीं माउली
संसारीं नित नम्र ऐस जितुकी कायेसवें साउली
होतो मंगल वाद्य-नाद सुचवी; आली घटी मंगल
हर्षानें उभवून बाहु म्हणतों कुर्यात् सदा मंगलम् ।।
आलें भाग्य घरीं न कळतां, आली सुमंगल घटी
आहे नाव उभी जरा क्षणभरी, संसार सिंधूतटीं
लाभो योग्य दिशा सुमार्ग, बरवा वारा सुखाचा सम
हर्षानें उभवून बाहु म्हणतों कुर्यात् सदा मंगलम् ।।

सनई, ताशाचे आवाज अंधारांत विरत असतांना पुन्हा अंगण दिसूं लागतं. नवरा-बायको तुळशीच्या पायां पडत असतांना रेकॉर्ड ऐकूं येते...

निघालें आज तिकडच्या घरीं ।
एकदांच मज कुशींत घेई
पुसुन लोचनें आई,
तुझी लाडकी लेक आपुलें
घरकुल सोडुनि जाई,
तव मायेचा स्पर्श मागतें
अनंत जन्मान्तरीं ॥ १ ॥
निघालें आज......
पडतें पायां तुमच्या बाबा
काय मागणें मागूं,
तुम्ही मला आधार केवढा
कसें कुणाला सांगूं,
या छत्राच्या छायेखालुन
सात पावलांवरी ॥ २ ॥
निघालें आज......
येतें भाऊ, विसर आजवर
जें कांहीं बोललें,
नव्हती आई तरिही थोडी
रागावुन वागलें,

बोलायचं. माझी मुलगी ... संसार चांगला करील. रूपानं कदाचित् ती थोडी डावी असेल, पण गुणानं ती उजवी आहे. चारजणांचं कुटुंब, ती हंसतमुखानं सांभाळील. तिच्या आईनंच तिला हें शिक्षण दिलेलं आहे. हें जग अकालीं सोडून आणि लहानपणीं संसाराची जबाबदारी तिच्यावर टाकून निघून गेली. संसारांत साखरेचा गोडवा ती आणील. तिखट-मीठ चुकलं तर आपण संभाळून घ्यायचं. सासरीं कांहीं चुकलं तर तुम्ही क्षमा आम्हांला करायची. एवढाच तुमचा-आमचा करार !

**शारदा०** : खरं सांगायचं म्हणजे मनानं ठरविलेलं, शब्दाशिवाय कळणार नाहीं म्हणूनच इतकी उपचारांची देवाण-घेवाण करायची.

**बाबा** : मुलीला बोलावतों हं मी बाहेर.

**शारदा०** कशाला ?

**बाबा** : मुलाला मुलगी पाहायची असेल ना ?

**अवि०** : आईनं बघितली ना !

**बाबा** : आणि आपण ?

**अवि०** : आई मुलाचं नुकसान कसं करील ?

**शारदा०** : मुलीला मुलगा पाहायचा असेल ना ?

**बाबा** : आतां आपलंच उत्तर मीं द्यायचं तर मीसुद्धां मुलीचं नुकसान नाहीं करणार. जपातपानं जें व्हायचं नाहीं, तें योगायोगानं होऊन जातं. मग मुहूर्तवेळ बघून मी मंगलपत्रिका छापायला टाकतों.

**शारदा०** : आजपासून पंधरा दिवसांनीं हें कार्य ठरलं. (सुभाष साखरेचं भांडं घेऊन येतो.)

**सुभाष** : बाबा, मी साखरेचं भांडं आणायला विसरलों होतों.

**बाबा** : आण इकडं. तूं साखरच विसरायचास. (चमचाभर साखर अविनाशच्या हातावर देतात.) ही आमची मुलगी. आम्ही आपल्या हातीं दिली. साखरच आहे, तरी पण गोड मानून घ्या.

**शारदा०** : मुलगी आंत आहे ना, एक चमचा साखर मी तिच्या हातावर देतें म्हणजे झाला साखरपुडा.

[ त्या आंत जातात. हळूहळू अंधार पसरतो. मंगलाष्टकं ऐकूं येतात— ]

मांगल्या हंसवी सुखास नटवी बाळे पदीं माउली
संसारीं नित नम्र ऐस जितुकी कायेसवें साउली
होतो मंगल वाद्य-नाद सुचवी; आली घटी मंगल
हर्षानें उभवून बाहु म्हणतों कुर्यात् सदा मंगलम् ||
आलें भाग्य घरीं न कळतां, आली सुमंगल घटी
आहे नाव उभी जरा क्षणभरी, संसार सिंधूतटीं
लाभो योग्य दिशा सुमार्ग, बरचा वारा सुखाचा सम
हर्षानें उभवून बाहु म्हणतों कुर्यात् सदा मंगलम् ||

सनई, ताशाचे आवाज अंधारांत विरत असतांना पुन्हा अंगण दिसूं लागतं. नवरा-बायको तुळशीच्या पायां पडत असतांना रेकॉर्ड ऐकूं येते...

निघालें आज तिकडच्या घरीं।
एकदांच मज कुशींत घेई
पुसुन लोचनें आई,
तुझी लाडकी लेक आपुलें
घरकुल सोडुनि जाई,
तव मायेचा स्पर्श मागतें
अनंत जन्मान्तरीं ॥ १ ॥
निघालें आज......
पडतें पायां तुमच्या बाबा
काय मागणें मागूं,
तुम्ही मला आधार केवढा
कसें कुणाला सांगूं,
या छत्राच्या छायेखालुन
सात पावलांवरी ॥ २ ॥
निघालें आज......
येतें भाऊ, विसर आजवर
जें कांहीं बोललें,
नव्हती आई तरिही थोडी
रागावुन वागलें,

**थकले अपुले बाबा आतां**
**एकच चिंता उरीं ॥३॥**
**निघालें आज तिकडच्या घरीं...**

( रेकॉर्ड चालू असतांना ताई सगळ्यांच्या पायां पडते, फक्त भाऊ आपले पाय चोरून घेतो आणि बाहेर जातो. )

**बाबा** : ईश्वराच्या कृपेनं सर्व सोहळा पार पडला. आतां ताई, आपल्या घरीं जायचं. वडील माणसांचं ऐकायचं. इथली चिंता करायची नाहीं. वाईट कांहीं कळत नाहीं तोंवर सगळं सुखरूप समजायचं [ जरा माझी पगडी घेऊन येतों. थोडी वकिली करायची आहे. जिथं अन्याय मिळतो, तिथं न्याय मागायला येणार नाहीं असं सांगून कोर्टांत काढून ठेवली होती. आज मुलीसाठीं घेऊन येतों. ] मी येतों आहें. [ आंत जातात. ]

**ताई** : बाबा !

**शारदा०** : मुली, पूस आतां आसवं. प्रत्येक शकुंतलेच्या आयुष्यांत एक ना एक दिवस सासर यायचंच. लहानपण सगळं या घरांत काढलेलं असतं. सोडून जातांना, ऊर भरून यायचाच. माझी सासू मला म्हणाली होती, तेंच तुझी सासू तुला सांगतेय. तुझ्या मनांत इच्छा होईल त्या वेळीं तूं आपल्या वडिलांना, भावाला भेटायला येऊं शकतेस. झालं आतां ? आणखी काय हवं ?

**ताई** : एकदा पाणी घालूं पारिजातकाला ? ( सासू नुसती मान हालवते. पाणी घालून झाल्यानंतर— )

**शारदा०** : भाऊ कुठं गेला तुझा ?

**ताई** : टांगा आणायला गेला असेल !

**शारदा०** : तुझी आई तुला काय म्हणत होती ग ?

**ताई** : ताई.

**शारदा०** : मग मी तुला ताईच म्हणत जाईन. चालेल ?

**ताई** : हें काय विचारायचं ?

**शारदा०** : तुझी कांहीं हरकत नाहीं ना रे ?

**अवि०** : तुला नाहीं, पण मला नाहीं ना म्हणावं लागणार ?

**शारदा०** : कांहीं तरी बोललास, लाजून चूर झाली बघ ती. मुली, याचा स्वभावच असा थट्टेखोर आहे. देवदयेनं आणि तुझ्या आईच्या आशीर्वादानं

सगळे संस्कार पूर्ण झाले ताई. एक राहिला. जांवई ज्या वेळीं मुलीला घरून घेऊंन जातो, तेव्हां सासूनं त्याच्या हातावर दहीं द्यायचं असतं देवघरांत. तुझी आई असती, तर न सांगतांच तें झालं असतं. तेव्हां आजच्या दिवस मीच होतें तुझी आई आणि माझ्याच मुलाच्या हातावर जांवई म्हणून मीच देतें देवघरांत दहीं. ही तुळस तुझ्या आईनंच लावली होती ना ? अविनाश, एक तुळशीचं पान घे; या पवित्र प्रसंगाला साक्ष म्हणून तिची आई असूं दे बरोबर, चला. ( सगळे आंत जातात आणि बाहेरून सुभाष येतो. )

**सुभाष :**

**उलटलें आयुष्याचें पान, निघाली ताई श्वशुरगृहीं ।**
**बालपणाचें सरलें नातें, जवळचें कोणी उरलें नाहीं ।**
**हूडपणानें किती वागलों, तिची पण शांति नाहीं ढळली ।**
**काय करावें मीं तिजसाठीं, सदैव छळना केली ।**
**थोर घरांतिल घोर पातकी, काय शुभाशिस देऊं ।**
**ताई ! तुझ्या सुखास्तव ओवाळिन ही दुबळी जीवनकुडी ।**
**वाहतों......**
**अंगणांत पडल्या पडल्या मेघांच्या रांगा दिसल्या ।**
**किती राक्षस, हत्ती–घोडे, बाल्यांत कल्पना सरल्या ।**
**तें रम्य बालपण गेलें, परी मेघ नभांतच उरले ।**
**जर इथें न दिसली ताई ते मेघ उरांतच फुटले,**
**मी काय तयांना सांगूं भावाची माया वेडी,**
**वाहतों......**

( दारांत पठाण उभा राहतो. )

**पठाण :** किधर है बहन ? ओ बहन...

**सुभाष :** ए, तुम अभी जाव इधरसे । हमारी ताईका शादी हुआ है । घरमें मेहमान आया है । जाव अभी ।

**पठाण :** हम नहीं जायगा, पैसा लेके जायेगा । ( आंतून ताई धांवत येते. )

**ताई :** कोण आहे रे सुभाष ? (त्याला पाहून) आई—!

**पठाण :** आज पंधरा दिन हो गया बहन, ओ पैसा किधर है ?

**ताई :** बाबा, मी सासरीं चाललें आहें. माझ्याबरोबर माझी बेअब्रू नको

जायला. सुभाष, सांग रे त्याला कांहीं...आत्तां सासूबाई येतील देवघरांतून.

**पठाण :** तुमने वादा किया बहन, तुम जायेगा तो पैसा कोन देएगा? ए लडकेपर हमारा भरंवसा नहीं है।

**ताई :** आतां काय करायचं रे सुभाष? ( आजूबाजूला पाहून गळ्यांतील मोहनमाळ काढते आणि पठाणाला देऊन ) ही मोहनमाळ घे. माझ्या आईची आहे. मी पैसे पाठवितें आहें. याच्याकडे ती परत दे. पण आतां जा.

**पठाण :** देगा बहन, देगा। ( जातो. ताई सुस्कारा सोडते. )

**ताई :** सुभाष, मी पैसे पाठवितें, यालाच दे. मोहनमाळच घे आणि मलाच पाठव.

**सुभाष :** हो.

**ताई :** सुभाष, मी चालल्येंय. बाबा एकटे आहेत, सांभाळ.

[ आंतून बाबा पगडी घालून येतात. मागोमाग शारदाबाई व अविनाश येतात. ]

**बाबा :** कोण आले होते ग ताई?

**ताई :** कोणी नाहीं. माझ्या ओळखीचा नव्हता. कुठला तरी माणूस कुठला तरी पत्ता विचारीत होता. त्याचा पत्ता मीं त्याला सांगितला.

( सगळे बाहेर बघतात. पडदा पडतो. )

# अंक दुसरा

[ ताईचें सासर. माजघरांतील दृश्य. वेळ सकाळीं लग्न झाल्यानंतर ३–४ महिन्यांनंतर. रंगभूमीच्या उजव्या हाताला म्हणजे प्रेक्षकांच्या डाव्या– बाहेर जाण्याचा दरवाजा आणि मधला दरवाजा आंतल्या स्वयंपाकघरांत जाण्याचा. ताई बूट पुसून दाराशीं ठेवते. कपाटांतील कोट काढून ब्रश मारून बाहेरच्या हँगरला लावते. नंतर काय वाटतें कोणास ठाऊक, चप्पल पुसून ताई त्याच बुटावर ठेवते. हें सगळें चालूं असतांना आपल्याशींच गुणगुणते, " लेक भाग्याची भाग्याची आहे सुखी दिल्याघरीं। माहेराची माया मला मिळाली सासरीं ..." अविनाशला घेऊन शारदाबाई आंतल्या दाराशीं येतात, तिचं काम दाखवून त्याला थांबवून आत्रण पुढं येतात. ]

**शारदा०** : ( अविनाशला उद्देशून ) पाहा– ( अविनाश पाहतो व आंत जातो. ) सूनबाई, काय करतेस ग ?

( हातांत तांदळाचें ताट आहे. )

**ताई** : ह्यांची दुकानीं जायची वेळ झाली, तयारी करून ठेवतें. कांहीं काम होतं ?

**शारदा०** : होय, तुझ्याविरुद्ध तक्रार होती शेजारच्या गोगटे काकूंची.

**ताई** : कांहीं चुकलं का माझं ?

**शारदा०** : आं ? हो. आज पहांटे उठलीस किती वाजतां तूं ?

**ताई** : जाग आली तेव्हां उठलें, घड्याळ नाहीं पाहिलं.

**शारदा०** : हेंच तुझं चुकलं.

**ताई** : म्हणजे ?

**शारदा०** : मुली, रात्रीं तीन वाजतां तूं विहिरीचं पाणी शेंदत होतीस, त्या गोगटे काकूंनीं पाहिलं, त्यांना राहवलं नाहीं, त्यांनीं मला सांगितलं. वेळीं-अवेळीं असं पाण्यावर जाऊं नये मुली. सगळ्यांच्या नजरा सारख्या नसतात. रात्रीं-अपरात्रीं पाण्यांतल्या आसरा जाग्या असतात. परक्याच्या घरची मुलगी आम्हीं उचलून आणलीय. इडा पिडा टळो आणि अमंगळ पळो ! मुली, इतकं अपरात्रीं पाण्यावर जाऊं नये.

**ताई** : पण मला वाटलं पांच वाजले असतील पहांटेचे.

**शारदा०** : वेळ नाहीं पहायचीस ?

**ताई** : चुकलं !

**शारदा०** : तेंच म्हणतें मी आणि माहेराहून आल्यापासून पाहातेंय मी... अशी अस्वस्थ कां असतेस तूं ? कसली चिंता आहे तुला ? घरची आठवण येते का ?

**ताई** : घरची ? नाहीं सासूबाई, माहेराहून ज्या दिवशीं सासरीं आलें त्या दिवशीं आपल्या रूपानं आई होऊन माहेरच माझं पाठीराखं होऊन आलं.

**शारदा०** : मग तूं अशी अस्वस्थ कां असतेस ? कांहीं तरी चुकल्या-चुकल्यासारखं तुला कां वाटतं ? काय कमी आहे तुला ? खरं सांग.

**ताई** : खरं सांगू ? थोडं दुःख कमी आहे. ( सासूबाईच्या हातांतलें ताट घेते. पाल चुकचुकते. )

**शारदा०** : असं बोलूं नाहीं मुली. कोण्या घडीला वळचणीला बसून सटवी ऐकत असेल. मनांत म्हणेल तिला दुःख हवं का, देऊन टाकूं; तेव्हां असं बोलूं नाहीं मुली. कोणाहि घडीला असं वेडंवाकडं बोलूं नये.

**ताई** : तसं नाहीं सासूबाई, इथं आल्यापासून सारखं सारखं सुख अति गोड जेवणासारखं झालंय. एक सांगूं का ?

**शारदा०** : सांग बघूं. [ अविनाश आंतून बाहेर येतो. ]

**ताई** : आपण मला थोडे रागावत कां नाहीं ? थोडं टाकून कां बोलत नाहीं ? थोडा सासुरवास कां करत नाहीं ? माझं कांहीं चुकतच नाहीं का ? का आपण माझे सगळे अपराध पोटांत घालतां ? या शंकेनं थोडंसं चुकल्या-सारखं वाटतं.

**शारदा०** : पण या चुकीवर रागवायचं कसं तें सांग ना ?

**अविनाश** : ( येऊन ) मलाहि तोच प्रश्न पडला होता. हिला रागवायचं कसं ?

**शारदा०** : काय झालं रे ?

**अविनाश** : आज मीं अगदीं ठरवलें होतें.

**शारदा०** : काय ?

**अविनाश** : नेहमींचे कपडे बदलून धोतर नेसून यायचं आणि हिला विचारायचं कीं धोतरावर बूट कसे घालूं म्हणून ! हिला बोलायचं, रागवायचं असं आज मीं अगदीं टरविलं होतं ! पण इथं येऊन पाहतों, तर हिनं

बुटाबरोबर चप्पलचाहि जोड काढून ठेवलेला. हिला रागवायचं कोणत्या शब्दांत आणि काय कारणानं ?

**ताई :** दोन्ही कशासाठीं काढून ठेवल्यास म्हणून रागवायचं होतं. ( दोघेहि हंसतात. )

**अविनाश :** आतां हें हंसण्यासारखं बोलली.

**ताई :** म्हणून रागवायचं होतं ?

**अविनाश :** थांब, आज तूं चहा, कॉफी, दूध कांहीं घेतलंस का ? ( ताई 'नाहीं' म्हणून मान हलवते. ) कां नाहीं घेतलंस ? कांहीं कमी आहे का घरांत ? तब्बेत बारीक झाली तर लोक आम्हांला विचारतील...मुलीला जाच होतो का सासरीं म्हणून ? म्हणजे तूं नुकसान करून घेशील स्वतःचं आणि जगाचा बोल येईल आम्हांला. कां घेतलं नाहींस दूध अजून ? बोल !

**ताई :** सासूबाई... !

**शारदा० :** अरे, पण तूं आधी घेतल्याशिवाय ती कशी घेईल ?

**अविनाश :** बघ हं आई, पुन्हां तूं हिची बाजू घेतलीस.

**शारदा० :** बाजू नाहीं तर काय ! हळवी पोर बिचारी ! डोळे भरून आले बघ तिचे. तुझी बायको म्हणून अधिकार गाजवूं नकोस, माझीसुद्धां सूनच आहे ती. ( तिच्या हातांतलें ताट घेऊन तिथेंच ठेवते. ) जा मुली, आंत जाऊन दूध घेऊन ये हो. जा माझी बाळ ! आईवेगळी पोर–( आंत जाण्याआधीं ताई दारांतल्या चपला आणून त्याच्या पायाशीं ठेवते आणि मग आंत जाते. )

**शारदा० :** पाहा किती सालस मुलगी आहे ती, कशाला बोललास रे तिला ?

**अविनाश :** अग, तें तोंडापुरतं. माझ्या मनांत आलीय एक कल्पना.

**शारदा० :** कसली रे ?

**अविनाश :** बैस. हें बघ, तिच्या चेहऱ्यावर चिंता दिसतीय ना ती कदाचित् तिच्या घराच्या काळजीनं तर नसेल ? तिच्या वडिलांची प्राप्ति तर बंद झालीय, भाऊ कुठं नोकरी करतच नाहींय, आपण जर तिच्या वडिलांना पैसे पाठवले तर ?

**शारदा० :** अरे, ते घेणार नाहींत.

**अविनाश :** ( कानांत सांगतो. ) कांहीं हरकत आहे ?

**शारदा०** : हरकत रे कसली ? अगदीं खुशाल कर. इतकंच नव्हे तर आणखी कांहीं करतां आलं तरी कर. खरं पाहिलं तर खरोखरीच लक्ष्मीच्या पावलानं आली आहे ही या घरांत. बघ ना, ही आली आणि दुकानाची प्राप्ति वाढली !

**अविनाश** : हो. ही आली आणि आपल्याला ' इंपोर्ट लायसेन्स ' मिळालं परदेशी कापडाचं. योगायोग म्हण— कांहींहि म्हण— कुठल्याहि दुकानांत नाहीं— उभ्या सांगलींत, तें कापड आपल्या दुकानीं आलं. आधींच सोन्याची विक्री थांबलेली; त्यामुळं कापड जास्त खपतंय. अग, आपल्या दुकानची विक्री पांच होती ती पंधरा हजार झालीय !

**शारदा०** : म्हणूनच म्हटलं...हस्तें-परहस्तें हिच्या घरीं थोडी मदत झाली तर अवश्य करावी, आणि वडील इतके मोठे आहेत तिचे कीं केलेली मदत बोलून दाखविणं हेंसुद्धां पाप ठरावं. अरे, महात्मा फुले, आंबेडकर, सावरकर, आगरकरांसारख्यांना वृद्धापकाळीं कुणीं कसली मदत केली तर ती बोलून दाखवायची ? जुन्या पिढीचीं हीं माणसं. त्यांनीं करून ठेवलेलीं एकेक सत्कृत्यं चार चार पिढ्यांची संजीवनी देऊन बसलीं आहेत पुढच्या पिढीसाठीं ! त्यांना मदत करणारे आपण कोण बाबा ?

**अविनाश** : अगदीं खरं आहे आई तुझं. मदत हें नांवसुद्धां कर्तव्य या अर्थासाठीं वापरायचं. मग मी करून टाकतों सांगितलं तसं. पांच–( उठतो. )

**शारदा०** : बरं पांच !

**अविनाश** : बरं आई, तो लाहोटी आला होता का आज सकाळपासून ?

**शारदा०** : कोण शिवप्रसाद ? नाहीं रे. कां ?

**अविनाश** : अग, नसतं संकट आणून टाकलंय माझ्या घरीं.

**शारदा०** : कसलं रे ?

**अविनाश** : अग, ' इमर्जन्सी चेक ' सुरू आहे सगळ्या कापड-दुकानांचा. आपल्या दुकानावरहि सांठा-मोजणी सुरू आहे. पण विक्री आणि प्राप्ति यांचा मेळ बसणार नाहीं, या भीतीनं एक लाख पन्नास हजार रुपये त्यानं काल दिलेत माझ्याजवळ खाजगी म्हणून सांभाळण्यासाठीं. दुकानांत ठेवणं मलाहि अवघड म्हणून घरीं आणून ठेवले.

**शारदा०** : कशाला घेतलीस नसती जोखीम ?

**अविनाश :** अग, काल रात्रीपर्यंत तो परत नेणार होता. मित्राचं काम म्हणून कालच्या दिवस स्वीकारलं. पण आतां मला वेगळीच शंका येऊं लागलीय.

**शारदा० :** कसली रे ?

**अविनाश :** धंद्यातलं वैभव डोळ्यावर येऊन कोणाच्या मनांत कांहीं वेडा-वाकडा विचार आला तर...आज दुकानाचं चेकिंग आहे— काळा पैसा म्हणून या कपाटाकडं बोट दाखविलं कुणीं तर बाबांनीं मिळवून ठेवलेली सगळी सचोटी धुळीला मिळेल ना !

**शारदा० :** चावी कोणाजवळ आहे कपाटाची ? ( ताई येते. )

**ताई :** माझ्याजवळ आहे. हवीय का ?

**अविनाश :** तू कां आलीस इतक्या घाईघाईनं ? माझ्या समाधानासाठीं दूध पिण्याचं सोंग केलं असशील !

**शारदा० :** हें काय रे तुझं बोलणं ? तूं बाहेर नाहीं का चाललास ?

**अविनाश :** तिला सांगितल्याशिवाय का जाणार होतों ?

**शारदा० :** तसं नाहीं रे. तुला नाहीं कळायचं बायकांचं मन. दिवसभर तूं दुकानांत आणि ही बिचारी एकटी असते घरांत.

**अविनाश :** ठीक आहे, मग उद्यांपासून दुकानांत हिला घेऊन जातों बरोबर.

**शारदा० :** म्हणजे—— मग मला चैन पडणार नाहीं घरांत.

**अविनाश :** तिच्या तोंडावर बोलूं नकोस आई. उगीच चढून जाईल.

**शारदा० :** अरे पण हेंसुद्धां तूं तिच्या नकळत बोलायला हवं होतंस.

**अविनाश :** आई, ही सून आहे तुझी का लेक ग ?

**शारदा० :** नव्हती ना लेक, ही आलीय.

**अविनाश :** म्हणून माया सगळी तिच्यासाठीं आणि मलासुद्धां ही विसरायला लागली.

**शारदा० :** आली हं तुझी अडचण माझ्या ध्यानांत. निघालें मी आंत, डाळ शिजलीय का नाहीं तें पाहतें. ( असं म्हणून जात असतांना नवऱ्याच्या तसबिरी-जवळ उदबत्ती लावते आणि आंत जाते. )

**अविनाश :** ( तिच्या पाठोपाठ दरवाजापर्यंत जाऊन ) आमची आई म्हणजे

आई आहे अगदीं ! आमच्या सुखासाठीं स्वतःचीं दुःखं विसरून आमच्या सुखाशीं अगदीं एकरूप होऊन जाते. आमची आई म्हणजे आई आहे अगदीं !

**ताई :** आई म्हणजे ?

**अविनाश :** नाहीं तर काय ? इतकं आई होणं म्हणजे कांहीं चांगलं नव्हे कांहीं ! थोडं तरी सासू व्हायला नको का ! कांहीं अधिकार गाजवत नाहीं तुझ्यावर.

**ताई :** त्यांना कां दोष देतां उगीच ! तुम्हांला तरी कुठं अधिकार गाजवतां येतो ? प्रत्येक गोष्ट माझ्या मनासारखी करतां. तुम्ही कुठं अधिकार गाजवतां ?

**अविनाश :** म्हणजे काय करायचं ?

**ताई :** ह्या बाई, तें मीच सांगूं का ?

**अविनाश :** ए बाई, मी पडलों दुकानदार माणूस. गिऱ्हाइकाशीं सौजन्यानं वागणं हें आमच्या यशाचं सूत्र. तुमचा संतोष हाच आमचा फायदा, या चालीवर. उभा होतों तो पडलों म्हणून मंत्री व्हायचा तो दुकानदार झालों. हीच संवय हाडीमाशीं खिळली. अधिकार दाखवून आणि दम देऊन वागायला लागलों दुकानांत तर काय होईल कल्पना कर... 'देतों तो कपडा घेतां का नाहीं ? चांगला कपडा आहे...मी सांगतोंय ना ! मला अक्कल नाहीं म्हणून दुकान काढलंय का ?...' असं बोलायला लागलों तर दिवसभरांत एक वारभरसुद्धां कापड खपणार नाहीं दुकानांत.

**ताई :** घरांत बायकोजवळ कसला कपडा खपवतां ? थोडं रागवावं, रुसावं, मनासारखं झालं तरी मनाविरुद्ध झालं असं दाखवायचं.

**अवि० :** हो ना, मग तुमच्या डोळ्यांतून पाणी यावं, ते आमच्या आईनं बघावं आणि आमचं चांगलं कांडात काढावं. छान युक्ति आहे ! एकटा तुझा नवराच असतों ना मी तुला घरांत तर प्रश्न नव्हता, पण इथं आल्यापासून आपल्या सासूला भारून टाकलीस ना !

**ताई :** ह्या बाई, मीं काय भारून टाकलं ? ( खुर्चीवर तांदळाचें ताट आहे त्यावर अविनाश बसणार इतक्यांत— )

**ताई :** अहो !

**अवि० :** मला तरी कुठं कळलंय ? जी माझी अवस्था तीच तिची. बरं चल. मला दुकानांत जायचंय, हें घे बघूं.

**ताई** : काय तें ?

**अवि०** : पांचशें रुपये.

**ताई** : कशाला ते ?

**अवि०** : आईनं सांगितलंय.

**ताई** : पण कशाला ? भाऊचं कांहीं पत्र आलंय का ?

**अवि०** : कुणाला ?

**ताई** : मला ?

**अवि०** : तुझीं पत्रं मी बघतों काय फोडून ? आणि तुझा भाऊ कशाला मागणार आहे पैसे ?

**ताई** : तेंच ना. तो कशाला मागणार आहे पैसे ? मग कशाला हवेत मला पैसे ?

**अवि०** : घरखर्चासाठीं म्हणून पांचशें रुपये दर महिना द्यायचे ठरले तुला.

**ताई** : पण मला खर्चच नाहीं तर करूं काय मी या पैशाचं ?

**अवि०** : काय हवं ते कर. वडिलांना पाठव.

**ताई** : बाबा कसे घेतील ?

**अवि०** : भावाला दे.

**ताई** : अं ? छे, त्याला...

**अवि०** : तूं खर्च कर. बँकेंत ठेव. वांटून टाक. तूं या पैशाचं काय हवं तें कर. यांतल्या एकाहि पैशाचा हिशोब तूं मला देतां कामा नयेस. एवढीच माझी अट. मान्य आहे ?

**ताई** : नाहीं. मला नकोत पैसे. आपण आहांत, सासूबाई आहेत. एवढं मोठं घर आहे. चार ठाव जेवण आहे. काय कमी आहे मला ? कां आपण मला अडचणींत टाकतां ?

**अवि०** : मग तूं घेणार नाहींस ? एवढीसुद्धां तुला किंमत नाहीं माझी ?

**ताई** : अहो पण...

**अवि०** : एक शब्द बोलूं नकोस. आणि दुपारीं जेवायला माझी वाट पाहूं नकोस. माझं पोट भरलं. मोठी आज्ञाधारक बायको मिळाली. फार आनंद झाला.

**ताई** : असं रागावूं नका बाई.

**अवि०** : छे, छे, संबंध काय तुझा माझा ?

**ताई** : असं नका बोलूं. द्यावेत इकडं ते पैसे. ( अविनाश पैसे देतो. ) जेवायला किती वाजतां याल ?

**अवि०** : वाट पाहशील ?

**ताई** : नाहीं, कामांत असाल तर सावकाश या.

**अवि०** : तूं जेवून घेशील ?

**ताई** : हीच माझी परीक्षा केलीत ? ( मुसमुसूं लागते. )

**अवि०** : ए, रडूं नकोस. ( आपला रुमाल डोळे पुसण्यास देतो. ) डोळे पूस. वेळेच्या आधीं येईन. तुझा शब्द मोडणं शक्य आहे का ?

**ताई** : माझ्यासमोर बोलूं नका. उगीच चढून जाईन.

**अवि०** : बरं, मी चलतों, आणि हें बघ, या कपाटाची चावी तुझ्याजवळ आहे. कुणाच्याहि समोर हें कपाट उघडायचं नाहीं. आंत फार मोठी रक्कम आहे. कुणाच्या नजरेवर आली तर माझ्या अब्रूवर गदा येईल. आलं लक्षांत ?

**ताई** : हो.

**अवि०** : येऊं मी ?

**ताई** : वेळेच्या आधीं जेवायला याल ?

**अवि०** : हो, नक्की. ( बाहेर जातो. )

**ताई** : अहो ऽऽ

**अवि०** : ( परत येऊन ) आतां काय राह्यलं ?

**ताई** : रुमाल द्यायला विसरलें.

**अवि०** : हें निमित्त का ?

**ताई** : छे, छे !

**अवि०** : मग ?

**ताई** : हा रुमाल. ( दोघेहि हंसतात, अविनाश बाहेर जातो. ताई दरवाजांत उभी राहून पाहते. )

**बाळू** : ( बाहेरूनच ) गोखले इथंच राहतात काय ?

**अवि०** : हो, कोण हवंय आपल्याला ?

**बाळू** : आमची ताई इथेंच असते काय ? ताई— वाईच्या देवधरांची मुलगी.

**अवि** : हो इथंच. अग, ऐकलंस का ? कोण आलंय् बघ तुझ्याकडे ?

**ताई :** कोण आहे ? कोण, बाळू ? ये, ये कीं रे. [ बाळू आपटे येतो. ] कसा आलास रे अचानक ?

**बाळू :** ऑफिसच्या कामासाठीं आलों. म्हटलं, आपल्या ताईचें सासर आहे गांवांत. बघून यावें, म्हणून आलों. हेडक्लार्क झालों. तुला कळालें काय ? दुसरी ॲंबिशन पुरी झाली. पर्मनंट झालों, त्या दिवशीं म्हटलें होतें मनांत कीं, एक दिवस हेडक्लार्क होईन तेव्हां बाळू आपटे नांव सांगेन. लाइफमध्यें ॲंबिशन पाहिजे.

**ताई :** आमच्या घरची कांहीं बातमी ? बाबा बरे आहेत ?

**बाळू :** बरे म्हणजे काय विचारतेस ? अजून काठी वाजली त्यांची रस्त्यांत कीं टवाळांचीं तोंडं लपून बसतात गल्लीबोळांत. असला दरारा आहे त्यांचा गांवांत. लहान गांवांत असला तरी माणूस मोठा बरें तो.

**ताई :** भाऊ कसा आहे ?

**बाळू :** हल्लीं बरा वागतो. भेटला नाहीं बऱ्याच दिवसांत. पण वागतो बरा. रंगरावाच्या हॉटेलांत नाहीं दिसला. पंधरा दिवस मी फिरतीवर आहें ना ऑफिसच्या. पण तो रंगराव मोठा वाईट माणूस हो, मी ऐकतों... हल्लीं त्याचेविषयीं.

**ताई :** तूं उभा कां ? बैस ना. एकदम दिसलास; आनंदाच्या भरांत भान नाहीं राहिलं.

**बाळू :** होतेंच हो तसें. माहेरचें कुत्रें सासरीं भेटलें तरी बरें वाटतें बायकांना, असें म्हणतात बायका घरांतल्या. मग मी तर माणूस. मित्र नाहीं का सुभाषचा ! म्हणजे तुझा भाऊच नाहीं का ? म्हणूनच आलों. तुझें सासर बघण्यासाठीं आलों. कसें आहे सासर तुझें ? बरें ?

**ताई :** फार चांगलं आहे ! माहेरच आहे दुसरं म्हणेनास !

**बाळू :** बरें झालें हो. मुलीला घर चांगलें मिळणें म्हणजे कुटुंब असलेल्या गांवांत सरकारी नोकरांस ट्रॅन्स्फर मिळण्याइतकें अवघड झालेंय हल्लींच्या काळांत. सासू कशी तुझी ? छळ करते का तुझा ?

**ताई :** आई छळ करील का मुलीचा ?

**बाळू :** कसें शक्य आहे ?

**ताई :** मग ती आईच आहे माझी.

**बाळू :** सासरीं आल्यावर नांव बदलतात म्हणे मुलीचें. आतां माझ्यावर येणार बरें प्रसंग.

**ताई :** कसला ?

**बाळू :** लग्नाचा.

**ताई :** कधीं करतोस लग्न ?

**बाळू :** मामलेदार झालों कीं केलेंच. ॲंबिशन पुरी व्हायला पाहिजे. सध्यां पगार म्हणजे कमी आणि खर्च जास्त असें आहे प्रमाण. असो; आणि नवरा कसा आहे ? ( ती बोलत नाहीं.) बोलत नाहींस ? म्हणजे चांगला आहे. चांगलें झालें हो. ताई, छान झालें ! नवरा चांगला मिळणें म्हणजे प्रामाणिकपणें नोकरी करूनहि प्रमोशन मिळण्याइतकें अवघड झालेंय हल्लींच्या काळांत. करायला जावें नवरा म्हणून आणि तो निघायचा काझी ! कळालें काय ? तुझें नांव काय ठेवलें सासरचें ? काय म्हणतात तुला सासरीं ?

**शारदा० :** ( आंतून येत ) ताई, मी जरा मारुतीला नारळ फोडून येतें. आज शनिवार आहे ना ?

**बाळू :** म्हणजे ताई म्हणतात ?

**शारदा० :** हा कोण ?—

**बाळू :** या कोण ?

**ताई :** हा बाळू आपटे, मित्र आहे आमच्या सुभाषचा.

**शारदा० :** तुझ्या माहेरचा का माणूस आहे ? अग, मग त्याला उभा कां ठेवलायस ? बैस रे मुला, बैस. ( तिथला एक पाट घेऊन बसतो. ) अरे, पाटावर काय बसलास ? खुर्चीवर बैस.

**बाळू :** छे, छे, पाटावरच बरें, खुर्चीवर बसलें म्हणजे हापिसांत बसल्या-सारखें वाटतें. पाटावर म्हणजे घरीं. त्यांतून ताईच्या सासरीं म्हणून पाटावर हो, एरवीं यांच्या घरीं आम्हीं बसायचें म्हणजे अंगणांत आणि तेंहि जमिनीवर.

**शारदा० :** जा ग ताई, त्याला कांहीं तरी गोडधोड आणून दे; का जेवायला राहतोस ?

**बाळू :** नाहीं. जेवायला नको हो.

**शारदा० :** कां रे ?

**बाळू :** नाहीं, म्हणजे भत्ता असतो ना सरकारी कामासाठीं आल्यावर,

वि. ........ बारव ........ क्र. ....................

त्यांत जेवणाचाहि भत्ता असतोच. असें कुणाच्या घरीं जेवलें आणि भत्ता घेतला म्हणजे सरकारला फसविल्यासारखें होतें. त्याचें काय आहे, लाइफमध्यें ऑनेस्टी पाहिजे.

**शारदा०** : जा ग, आण त्याच्यासाठीं कांहीं तरी.

**बाळू** : खायला नको हो. प्यायला आणलें तरी चालेल नुसतें.

**शारदा०** : चहा घेतोस का सरबत ?

**बाळू** : सरबत चालेल हो. बरें असतें हो प्रकृतीला. ( ताई आंत जाते. )

**शारदा०** : काय नांव तुझें ?

**बाळू** : बाळू आपटे. मी मित्र आहें हिच्या भावाचा. वाईसच असतों.

**शारदा०** : काय करतोस ?

**बाळू** : मामलेदार कचेरींत हेडक्लार्क झालों, हल्लींच प्रमोशन मिळालें. ॲंबिशन पुरी झाली.

**शारदा०** : असं का ?

**बाळू** : होय, म्हणजे त्याचें काय आहे, लाइफमध्यें ॲंबिशन पाहिजे. या गांवांत आलों, म्हटलें या गांवांत सासर आहे ताईचें, बघून यावें.

**शारदा०** : पत्ता कसा सांपडला ?

**बाळू** : तें सोपें. माझ्या ओळखी कचेरींतल्या लोकांच्या आणि तसें तुमचें नांवहि मोठें.

**शारदा०** : आतां आहेच. पूर्वींच यांनीं मिळवून ठेवलंय. ते असते तर खूप कौतुक झालं असतं सुनेचं.

**बाळू** : आपण काय कमी करतां कौतुक सुनेचें असें थोडेंच आहे ? ताईच्या गालांवर दिसतेंय ना सासरचें कौतुक. आपल्या मुलाचें नांव नुसतें कचेरींत विचारलें. कळलें. पत्ता शोधत आलों. सांपडलें. इथें येऊन ताई भेटेपर्यंत खात्री नव्हती हो !

**शारदा०** : कां ?

**बाळू** : त्याचें काय आहे, मागें एकदां झाली गंमत. आमच्या वेणूचें सासर आहे इस्लामपुरास.

**शारदा०** : वेणू ?

**बाळू** : बहीण माझी. तीलाहि आम्ही ताईच म्हणतों. तिचें सासरचें

आडनांव जांभेकर. तर तिचें सासर इस्लामपुरास. लहानपणची गोष्ट. अप्पांनीं मला सांगितलें. अप्पा म्हणजे माझे वडील. नाहीं तर पुन्हां विचाराल. तर ते मला म्हणाले कीं, 'फराळाचा डबा नेऊन ताईस दे इस्लामपुरास.' मी गेलों स्टँडवर आणि गाडींत बसलों. चुकून इचलकरंजी गांवांत गेलों. सिनेमासमोर तिचें घर. तिथें विचारलें, 'सिनेमासमोर जांभेकर कुणी राहतात काय?' तर कुणी म्हणाले 'हो.' तर गेलों. सिनेमासमोर तिचें घर. जांभेकरांचा बोर्ड दिसला. गेलों आंत. डबा हातांत. बसलों झोंपाळ्या-वर. समोरून आले सासरेबुवा. वृद्ध होते त्यावरून मी केला तर्क हो. त्यांनीं विचारलें, 'मुला, हवें कोण तुला?' मीं म्हटलें, 'आमची ताई.' 'बोलावतों' म्हणाले. ते आंत गेले आणि जराशानें एक बाई आली बाहेर. वय वर्षें सत्तर, मानेमध्यें थरथर, तांबडें लुगडें अंगावर. मी केला नमस्कार. मला म्हणे, 'कोण हवें मुला तुला?' मीं म्हटलें, 'आमची ताई.' तर ती म्हणे, 'या घरांत ताई एकच आणि ती म्हणजे मीच.' तसें माझ्या डोळ्यांसमोर गरगरलें. आणि मग माझ्या ध्यानांत आलें कीं, हें बेटें इस्लामपुराचें इचलकरंजी झालें. गांव बदललें पण आडनांव तेंच राहिलें. म्हणून आमच्या ताईचें हें असें झालें. लहानपणची गोष्ट.

**शारदा०** : आणि तो फराळाचा डबा?

**बाळू** : तो मीं खाल्लान् दुसरं काय? बरें. ताई कशी आहे आमची, बरी?

**शारदा०** : छान आहे हो मुला. अशी सून मिळायला भाग्य लागतं. पाय-गुणाची मुलगी हो! अरे, ही घरांत आली आणि दुकानची विक्री पांचची पंधरा हजार झाली. कुणाजवळ बोलूं नकोस हो.

**बाळू** : हां, म्हणजे कॉन्फिडेन्शल!

**शारदा०** : अरे, आणि इतकी कामाची आहे पोर कीं आम्हीसुद्धां आमच्या लहानपणीं असें नव्हतों. अरे, ही घरांत दळते.

**बाळू** : जात्यावर? तिच्या घरची शिकवण ती.

**शारदा०** : तेंच ना. मला म्हणे गिरणीचें अन्न निःसत्त्व असतें. घरीं दळणं चांगलं. आणि शिवाय म्हणते, वेळ कुठं जातो माझा! शिवाय इतकी लोभस आहे... परवां त्या समोरच्या देशपांड्यांच्या मुलीचं डोहाळजेवण म्हणून

पाठवली हिला. त्या घरच्या मुलींनीं कांहीं तिला सोडली नाहीं. अगदीं हवीहवीशी वाटते सगळ्यांना.

**बाळू** : तो घराण्याचा गुण हो. तें सगळें घरच हवेंहवेंसें वाटतें सगळ्या वाईकरांस.

**शारदा०** : तशीच मुलगी. तिच्याजवळ बोलूं नकोस हो, उगीच चढून जायची. अशी सून नाहीं मिळायची.

**बाळू** : पण आपल्यासारखी सासूसुद्धां भाग्यानेंच मिळायची हो. सुनेच्या माहेरच्या माणसांजवळ सुनेचें कौतुक करणारी सासू बघायला मिळते का कुठें, हल्लींच्या महागाईच्या दिवसांत ! मला कांहीं अनुभव नाहीं, पण या सासवा मोठ्या छळकुट्या असतात म्हणे.

**शारदा०** : तुझं लग्न झालं नाहीं अजून ?

**बाळू** : होईल लवकरच.

**शारदा०** : ठरलंय कुणाशीं ?

**बाळू** : कुणाशीं नाहीं ठरलें, पण व्हायचें ठरलेंय.

**शारदा०** : केव्हां ? .

**बाळू** : जरा माझी अँबिशन पुरी होऊं दे. मला जरा मामलेदार होऊं दे. आतां मला जायला हवें हो, उशीर व्हायचा. ( आंतून ताई दोन ग्लास सरबत घेऊन येते. सासूला देऊं करते. )

**शारदा०** : अग, मला नको बाई. ऊन व्हायच्या आंत मला जरा देवाला जाऊन येऊं दे. बैस हो मुला तूं. कांहीं निरोप असला हिचा तर घेऊन जा हिच्या माहेरीं. मी जरा देवाला जाऊन येतें. ( बाळू उठून नमस्कार करतो. ) अरे, मला नमस्कार कशाला ?

**बाळू** : वडिलांचे चरण वंदावे असें शास्त्र.

**शारदा०** : छान आहे हो मुलगा. येतें हं मी ताई. [ शारदाबाई जातात. ]

**ताई** : बाळू, तुला पाह्यलं आणि सारखी आठवण यायला लागलीय भाऊची.

**बाळू** : चिंता करूं नकोस हो. माझं लक्ष आहे घराकडे. मी आतां परत गेलों म्हणजे भेटेन त्याला. कांहीं अडचण असली तर मी आहें हो गांवांत. मी येऊं आतां ? आज मी जाणार संध्याकाळीं परत, कांहीं निरोप आहे

का घरीं ?

**ताई :** आं ? कांहीं नाहीं. बाबांना म्हणावं छान चाललंय इकडं ! तुमच्या आशीर्वादानं सासर नव्हे माहेरच मिळालंय मला परत.

**बाळू :** बरें, पण तूं हात कर बघूं पुढें !

**ताई :** कशाला रे ?

**बाळू :** वडील माणसांचं ऐकावं. तुझ्या लग्नाला कांहीं येतां आलं नाहीं मला ऑफिसच्या कामामुळें, म्हणून हा चोळीचा खण आणला आहे ग आठवणीनं तुझ्यासाठीं.

**ताई :** अरे, पण कशाला ?

**बाळू :** श्रीमंताघरीं पडलीस म्हणून गरिबाचं नाकारूं नकोस हो.

**ताई :** दे बाबा. ( नमस्कार करते. )

**बाळू :** भलें होईल हो. आशीर्वाद द्यायला अनुभव लागतो, म्हणून तूर्त इतकेंच म्हणतों, भलें होईल हो. बरं, येऊं ? सांभाळ हो. घरची चिंता करूं नकोस. मी आहें तिकडे. लक्ष ठेवेन घराकडे. सांगेन तुझ्या बाबांना तुला सासर चांगलें मिळालें म्हणून हो. [ जातो. ताई दाराजवळ जाऊन परत येते. तांदूळ निवडत ओव्या म्हणते... ]

**सासरींच्या या संसारीं माहेराची आठवण ।**
**आठवती बाबा भाऊ आणि दारीचं अंगण ।**
**अंगणांत पारिजात कोण देई त्याला पाणी ।**
**दारीं घालते रांगोळी माझ्यावांचून का कोणी ।**
**आई तुझ्या पायापाशीं घोटाळतें माझें मन ।**
**जिथें उभें अंगणांत तुळशीचें वृंदावन ।**
**दारापुढं झाडावर साद बोलतो कावळा ।**
**कोण येणार पाहुणा आतुरला जीव मोठा ।**
**शेजारच्या घरांतली दळणाची घरघर ।**
**अजूनही येती कानीं आठवणींतून स्वर ।**

( वेगळ्या आवाजांत लांबून आवाज ऐकूं येतो. तसेंच जात्याची घरघर. )

**आमच्या ग दारावरनं घोड्यांच्या गाड्या गेल्या ।**
**भावांनीं बहिणी नेल्या बीजेसाठीं...॥**

( दरवाजांत सुभाष उभा दिसतो. पायजमा, सदरा, कोट, डोक्यावर टोपी, हातामध्यें एक पिशवी. )

**ताई :** भाऊ, आठवणीसारखा आलास. तूं केव्हां आलास ?

**सुभाष :** हा काय आत्तांच येतोंय.

**ताई :** कसा आलास ?

**सुभाष :** एस. टी. नें आलों.

**ताई :** तसं नाहीं, पण...बाबा बरे आहेत ?

**सुभाष :** हो, चांगले आहेत. ते काशीला निघालेत.

**ताई :** काशीला ? असं एकाएकीं ? केव्हां जाणार आहेत ?

**सुभाष :** कुणास ठाऊक ? माझ्या उशाशीं चिठ्ठी लिहून ठेवली. सांगलीला जाऊन ताईला सांगून ये. हा डबा नेऊन दे.

**ताई :** कसला डबा रे ?

**सुभाष :** बाबांनीं लाडू केलेत तुझ्यासाठीं रात्रभर जागून.

**ताई :** बाबांनीं केलेत ? दे इकडे. कशाचे रे ?

**सुभाष :** मला वाटतं– रव्याचे आहेत. मला अंगणांत वास येत होता. छान झालेत.

**ताई :** तूं खाल्ले नाहींस ?

**सुभाष :** बाबांनीं दिले नाहींत म्हणून मी खाल्ले नाहींत.

**ताई :** बैस ना. बैस तूं. सासूबाई मारुतीला गेलेल्या आहेत. आत्तां येतील परत. कोट-टोपी ठेव काढून. ( सुभाष कोट, टोपी काढून देतो, ती ठेवते. ) केव्हां निघालास वाईहून ?

**सुभाष :** सकाळीं पहिल्या गाडीनं निघालों.

**ताई :** बाबा बरे आहेत ना ?

**सुभाष :** हो.

**ताई :** स्वयंपाक कोण करतं रे घरीं ?

**सुभाष :** मी करतों.

**ताई :** भाकरी, पोळी तुला येते करतां ?

**सुभाष :** नाहीं, ती बाबा करतात. म्हणतात, " ताई सासरीं गेली आणि आम्ही अनाथ झालों."

**ताई** : बोलतात तुझ्याशीं ?

**सुभाष** : नाहीं, मी प्रयत्न करतों पण ते बोलत नाहींत. एकट्याशींच बोलतात. भाकरी थापतांना भाकरीशीं बोलतात. म्हणतात, 'ताई सासरीं गेली आणि आम्ही अनाथ झालों.'

**ताई** : तुझ्याशीं कां नाहीं बोलत ?

**सुभाष** : कुणास ठाऊक ? पण तूं गेल्यापासून त्यांचं घराबाहेर पडणंहि कमी झालंय. देवघरांत बसून कांहीं तरी वाचीत असतात दिवसभर. संध्याकाळीं बाहेर पडतात; पानसरे वकिलांच्याकडे जातात. जातांना प्रफुल्लित दिसतात. पण परत येतांना निराश झालेले दिसतात.

**ताई** : त्यांच्या केसचा निकाल नाहीं लागला अजून ?

**सुभाष** : नाहीं.

**ताई** : तूं नाहीं ना त्रास देत त्यांना कांहीं ?

**सुभाष** : नाहीं. अगदीं त्यांच्या मनासारखा वागतों. पाणी घालतों झाडांना. भरून ठेवतों पाणी. बाहेरसुद्धां जात नाहीं. घरांत बसून कविता करतों. त्यांना खुष करण्याचा प्रयत्न करतों. पश्चात्ताप झालाय मला असं त्यांना वाटावं अशीसुद्धां कविता केली, पण त्यांना खरंच वाटत नाहीं. पण ताई, खरं सांगूं का, मलासुद्धां हल्लीं वाटतं हं, लहानपणीं आपण त्यांचं ऐकलं नाहीं ना तिथंच आपण चुकलों. तुला आठवतं ताई ? लहानपणीं एक दिवस—" रंगपंचमीचा होता सण। रंगरंगली पेठ पुरी। पण घरांत बसलों कोंडुन आपण। वृद्ध पित्याचें नसतें बंधन। तोडून उठलों त्या वेळीं। पण गांठच तुटली सभ्यपणाची। बिघडली अवघी जीवनघडी। वाहतों ही दुर्वांची जुडी ॥" —कशी आहे ?

**ताई** : खरी आहे.

**सुभाष** : आहे ना ? त्यांना मुद्दाम ऐकविली. ती ऐकत असतांना त्यांच्या बाजूबाजूनं फिरत कशी आहे म्हणून विचारलं ? तर एकदम आपले उठले आणि " भजनरहित रामा सर्वही जन्म गेला। स्वजन जन धनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला।......" असं म्हणत तिथून एकदम देवघरांत निघून गेले. तूं लांब असल्यानं तुला कळत नाहीं, पण मलाहि वाटत नसेल का वाईट ? मी वाईट आहें, खूप वाईट आहें, पण चुकलों म्हटल्यावर मग इतकं कशाला

रागवावं ? आई नाहीं ती नाहीं, आणि ऐकून घ्यायला आतां तूंहि नाहींस. प्रत्येकाला माझी चीड यावी. प्रत्येकानं माझा तिटकारा करावा. प्रत्येकाला माझा तिरस्कार वाटावा. ज्यानं त्यानं कपाळाला आंठ्या घालून माझ्याकडे पाहावें. परवां बरं का ताई, मला एके ठिकाणीं नोकरी मिळत होती. त्यांना माहीत होतं, की मी रस्टिकेट झालोंय शाळेंतून. त्यांना फक्त बाबांची चिठ्ठी हवी होती. म्हणून मीं बाबांना विचारलं. तर मला म्हणाले, ' मी तुला लायकीचा दाखला देऊं इच्छीत नाहीं. ' इतका का मी वाईट आहें ? नको हा आपल्यासमोर यायला ही प्रत्येकाची माझ्याकडं पाहतांक्षणीं दृष्टि. ' हा कशाला आपल्या घरीं आला ? ' ही प्रत्येकाची माझ्या बाबतींत वृत्ति. ताई, खरंच का ग, इतका मी वाईट आहें ?

**ताई :** नाहीं रे भाऊ, असं कोण म्हणेल ? हें बघ, सोडून दे बघूं असले विचार डोक्यांतून. तूं आतां चांगला वागतोस ना ? थोडे दिवस आणखी तसं वाग. त्यांचा विश्वास मिळव. कांहीं झालं तरी वडीलच आहेत ते. जाऊं दे तें. सरस्वती भेटली होती का ?

**सुभाष :** मी विषय बदलावा म्हणून तूं मुद्दाम विचारलंस ना ? अग ताई, तें खरें नाहींय. एकदां कुठं मीं तिला दंग्यांत सोडवलं म्हणून का प्रेम बसणार तिचं माझ्यावर ? त्यांतून पुन्हां माझ्यावर ? नव्हती भेटली. आतां या प्रश्नांनीं मी पूर्वीसारखा हंसायचा नाहीं. लहानपणीं तें लहानपणापुरतं बरं होतं.

**ताई :** जाऊं दे तें. तूं आमचं घर पाहिलंस का नाहीं ?

**सुभाष :** पुन्हा विषय बदललास. खूप मोठं आहे ना घर ?

**ताई :** हो, खूप मोठं आहे. घरचीं माणसंहि मोठीं आहेत. आजच मी निरोप पाठवला बाळूबरोबर. तो आला होता इथं ऑफिसच्या कामासाठीं. त्याच्या संगतींत राहात जा. तो हित पाहणारा आहे आपल्या घराचं. बरं, पण तुला पत्ता कसा मिळाला ? विचारावा लागला ?

**सुभाष :** अग, ती गंमत सांगायचीच राहिली. अग, मी एस. टी. स्टॅंडवर उतरल्यापासून दोन पोलीस सारखे बघत होते माझ्याकडे. एकानं माझं नांव विचारलं, एकानं पत्ता. दोघेही हंसले. मग मीहि हंसलों. हो, मला पोलिसांची काय भीति ? त्यांनाच विचारला पत्ता. प्रसिद्ध आहे गोखल्यांचं घर. सहज सांपडलं. बरं ताई, घरांत कोण आहे ?

**ताई** : बोलतात तुझ्याशीं ?

**सुभाष** : नाहीं, मी प्रयत्न करतों पण ते बोलत नाहींत. एकट्याशींच बोलतात. भाकरी थापतांना भाकरीशीं बोलतात. म्हणतात, ' ताई सासरीं गेली आणि आम्ही अनाथ झालों.'

**ताई** : तुझ्याशीं कां नाहीं बोलत ?

**सुभाष** : कुणास ठाऊक ? पण तूं गेल्यापासून त्यांचं घराबाहेर पडणंहि कमी झालंय. देवघरांत बसून कांहीं तरी वाचीत असतात दिवसभर. संध्याकाळीं बाहेर पडतात; पानसरे वकिलांच्याकडे जातात. जातांना प्रफुल्लित दिसतात. पण परत येतांना निराश झालेले दिसतात.

**ताई** : त्यांच्या केसचा निकाल नाहीं लागला अजून ?

**सुभाष** : नाहीं.

**ताई** : तूं नाहीं ना त्रास देत त्यांना कांहीं ?

**सुभाष** : नाहीं. अगदीं त्यांच्या मनासारखा वागतों. पाणी घालतों झाडांना. भरून ठेवतों पाणी. बाहेरसुद्धां जात नाहीं. घरांत बसून कविता करतों. त्यांना खुष करण्याचा प्रयत्न करतों. पश्चात्ताप झालाय मला असं त्यांना वाटावं अशीसुद्धां कविता केली, पण त्यांना खरंच वाटत नाहीं. पण ताई, खरं सांगूं का, मलासुद्धां हल्लीं वाटतं हं, लहानपणीं आपण त्यांचं ऐकलं नाहीं ना तिथंच आपण चुकलों. तुला आठवतं ताई ? लहानपणीं एक दिवस—" रंगपंचमीचा होता सण । रंगरंगली पेठ पुरी । पण घरांत बसलों कोंडुन आपण । वृद्ध पित्याचें नसतें बंधन । तोडून उठलों त्या वेळीं । पण गांठच तुटली सभ्यपणाची । बिघडली अवघी जीवनघडी । वाहतों ही दुर्वांची जुडी ॥ " —कशी आहे ?

**ताई** : खरी आहे.

**सुभाष** : आहे ना ? त्यांना मुद्दाम ऐकविली. ती ऐकत असतांना त्यांच्या बाजूबाजूनं फिरत कशी आहे म्हणून विचारलं ? तर एकदम आपले उठले आणि " भजनरहित रामा सर्वही जन्म गेला । स्वजन जन धनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला ।......" असं म्हणत तिथून एकदम देवघरांत निघून गेले. तूं लांब असल्यानं तुला कळत नाहीं, पण मलाहि वाटत नसेल का वाईट ? मी वाईट आहें, खूप वाईट आहें, पण चुकलों म्हटल्यावर मग इतकं कशाला

रागवावं ? आई नाहीं ती नाहीं, आणि ऐकून घ्यायला आतां तूंहि नाहींस. प्रत्येकाला माझी चीड यावी. प्रत्येकानं माझा तिटकारा करावा. प्रत्येकाला माझा तिरस्कार वाटावा. ज्यानं त्यानं कपाळाला आंठ्या घालून माझ्याकडे पाहावें. परवां बरं का ताई, मला एके ठिकाणीं नोकरी मिळत होती. त्यांना माहीत होतं, की मी रस्टिकेट झालोंय शाळेंतून. त्यांना फक्त बाबांची चिठ्ठी हवी होती. म्हणून मीं बाबांना विचारलं. तर मला म्हणाले, ' मी तुला लायकीचा दाखला देऊं इच्छीत नाहीं. ' इतका का मी वाईट आहें ? नको हा आपल्यासमोर यायला ही प्रत्येकाची माझ्याकडं पाहतांक्षणीं दृष्टि. ' हा कशाला आपल्या घरीं आला ? ' ही प्रत्येकाची माझ्या बाबतींत वृत्ति. ताई, खरंच का ग, इतका मी वाईट आहें ?

**ताई** : नाहीं रे भाऊ, असं कोण म्हणेल ? हें बघ, सोडून दे बघूं असले विचार डोक्यांतून. तूं आतां चांगला वागतोस ना ? थोडे दिवस आणखी तसं वाग. त्यांचा विश्वास मिळव. कांहीं झालं तरी वडीलच आहेत ते. जाऊं दे तें. सरस्वती भेटली होती का ?

**सुभाष** : मी विषय बदलावा म्हणून तूं मुद्दाम विचारलंस ना ? अग ताई, तें खरें नाहींय. एकदां कुठं मीं तिला दंग्यांत सोडवलं म्हणून का प्रेम बसणार तिचं माझ्यावर ? त्यांतून पुन्हां माझ्यावर ? नव्हती भेटली. आतां या प्रश्नांनीं मी पूर्वीसारखा हंसायचा नाहीं. लहानपणीं तें लहानपणापुरतं बरं होतं.

**ताई** : जाऊं दे तें. तूं आमचं घर पाहिलंस का नाहीं ?

**सुभाष** : पुन्हा विषय बदललास. खूप मोठं आहे ना घर ?

**ताई** : हो, खूप मोठं आहे. घरचीं माणसंहि मोठीं आहेत. आजच मी निरोप पाठवला बाळूबरोबर. तो आला होता इथं ऑफिसच्या कामासाठीं. त्याच्या संगतींत राहात जा. तो हित पाहणारा आहे आपल्या घराचं. बरं, पण तुला पत्ता कसा मिळाला ? विचारावा लागला ?

**सुभाष** : अग, ती गंमत सांगायचीच राहिली. अग, मी एस. टी. स्टॅंडवर उतरल्यापासून दोन पोलीस सारखे बघत होते माझ्याकडे. एकानं माझं नांव विचारलं, एकानं पत्ता. दोघेही हंसले. मग मीहि हंसलों. हो, मला पोलिसांची काय भीति ? त्यांनाच विचारला पत्ता. प्रसिद्ध आहे गोखल्यांचं घर. सहज सांपडलं. बरं ताई, घरांत कोण आहे ?

ताई : कोण म्हणजे ?

सुभाष : तुझ्याशिवाय आणखीन कोणी ?

ताई : आत्तां ?

सुभाष : हो.

ताई : कां ?

सुभाष : नाहीं, सहज.

ताई : कुणी नाहीं. सासूबाई गेल्यात देवाला आणि हे गेलेत दुकानांत. कां रे ?

सुभाष : कांहीं नाहीं. परवां तो...हा...आला होता.

ताई : कोण ?

सुभाष : दागिना देण्यासाठीं... !

ताई : दागिना......घरीं आला होता ?

सुभाष : नाहीं, दारांतूनच मी त्याला घालवलं. दोनदां-तीनदां मी त्याला चुकवलं पण तो पुन्हा येणार आहे उद्यां. सोनं विकतां येत नाहीं म्हणाला. पैसा...

ताई : थांब, आजच यांनीं दिलेत पैसे मला. योगावर आलास. मलाहि प्रश्न पडला होता याला पैसे पाठवावेत कसे ? हे घे, तीनशें रुपये त्याला दे, पन्नास रुपये तुझ्याजवळ ठेव. आणि हें बघ, आणखीन राहतील ना दीडशें, ...ते बाबांच्या नकळत त्यांच्या कोटाच्या खिशांत ठेव. ते गांवाला चाललेत ना ? कुठून आले हें त्यांना कळतां नाहीं कामा. नाहीं तर घेणार नाहींत. ठेवशील ना नीट ?

सुभाष : हो, पण ताई...इतके पैसे तूं मला देतेस...कां दिलेस म्हणून कुणी बोलणार नाहीं का तुला ?

ताई : आं ? कुणी नाहीं. कसलाहि खर्च करण्यासाठीं मला दिलेत त्यांनीं. हें काय ? उठलास काय तूं एकदम ?

सुभाष : कोटांत ठेवतों पैसे. ( कोट अंगांत घालतो. )

ताई : निघालास कुठं ?

सुभाष : कुठं नाहीं. कोट अंगांतच असूं दे !

ताई : कां रे ?

सुभाष : नाहीं, खुंटीवर कोट ठेवला आणि पैसे घेतले कुणी तर ?

**ताई :** या घरांत कोण घेतंय ?

**सुभाष :** त्याचा नेम काय ? गडी-माणसं घरांत आहेत, कुणी हात घातला तर ?

**ताई :** आमच्या इथं नाहींत तशी कुणी.

**सुभाष :** नाहीं. पण मला आपलं वाटलं. स्वत:वरून असेल. चांदण्याची भीति असल्यासारखं. छी, छी, कुठल्या संवयी ग या ताई ? चांगलीं माणसं जगांत नाहींत असं ज्यांना वाटतं त्यांतलाच मी आहें का ? खूप करतां तुम्ही माझ्याकरतां. तूं, बाबा ! पण आतां नाहीं. हे पैसे दिले ना त्याला नेऊन ताई, कीं दागिना घेऊन येतों. तुला पाठवून देतों. बस. मग आयुष्यांत कुणी वाईट म्हणणार नाहीं. मग अविनाशरावांचा वशिला लावून कुठं तरी नोकरी करीन. बाबा परत आले ना काशीहून, कीं मी एकदम बदललेला त्यांना दिसला पाहिजे. नोकरी करणार आणि वेळ सांपडला कीं मग नुसत्या कविता करणार. मोठा संग्रह करणार, मग छापणार पुस्तक. वाहतों ही दुर्वांची जुडी— अर्पण करणार तुला. तूं मला सुधारण्याची संधि दिलीस ना म्हणून. अग, मला संधीच मिळत नव्हती, म्हणजे—

> **सुधारणेला कधीं न मिळाली संधि**
> **पश्चात्तापातें न मिळाला अवधी**
> **अजाण उद्धट अविचारानें**
> **जिथें टाकली तिथें न पडली**
> **जिथून टाकली तिथेंच चुकली।**
> **कर्तव्याची उडी— वाहतों ही दुर्वांची जुडी ॥**

पण ताई, मला जायला पाहिजे लवकर. दुपारच्या गाडीनं गेलों तर संध्याकाळीं पोहोंचेन. नाहीं तर तो उद्या सकाळीं येईल दारांत आणि जें लपवलं बाबांपासून तें नेमकं त्यांना कळेल.

**ताई :** अरे, पण असा तूं उभ्या उभ्या येऊन गेलास आणि तें इकडे सासूबाईंना कळलं... तसं नको बाबा— तूं असं कर. यांना जाऊन भेट दुकानांत. त्यांना सांग, परत ये. सासूबाईंना भेट, जेव आणि मग जा. कितीची गाडी आहे ?

**सुभाष :** दुपारची एकची.

**ताई** : अरे, मग वेळ आहे अजून.

**सुभाष** : कुठं आहे दुकान ?

**ताई** : सिनेमा थिएटर आहे ना... इथून गेल्यावर लागतं तें ?

**सुभाष** : हो, येतांना लागलं होतं.

**ताई** : त्याच्या बरोबर समोर जो रस्ता दिसतो ना...त्या रस्त्यावर उजव्या हाताला मोठं कापडाचं दुकान आहे, गोखले क्लॉथ स्टोअर्स. तिथं जा. यांचं नांव विचार. कुणी तरी भेटवितील तुला.

**सुभाष** : मोठं आहे का ग दुकान ?

**ताई** : खूप मोठं आहे. १५–१६ माणसं आहेत दुकानांत.

**सुभाष** : ताई, छान झालं. छान घर मिळालं. बाबा माझ्याशीं बोलत नाहींत तरी पण मी त्यांना सांगेन. त्यांना खूप बरं वाटेल. मलासुद्धां वाटलं. म्हणजे मी कितीहि वाईट होतों ना ताई, तरी तुझं चांगलं व्हावं असंच मला वाटत होतं. वाटतं अजून, माझं काय व्हायचं असेल तें होऊं दे, पण तुझं चांगलं व्हायला पाहिजे. बरं ताई, जाऊं मी ? अविनाशरावांना भेटून येऊं ?

**ताई** : पत्ता सांपडेल ना ?

**सुभाष** : हो, विचारीन मी. पण ते ओळखतील का ? ओळखतील म्हणा. लग्नांत हीच टोपी घातली होती मी.

**ताई** : लवकर ये हं. मी कुकर लावतें. पैसे सांभाळ. गर्दीच्या रस्त्यानं जातांना खिशावर हात ठेवून जा.

**सुभाष** : कां ?

**ताई** : म्हणजे कुणीं काढून घेतले तर कळेल.

**सुभाष** : वा, वा ! म्हणजे खिशावर हात ठेवला तर खिसा कापणाराला बरोबर कळेल.

**ताई** : हीं सगळीं शास्त्रं तुझीं तुलाच ठाऊक बाबा. पैसे सांभाळ म्हणजे झालं. आणि हें बघ, नंतर कांहीं बोलतां येणार नाहीं. गेल्याबरोबर मोहनमाळ पाठव.

**सुभाष** : पोस्टानं पाठवूं ?

**ताई** : पोस्टानं ? हो, पण पाठव. माझीं पत्रं नाहीं फोडत कोणी. पण लवकर. चैत्री हळदी-कुंकवाचे दिवस आलेत. त्या आधीं पाठव. ये जाऊन लवकर.

[ सुभाष जातो. ताई जरा वेळ दाराशीं उभी राहते. विणायचं आवरते. बूट उचलून परत ठेवते. कपाट लावून घेते. जातां जातां बाहेर बघते, आंत जाते. बाहेरून शारदा० परत येतात. ]

**शारदा०** : ताई, कोण गेलं ग आत्तां बाहेर ?

**ताई** : ( आंतून येऊन ) मला म्हटलं कांहीं ?

**शारदा०** : हो, आत्तां येतां येतां पाठमोरा दिसला, तुझा भाऊ का आला होता ?

**ताई** : हो.

**शारदा०** : एवढ्यांत आला केव्हां, गेला कुठं ?

**ताई** : आपण देवदर्शनाला गेलांत आणि तो आला.

**शारदा०** : मग पाठवलंस कुठं त्याला उन्हांत ?

**ताई** : दुकानांत गेलाय यांना भेटायला.

**शारदा०** : इतक्या घाईनं कशाला पाठवलंस ? अविनाश आला नसता का जेवायला ?

**ताई** : नाहीं, पण त्याला जायचंय वाईला परत लगेचच्या गाडीनं.

**शारदा०** : आणि जेवण त्याचं ?

**ताई** : येणार आहे ना परत जेवायला.

( बाहेरून एक पोलीस इन्स्पेक्टर येतो. )

**इन्स्पे०** : गोखल्यांचं घर हेंच का ?

**शारदा०** : हो, हेंच. काय काम होतं ?

**ताई** : हे दुकानांत गेलेत.

**इन्स्पे०** : त्यांच्याकडं गेलाय निरोप.

**ताई०** : तुमचं काम काय होतं ?

**इन्स्पे०** : त्याला आंत आणा.

**ताई** : कोण आहे ?

**इन्स्पे०** : ( सुभाषला आंत आणतात. ) हा मुलगा तुमच्या ओळखीचा आहे काय ? ( सुभाषबरोबर दोन पोलीस, एक कारकून. )

**ताई** : भाऊ ? हें काय रे ? कां आणलंय तुला त्यांनीं ?

**सुभाष** : अग ताई, मी स्टँडवर उतरलों ना, सांगितलं नाहीं का मघाशीं...

यांनीं नांव विचारलं, पत्ता विचारला म्हणून ! मी बाहेर गेलों तर हे उभेच होते रस्त्यावर. मला म्हणे घरीं घेऊन चल. मीं म्हटलं मी कामांत आहें, दुकानांत चाललोंय, तर म्हणे मुकाट्यानं आमचं ऐक नाहीं तर बेड्या घालूं.

**ताई** : पण केलंन् काय यानं ?

**इन्स्पे०** : बाई, या मुलावर सरकारी गुन्हा केल्याचा आरोप आहे.

**ताई** : कसला गुन्हा ?

**इन्स्पे०** : ३४२ कलमाखालीं आम्ही याला अटक केली आहे.

**शारदा०** : तें कसलं कलम बाबा ? समजेल असं कांहीं तरी सांग.

**इन्स्पे०** : तें न समजेल तरच बरं तुम्हांला, बाई. एका व्यापाऱ्याला काल रात्रीं यानें चाकू दाखवून त्याच्या खिशांतलं घड्याळ, सोन्याची चेन आणि अंगठी लुबाडल्याचा ह्याच्यावर आरोप आहे.

**शारदा०** : नाहीं हो, चांगल्या घरांतला तो मुलगा आहे.

**इन्स्पे०** : सगळी माहिती मिळालीय आम्हांला याची. फिर्यादीनं बोट दाखविल्यापासून आत्तांपर्यंत गेलेल्या वेळांत, फोन करून सगळी चौकशी केलीय आम्ही याची.

**सुभाष** : पण काल रात्रीं मी या गांवांत नव्हतों.

**पोलिस** : गप्प बे, तोंड बंद करतोस का खाणार झापड ?

**ताई** : अहो, पण तो आत्तांच गांवांत आला, आजच.

**इन्स्पे०** : हा तुमचा कोण ?

**ताई** : भाऊ.

**इन्स्पे०** : सख्खा ?

**ताई** : हो.

**इन्स्पे०** : म्हणजे आपण बाबासाहेब देवधरांच्या कन्या का ?

**ताई** : हो.

**इन्स्पे०** : ( पोलिसाला ) बाईचीं वाक्यं लिहून घ्या. कोर्टांत जबाबाच्या वेळीं उपयोगी पडतील.

**शारदा०** : तूं कांहीं बोलूं नकोस बाई. आपल्याला कोर्ट-दरबाराची पायरी नाहीं चढायची. तूं चल बघूं आंत.

**इन्स्पे०** : जातां येणार नाहीं बाई, आम्हांला तुमच्या घराची झडती

घ्यायचीय.

**सुभाष** : या घराची ? माझ्यासाठीं ? कां पण ?

**इन्स्पे०** : गुन्हेगार ज्या घरांत राहतो तें घर गुन्हेगाराचं.

**सुभाष** : हें घर गुन्हेगाराचं नाहीं. मी या घरांतला नाहीं. ही माझी बहीण नाहीं, यांच्यापैकीं माझ्याशीं कांहींहि कुणाचंहि नातं नाहीं. माझं काय हवं तें करा. तुरुंगात न्या, फांशी द्या. पण या घराची झडती घेऊं नका.

**पोलिस** : हरामखोर ! कांगावा कशाला करतोस ? गप ! ( हात उगारतो. इन्स्पेक्टर काठीनें अडवतो. ताई 'आई' म्हणून शारदाबाईच्या कुशींत शिरते. )

**इन्स्पे०** : तुझं काय सामान आहे बरोबर ?

**सुभाष** : ही एक पिशवी आहे.

**इन्स्पे०** : आंत काय आहे ?

**सुभाष** : डबा आहे.

**इन्स्पे०** : इकडं आणा.

**ताई** : बाबांनीं लाडू पाठवलेत माझ्यासाठीं. भाऊ, खरंच नाहीं ना रे याच्यांत कांहीं ?

**सुभाष** : ताई, तुझासुद्धां विश्वास नाहीं ना माझ्यावर ? अग, मी असलं काम कसं करीन ? बाबांचं नांव केवढं मोठं आहे !

**इन्स्पे०** : मोठ्यांचीं मुलं बिघडल्याचीं उदाहरणं फार बाबा हल्लीं. २५५, ती पिशवी घ्या. ( पिशवी घेतो. डबा उघडून पालथा करतो, आंत कांहीं नाहीं हें कळल्यावर ताई लगबगीनं लाडू गोळा करून ठेवते. ) ट्रंक उघडा ! ( उघडतात, आंतील कपड्यांच्या घड्या उचकटून टाकतात. ) तुम्हांला आमचा राग येत असेल, पण चोराबरोबर पोलिसांच्याहि हातांत बेडी असते हें जगाच्या कधींच लक्षांत येत नाहीं.

**पोलिस** : हवा त्यांतला माल यांत नाहीं साहेब !

**इन्स्पे०** : मग या कपाटांत काय आहे तें पाहा.

**ताई** : पुस्तकं आहेत, कपडे आहेत ! आणखी काहीं नाहीं !

**पोलिस** : ( कपाट उघडून ) साहेब, या कपाटाचा मधला कप्पा बंद आहे त्याची चावी ?

मेकांकडे पाहतात. ) मी जातों ताई.

**ताई** : तूं जातोस ?

**सुभाष** : वाईला. मला इथं राहवणार नाहीं. कोणाशीं बोलवणार नाहीं. कुणाच्याहि तोंडाकडे बघण्याचा मला इथं धीर होणार नाहीं. पण मीं कांहींच केलेलं नाहीं.

**ताई** : सुभाष, पण झालं हें कांहीं तरीच झालं. तुला हजारदां सांगितलं कीं, वेड्यावांकड्या माणसांच्या संगतींत राहात जाऊं नकोस. कुठं बाबांचा लौकिक आणि कुठं तूं ! सुभाष, पोलिसांच्या यादींत तुझं नांव असावं ?

**सुभाष** : माझंच चुकलं या घरांत जन्माला येऊन. सूर्यापोटीं शनैश्वर ! उद्यां बाबांना कळलं तर मला काय म्हणतील ? कशाला आलों मी तुमच्या घरीं ? यासाठीं ? अविनाशराव यायच्या आधीं मी जातों. कुणालाहि तोंड दाखविण्याची मला लाज वाटते.

**शारदा०** : ( आंतून येऊन ) आईला तोंड दाखवायला वाटली असती का रे लाज ? तिच्या कुशींत जाऊन सांगितलं असतंस ना, खरं काय झालं तें ? तसं मला सांग. मुद्दाम का केलं होतंस कांहीं ? घे बघूं, गोड करा तोंड. ( त्याच डब्यांतले लाडू काढून दोघांच्या हातावर ठेवते. )

**सुभाष** : पण माझ्यापायीं तुमच्या घराची अब्रू गेली.

**अवि०** : ( बाहेरून येत ) आमची नाहीं गेली. ज्याला असते त्याची जात नाहीं. नसते त्याची जाते. आम्ही मिळवून ठेवलेली अब्रू असल्या क्षुल्लक कारणांनीं जाण्यासाठीं नव्हे. लायकीनं मिळालेली अब्रू नुसत्या कारणानं जात नाहीं. सगळं कळलंय मला. प्रथम आमच्या घरांत पोलिस आले हें पाहून ज्यांना बरं वाटलं असेल त्यांना आतां दुःख होत असेल आणि तेव्हां ज्यांना दुःख झालं असेल त्यांना खरा प्रकार कळल्यावर बरं वाटलं असेल. इथं अब्रू गेली कुठं ? कुणाची ? माझी नाहीं अब्रू गेली. चल ग, जेवायला वाढ. वेळेच्या आधीं आलोंय.

**सुभाष** : तुम्हांला खरंच माझा राग आला नाहीं ?

**अविनाश** : नो, नॉट इन् द लीस्ट.

**सुभाष** : मग मला नोकरीसाठीं लायकीचा दाखला लागला तर तो तुम्ही मला द्याल ?

**ताई** : सासूबाई !

**शारदा०** : अहो, पण घरांत पुरुषमाणूस नाहीय.

**इन्स्पे०** : मुकाट्यानं कपाटाची चावी द्या.

**ताई** : काय करायचं सासूबाई ?

**शारदा०** : प्राक्तन असेल तें आता भोगलं पाहिजे मुली. आई अंबाबाई, आल्या संकटांतून सुखरूप पार पाड, खणा-नारळानं तुझी ओटी भरीन !

( आंत जाते. )

**इन्स्पे०** : २५५, चावी घ्या ! दाखले, त्याच्या खिशांत काय आहे पहा ! ( ताई त्याला चावी देते. तो कपाट उघडणार त्याच वेळीं एक पोलिस सुभाषच्या खिशांत हात घालतो. इतक्यांत बाहेरून दुसरा एक पोलिस येतो. येऊन सलाम करून इन्स्पेक्टरला एक चिठ्ठी देतो. ) साहेबांचा हुकूम आहे, झडती थांबवा. हा आरोपी तो नव्हे. खरा आरोपी सांपडला. याचा चेहरा त्याच्यासारखाच दिसतो म्हणून याचा संशय घेतला गेला. 'इट्स् ए केस ऑफ मिस्टेकन आयडेंटिटी.' २५५, ती ट्रंक भरून ठेवा. माफ करा बाई. अहो, आम्ही तरी हें मुद्दाम करतों का ? आम्हांलाहि नातीं-गोतीं, घर-संसार आहे. पण काय करायचं, कायदा कडू आहे.

**शारदा०** : [ आंतून बाहेर येऊन ] कुलस्वामिनी नवसाला पावली. आला प्रसंग टळून गेला.

**सुभाष** : आणि घराची अब्रू गेली त्याचं काय ?

**इन्स्पे०** : कायदा अब्रू ओळखत नाहीं. पोरा, कायदा न्याय ओळखतो. शिवाय तुझ्याबद्दल संशय घेतल्यानंतर आम्हीं वाईला फोन केला होता. तिथल्या यादींत तुझं नांव आहे. गुन्हेगार म्हणून नव्हे तर गुन्हेगाराच्या संगतींत असतो म्हणून. बाबासाहेब देवधरांचा मुलगा आहेस तूं. अशांच्या संगतींत राहात जाऊं नकोस. आम्हांला माफ करा. ( पोलिस जातात. ताई आणि सुभाष एकमेकांकडे नुसतं पाहतात. कांहीं क्षण ताई डोळ्यांना पदर लावते आणि मान फिरवून आंत जाऊं लागते. )

**सुभाष०** : थांब ताई.

**ताई** : आतां काय ?

**सुभाष** : ( डबा उचलतो. तिच्या हातांत देतो. पाणावलेल्या नजरेनं एक-

मेकांकडे पाहतात. ) मी जातों ताई.

**ताई** : तूं जातोस ?

**सुभाष** : वाईला. मला इथं राहवणार नाहीं. कोणाशीं बोलवणार नाहीं. कुणाच्याहि तोंडाकडे बघण्याचा मला इथं धीर होणार नाहीं. पण मीं कांहींच केलेलं नाहीं.

**ताई** : सुभाष, पण झालं हें कांहीं तरीच झालं. तुला हजारदां सांगितलं कीं, वेड्यावांकड्या माणसांच्या संगतींत राहात जाऊं नकोस. कुठं बाबांचा लौकिक आणि कुठं तूं ! सुभाष, पोलिसांच्या यादींत तुझं नांव असावं ?

**सुभाष** : माझंच चुकलं या घरांत जन्माला येऊन. सूर्यापोटीं शनैश्चर ! उद्यां बाबांना कळलं तर मला काय म्हणतील ? कशाला आलों मी तुमच्या घरीं ? यासाठीं ? अविनाशराव यायच्या आधीं मी जातों. कुणालाहि तोंड दाखविण्याची मला लाज वाटते.

**शारदा०** : ( आंतून येऊन ) आईला तोंड दाखवायला वाटली असती का रे लाज ? तिच्या कुशींत जाऊन सांगितलं असतंस ना, खरं काय झालं तें ? तसं मला सांग. मुद्दाम का केलं होतंस कांहीं ? घे बघूं, गोड करा तोंड. ( त्याच डब्यांतले लाडू काढून दोघांच्या हातावर ठेवते. )

**सुभाष** : पण माझ्यापायीं तुमच्या घराची अब्रू गेली.

**अवि०** : ( बाहेरून येत ) आमची नाहीं गेली. ज्याला असते त्याची जात नाहीं. नसते त्याची जाते. आम्ही मिळवून ठेवलेली अब्रू असल्या क्षुल्लक कारणांनीं जाण्यासाठीं नव्हे. लायकीनं मिळालेली अब्रू नुसत्या कारणानं जात नाहीं. सगळं कळलंय मला. प्रथम आमच्या घरांत पोलिस आले हें पाहून ज्यांना बरं वाटलं असेल त्यांना आतां दुःख होत असेल आणि तेव्हां ज्यांना दुःख झालं असेल त्यांना खरा प्रकार कळल्यावर बरं वाटलं असेल. इथं अब्रू गेली कुठं ? कुणाची ? माझी नाहीं अब्रू गेली. चल ग, जेवायला वाढ. वेळेच्या आधीं आलोंय.

**सुभाष** : तुम्हांला खरंच माझा राग आला नाहीं ?

**अविनाश** : नो, नॉट इन् द लीस्ट.

**सुभाष** : मग मला नोकरीसाठीं लायकीचा दाखला लागला तर तो तुम्ही मला द्याल ?

**अविनाश :** हवी तर मी तुम्हांला नोकरी देईन माझ्या दुकानांत. तुमचे वडील हाच फार मोठा लायकीचा दाखला आहे तुमच्या नशिबांत. वेगळा दाखला हवा कशाला ? आणि हें बघ ग, चार दिवस याला इथंच ठेवून घे.

**सुभाष :** पण मी राहणार नाहीं, मला गेलं पाहिजे.

**शारदा० :** तें तूं नाहीं ठरवायचंस मुला. तूं आमच्या घरीं आला आहेस.

**सुभाष :** अहो, पण मला एक अर्जंट काम आहे.

**अविनाश :** ठाऊक आहे. कुठं हुंडी तर नाहीं ना पटवायची कीं तारीख चुकली तर अब्रू जाईल ?

**सुभाष :** नाहीं, अब्रू नाहीं.

**अवि० :** तेंच म्हणतों मी. मग काय ग ! द्यायचं का याला जाऊन ?

**ताई :** हो, त्याला जाऊं दे परत दुपारच्या गाडीनं.

**शारदा० :** अग पण, त्याची कांहींच चूक नाहीं, आम्ही त्याच्यावर रागावलों नाहीं. आम्हांला तो जावा असं मुळींच वाटत नाहीं घरांतून.

**ताई :** तसं नाहीं सासूबाई. पण...

**अवि० :** हांकलतेस होय ग भावाला ?

**ताई :** तसं नाहीं, पण उद्यां सकाळीं तो गेला नाहीं तर– तर तो येईल– नाहीं. बाबा अचानक निघून जातील काशीला. त्यांनीं लिहिलंय पंधरा दिवसांनीं जातों म्हणून, पण त्यांचा नेम नाहीं.

**अवि० :** पहा बाबा, तुमची वहीणच तुम्हांला ठेवून घेत नाहीं. त्याला आम्हीं काय करावं ? पुन्हां केव्हां तरी या सवडीनं. बरं. जेवून तरी जाणार का ? का उपाशीच ?

**सुभाष :** नाहीं जेवत मी, मला भूकच नाहीं.

**शारदा० :** गाडीला वेळ आहे अजून अविनाश. झालं म्हणजे मी बोलावतें.

[ शारदा० आंत जाते. ]

**अवि० :** कोट काढा ना तो. परक्यासारखं काय वावरतां ? आमचं घर बघून तरी घ्या. द्या इकडं कोट माझ्याकडं.

**सुभाष :** आं ? ( ताईकडे बघतो. )

**ताई :** दे ना.

**सुभाष :** हो. ( अंगांतला कोट काढून त्याला देतो. )

**अवि०** : पैसे नाहींत ना आंत ? असले तरी काळजी करूं नका. या घरांत कुठं जायचे नाहींत ते.

**सुभाष** : छे, छे ! या घरांतून कसे जातील ?

[ कोट ठेवण्यासाठीं अविनाश आंत जातो. ]

**अवि०** : नीट ठेवून येतो. [ क्षणभर आंत जातो. ]

**ताई** : सुभाष, मी सासूबाईंना मदत करतें. त्या मोहनमाळेचं विसरूं नकोस.

**अवि०** : ( बाहेर येऊन ) काय चाललंय हो ?

**सुभाष** : कांहीं नाहीं; ती विचारत होती कीं पूर्वीसारख्या कविता करतोस का ?

**अवि०** : तुम्ही कविता करतां ?

**सुभाष** : हो.

**अवि०** : आम्हांला ऐकवतां ?

**सुभाष** : हो ! नवीन करून ऐकवूं ?...म्हणजे माझं पाप फार झालंय ! म्हणजे—

**लाटेमागुन लाट धांवते तरीहि सांठा संपेना ।**
**पाप धांवतें पुण्यक्षेत्रीं तरी किनारा भेटेना ।।**

**काळा कावळा रांजण भरतो ।**
**खड्यामागुनी पडे खडा ।**
**पुण्यवान मी कसा राहिलों ।**
**कसा भरेना अजुनि घडा ।**
**हें पाप नको, हें पुण्य नको ।**
**हा जीव नको, जगणेंच नको ।**
**या सर्वांतुन मोक्ष मागतों ।**
**अष्टांगाची करुन घडी ।**
**वाहतों ही दुर्वांची जुडी ।।**

# अंक तिसरा

[ अंगणाचं दृश्य दिसतं. खाटेवर सुभाष लिहितोय. मोठ्या तत्त्वज्ञान्यानं चिंतन करावं तसा विचारहि करतोय. ]

**सुभाष :** ही तर आहे जुनी कहाणी ।
शब्द नवे पण गोष्ट जुनी ।।
घरोघरीं जी रोजच घडते ।
तशी चिरंतन व्यथा जुनी ।।

अपराधी नेहमींच सांगतो ।
गुणी जनांचीं उणींदुणीं ।
त्यांतलाच मी एक करंटा ।
म्हणतों वैरी जग माझें ।।

खरें पाहतां या पाप्याचें ।
अवघ्या धरणीला ओझें ।।

थोर कधीं नच थोर मानले ।
चोर कोण तें कधीं न कळलें ।।

उपकारावर मी उपकारी ।
हांसत केली नित्य कडी ।
वाहतों ही दुर्वांची जुडी ! ।।

( मागून हातांत एक छोटी सतरंजीची वळकटी घेऊन बाबा आंतून येतात. त्यांच्या हातांत एक कागद आहे. तो कागद सुभाषच्या पुढं टाकतात. सुभाष दचकतो. हातांतली वही उशीखालीं लपवतो. )

**बाबा :** काय लपवलंस उशीखालीं ?

**सुभाष :** नाहीं, तुम्हांला दाखविण्यासारखं नाहीं.

**बाबा :** पाप आहे ?

**सुभाष :** हो, पापच आहे. आजपर्यंत केलेल्या पापांची कबुली. कविता आहेत.

**बाबा :** कबुली लपवायची कशाला ?

**सुभाष :** तुमच्यासमोर लाज वाटते.

**बाबा** : तुला ? आश्चर्य आहे !

**सुभाष** : असा समज माझ्याविषयीं झालाच पाहिजे असाच मी लहानपणा-पासून वागलों.

**बाबा** : हें तुला कळलं ?

**सुभाष** : नसेलही कदाचित्. पण झालेल्या चुका आठवून मी पावलों-पावलीं आसवं गाळीत असतों बाबा.

**बाबा** : पश्चात्तापानं ?

**सुभाष** : हो.

**बाबा** : पश्चात्तापाच्या आंसवांनीं डोळे धुऊन निघतात सुभाष, मन नव्हे. हा कागद संभाळ.

**सुभाष** : कसला कागद ?

**बाबा** : या घराचा. तुझ्या नांवें केलेला.

**सुभाष** : माझ्या नांवानं कशाला ?

**बाबा** : माझ्यानंतर तूं या घराचा कायदेशीर वारस आहेस म्हणून.

**सुभाष** : पण नंतरचा विचार आज कशाला ?

**बाबा** : नंतरचा विचार आज करणाऱ्यालाच जग व्यवहारी समजतं. जो तूं कधींच केला नाहींस आणि म्हणून काल केलेल्या कृतीवर आज पाणी पडतंय पश्चात्तापाचं.

**सुभाष** : पण तुम्ही निघालांत कुठं बाबा ?

**बाबा** : एक महिन्यापूर्वीं ठरवलं होतं तिथं— काशीला. तुझ्या घरांतून माझ्या घराकडे.

**सुभाष** : हें माझं घर नाहीं बाबा, तुमचंच आहे.

**बाबा** : लौकिक अर्थानं असेल कदाचित्. पारलौकिक अर्थानं माझा संसार संपला. ताई सुखाला लागली. तुझं व्हायचं होतं तें झालं... व्हायचं असेल तें होईल. आतां राह्यलंय काय माझं या जगांत ? माझ्या अपेक्षा संपल्या. [ आयुष्यांत केलेल्या चुकांचं प्रायश्चित्त घ्यायला जातों. मी वकिली केली म्हणून विश्वनाथ सोमण जन्मठेपेवर गेला. दुसरा एखादा वकील असता तर कदाचित् तो सुटला असता. निरपराध अपराधी ठरला; अकारण, हकनाक, माझ्यापायीं. पण कायद्यानं मला शासन होणं शक्य नाहीं, तरी पण अपराध माझाच म्हणून

# अंक तिसरा

[ अंगणाचं दृश्य दिसतं. खाटेवर सुभाष लिहितोय. मोठ्या तत्त्वज्ञान्यानं चिंतन करावं तसा विचारहि करतोय. ]

**सुभाष :**
हीं तर आहे जुनी कहाणी ।
शब्द नवे पण गोष्ट जुनी ।।
घरोघरीं जी रोजच घडते ।
तशी चिरंतन व्यथा जुनी ।।

अपराधी नेहमींच सांगतो ।
गुणी जनांचीं उणींदुणीं ।
त्यांतलाच मी एक करंटा ।
म्हणतों वैरी जग माझें ।।

खरें पाहतां या पाप्याचें ।
अवघ्या धरणीला ओझें ।।

थोर कधीं नच थोर मानले ।
चोर कोण तें कधीं न कळलें ।।

उपकारावर मी उपकारी ।
हांसत केली नित्य कडी ।
वाहतों ही दुर्वांची जुडी ! ।।

( मागून हातांत एक छोटी सतरंजीची वळकटी घेऊन बाबा आंतून येतात. त्यांच्या हातांत एक कागद आहे. तो कागद सुभाषच्या पुढं टाकतात. सुभाष दचकतो. हातांतली वही उशीखालीं लपवतो. )

**बाबा :** काय लपवलंस उशीखालीं ?

**सुभाष :** नाहीं, तुम्हांला दाखविण्यासारखं नाहीं.

**बाबा :** पाप आहे ?

**सुभाष :** हो, पापच आहे. आजपर्यंत केलेल्या पापांची कबुली. कविता आहेत.

**बाबा :** कबुली लपवायची कशाला ?

**सुभाष :** तुमच्यासमोर लाज वाटते.

**बाबा** : तुला ? आश्चर्य आहे !

**सुभाष** : असा समज माझ्याविषयीं झालाच पाहिजे असाच मी लहानपणापासून वागलों.

**बाबा** : हें तुला कळलं ?

**सुभाष** : नसेलही कदाचित्. पण झालेल्या चुका आठवून मी पावलोंपावलीं आसवं गाळीत असतों बाबा.

**बाबा** : पश्चात्तापानं ?

**सुभाष** : हो.

**बाबा** : पश्चात्तापाच्या आंसवांनीं डोळे धुऊन निघतात सुभाष, मन नव्हे. हा कागद संभाळ.

**सुभाष** : कसला कागद ?

**बाबा** : या घराचा. तुझ्या नांवें केलेला.

**सुभाष** : माझ्या नांवानं कशाला ?

**बाबा** : माझ्यानंतर तूं या घराचा कायदेशीर वारस आहेस म्हणून.

**सुभाष** : पण नंतरचा विचार आज कशाला ?

**बाबा** : नंतरचा विचार आज करणाऱ्यालाच जग व्यवहारी समजतं. जो तूं कधींच केला नाहींस आणि म्हणून काल केलेल्या कृतीवर आज पाणी पडतंय पश्चात्तापाचं.

**सुभाष** : पण तुम्ही निघालांत कुठं बाबा ?

**बाबा** : एक महिन्यापूर्वीं ठरवलं होतं तिथं– काशीला. तुझ्या घरांतून माझ्या घराकडे.

**सुभाष** : हें माझं घर नाहीं बाबा, तुमचंच आहे.

**बाबा** : लौकिक अर्थानं असेल कदाचित्. पारलौकिक अर्थानं माझा संसार संपला. ताई सुखाला लागली. तुझं व्हायचं होतं तें झालं... व्हायचं असेल तें होईल. आतां राह्यलंय काय माझं या जगांत ? माझ्या अपेक्षा संपल्या. [ आयुष्यांत केलेल्या चुकांचं प्रायश्चित्त घ्यायला जातों. मी वकिली केली म्हणून विश्वनाथ सोमण जन्मठेपेवर गेला. दुसरा एखादा वकील असता तर कदाचित् तो सुटला असता. निरपराध अपराधी ठरला; अकारण, हकनाक, माझ्यापायीं. पण कायद्यानं मला शासन होणं शक्य नाहीं, तरी पण अपराध माझाच म्हणून

प्रायश्चित्त घेतों. अपराधाला शासन येवढा एकच उपाय. ]

**सुभाष :** बाबा, तुम्ही माझ्यावर रागावलांत ?

**बाबा :** वेडा आहेस. रागावून कांहीं फरक पडणार आहे का आतां ?

**सुभाष :** तुम्ही जाऊं नका बाबा, मी चांगला वागेन.

**बाबा :** तुझ्या अडवण्यानं मी थांबणार नाहीं. कारण तुझ्या आश्वासनांवर माझा विश्वास नाहीं.

**सुभाष :** खरंच बाबा...

**बाबा :** तें शक्य नाहीं सुभाष. तें आतां शक्य नाहीं. यापुढं तूं खरं बोलणं शक्य नाहीं. एकदां कीड लागलेलं झाड नंतर सुधारत नाहीं. ती कीड मरते, पण झाड पूर्णपणानं पोखरल्यानंतर. पहिला क्षण... ज्या दिवशीं प्रथम तूं माझ्याशीं खोटं बोललास त्या दिवशीं तूं बिघडलास. [ तोंपर्यंत तूं स्वच्छ होतास, पवित्र होतास; पण त्या क्षणीं तुझी वृत्ति बदलली. गंगेच्या पवित्र ओघाला सांडपाण्याचा ओहोळ मिळाला. गटाराला गंगा सांपडली. तें पावन झालं, पण गंगा गढूळ झाली ती झालीच. आतां सुधारण्याची शक्यता नाहीं. पार समुद्रांत मिळेपर्यंत. उपाय एकच. तें पाणी विस्तवाच्या आचेनं उकळलं जायला हवं होतं.] त्या वेळीं तुला शासन व्हायला हवं होतं, पण प्रथम तुला आईनं पाठीशीं घातलं आणि नंतर ताईनं. तो क्षण आठव. माझ्याकडून त्या वेळीं तुला होणाऱ्या शासनापासून स्वतः तूं वांचण्याचा प्रयत्न केलास का ?

**सुभाष :** होय बाबा. रंगरावानं शाळेंत असतांना मला सिनेमासाठीं आठ आणे दिले होतेन्. दुसऱ्या दिवशीं मी ते परत देणं शक्य नव्हतं हें ठाऊक असून-सुद्धां मी त्या मोहाला बळी पडलों. दुसऱ्या दिवशीं त्याचे नऊ आणे आणि आठ दिवसांनीं दोन रुपये रंगरावानं मागितले, नाहीं तर तुम्हांला सांगण्याचा धाक घातलान्.

**बाबा :** तरी तूं कळवलं नाहींस ?

**सुभाष :** नाहीं. त्या दिवशीं संध्याकाळीं रोजच्याप्रमाणें शाळेंतून आल्यावर तुमच्यासमोर अल्जिब्रा घेऊन बसणारा मी पोट दुखण्याचं निमित्त सांगून तुमचं तोंड चुकवलं. तुम्हांला वाटलं माझं अभ्यासावरचं लक्ष उडालं कसं ? पण त्यासाठीं मी भीत नव्हतों बाबा. मी भीत होतों माझ्याजवळ अल्जिब्राच नव्हता म्हणून.

**बाबा :** म्हणजे ?

**सुभाष :** दोन रुपयांच्या फेडीसाठीं तो विकला होता. होय बाबा, मी तो विकला होता. आणि उरलेल्या पैशानं लागलेल्या इतर संवयींनीं एक दिवस सगळीं पुस्तकं. प्रथम प्रथम तुमचं आणि शाळेचंहि तोंड चुकवत चुकवत एक दिवस मी शाळेतून रस्टिकेट झालों. रंगरावच्या बरोबर त्या दिवसापासून सुजनांचा मी वैरी झालों आणि त्या दिवसापासून असल्या बाबतींत दिलासा देणारा रंगराव माझा जिवलग मित्र बनला. तुम्हांला न कळलेली माझी प्रत्येक खाजगी गोष्ट ही त्याची—माझी कानगोष्ट होती. त्या दिवसापासून तुमची मला भीति वाटूं लागली. दुर्जनांची मात्र मला कधींच पर्वा वाटली नाहीं. त्या क्षणीं कमकुवत बनलेलं माझं मन आजहि धुतल्या पावलानं देवघरांत जायला धजत नाहीं.

**बाबा :** कारण त्या क्षणीं तूं बिघडलास.

**सुभाष :** पण आतां मला त्याचा पश्चात्ताप होतो आहे बाबा.

**बाबा :** पश्चात्ताप हें अपराधावरचं पांघरूण झालं सुभाष, उपाय नव्हे. अपराध सुधारण्याचा उपाय एकच आणि तो म्हणजे शासन. आपण आयुष्य-भर मिळवून ठेवलेलं जातांना वृद्ध पित्यानं मुलाला देऊन जावं, असं शास्त्र आहे. त्याप्रमाणं घर तुला दिलेलं आहे. एक विचार देऊन जातों. अपराधाला जगांत शासन होतंच ही एक जाणीव ठेव. शासन भोगण्याची मनाची तयारी कर आणि छाती असेल तर हवे तितके अपराध कर. लाक्षणिक अर्थानं तूं त्या क्षणीं सुटलास. कायदा तुला शासन करूं शकला नाहीं, पण निसर्ग शासन करील. त्या दिवशीं ताईच्या घरीं झालेला तो प्रकार...

**सुभाष :** तुम्हांला कळला ?

**बाबा :** तूं केलेली कोठलीहि गोष्ट मला कळली नाहीं असं कधीं झालंच नाहीं. पण आठवणी करत बसण्याचं तुझं वय आहे. मला आतां विसरायला शिकलं पाहिजे.

**सुभाष :** पण त्या बाबतींत माझी कांहींच चूक नव्हती बाबा.

**बाबा :** सुभाष, तुला जन्म दिला, शिक्षण दिलं यांत आमची काय चूक झाली होती, म्हणून तूं आपल्या वागण्यानं आपल्या आई-बापांना अशी शिक्षा दिलीस ? तशीच तुला शिक्षा झाली. क्षणिक असो वा मानसिक असो, पण

झाली. ती निसर्गानं दिली. कायदा जें करूं शकला नाहीं तें निसर्गानं केलं. तें योग्यच झालं. तुलाच नव्हे तर ताईलाहि. अपराध केल्याबद्दल तुला आणि अपराध पाठीशीं घातल्याबद्दल ताईला. मी इथं बसून सांगतों. तुझ्यापायीं त्या पोरीला वारंवार खोटं बोलावं लागत असेल, छपवाछपवी करावी लागत असेल. स्वतःच्या मनाविरुद्ध निव्वळ तुला पाठीशीं घातलं म्हणून. ते तिचे होणारे हाल, तें तिला होणारं शासन आणि तें होणारच. [ ती माझी इच्छा नव्हे तो नियतीचा नियम आहे. निसर्गाची नीति आहे, काळाचा कायदा आहे.] हा अपराध घडला म्हणजे हें कलम, ही शिक्षा, त्यांत बदल होणें नाहीं.

**सुभाष** : पण बाबा, मी मनापासून सांगतों...

**बाबा** : कीं मी सुधारेन. ही इच्छा मनांत ठेव, तरी शासन होणारच ही खात्री असूं दे. शक्य तों चांगला वाग. सुभाष, तुला काय सांगूं ? तुझी शाळेंतील हुशारी पाहून तुझ्या आईच्या व माझ्या तुझ्यापासून फार मोठ्या अपेक्षा होत्या. अरे, तिचं भोळं मन तर तुला इंग्लंडला पाठवून आय. सी. एस. करण्याचीं स्वप्नं पाहात होतं. आणि मीहि तिला खुळ्यासारखा दिलासा देत होतों. पण सुभाष, एक दिवस संपलं सगळं. [ एकच कठोर ठोकर मारून तीं सगळीं स्वप्नं तूं फोडून टाकलींस...करमणुकीसाठीं खडा मारून फोडलेल्या कांचेच्या भांड्यासारखीं. ] मुलाविषयीं आई-वडिलांनीं बाळगलेल्या सगळ्या आशा–आकांक्षा धुळीला मिळाल्या म्हणजे त्यांना होणाऱ्या वेदना ज्या दिवशीं तुला कळतील त्या दिवशीं माझ्या कठोर शब्दांचा अर्थ तुला कळेल.

**सुभाष** : तुम्ही जाऊं नका बाबा माझी चूक झाली. मला क्षमा करा.

**बाबा** : मी क्षमा करणार नाहीं. तुला योग्य ती शिक्षा कशी होईल याचं चिंतन करीत काशीला जाऊन बसणार आहें मी. सुभाष, तूं कविता करतोस; जे तुझे विचार ऐकायला जग तयार नाहीं ते शब्दांत गुरफटून स्वतःच्या समाधानासाठीं तूं कवितेंत मांडतोस. मला सांग...छंदोबद्ध रचना करणारा पहिला कवि कोण, तुला ठाऊक आहे ?

**सुभाष** : हो, वाल्मीकि.

**बाबा** : वाल्मीकीची पहिली कविता ठाऊक आहे ?

**सुभाष** : हो. **मा निषाद, प्रतिष्ठा त्वां गम शाश्वति समा ।**

**यत क्रौंच मिथुनात एकम् अवधी काममोहितं ॥**

**बाबा** : आनंदानं क्रीडा करीत बसलेल्या क्रौंच पक्ष्याच्या जोडप्याचा वध करूं पाहणाऱ्या पारध्याला दिलेल्या शापांतून जगांतील पहिली कविता जन्माला आली. काव्यासारखा कोमल वाङ्मयप्रकाराचा जन्म शासनापोटीं झाला. हें शासनाचं महत्त्व.

**सुभाष** : पण हा शाप देणारा वाल्मीकि, रामायणासारखं महाकाव्य लिहिणारा ऋषी वाल्मीकि हा मूळचा वाटमाऱ्या करणारा वाल्या कोळी नव्हे का ?

**बाबा** : तूं स्वतःची तुलना त्याच्याशीं करूं पाहतोस होय ?

**सुभाष** : नाहीं. पण हा शाप देण्याचा त्याला अधिकार कुणी दिला ?

**बाबा** : त्याच्या तपश्चर्येनं दिला.

**सुभाष** : मग तपश्चर्या हें साधन नाहीं का अपराधाच्या क्षालनाचं ?

**बाबा** : त्यासाठीं सामर्थ्य लागतं, उपासना लागते. निष्ठा लागते. एक सदिच्छा बोलून दाखवूं ? तूं कविता करतोस, ही सरस्वतीची उपासना. तिच्याशीं तरी एकनिष्ठ राहा. पाहा कांहीं फळ पदरीं पडतं का ? [ तुला एक विचारूं ? दुर्गुण तुला हवेसे वाटतात. आणि सद्गुणांपासून तूं लांब पळतोस, तें कां ? कारण मला सांगतोस ? ]

**सुभाष** : लहानपणीं तुमच्याबद्दल मनांत उत्पन्न झालेली भीति. शिवाय सद्गुणांची चाल सावकाशीची आणि दुर्गुण झपाट्यानं धांवत येतात. कुरवाळणारे ते असल्यामुळें ते हवेसे वाटतात. अत्तराचा फाया नाकाशीं न्यावा लागतो, मैल्याची घाण मैलावरून येते.

**बाबा** : हुशार आहेस सुभाष ! [ हळहळ वाटते ती तूं संगतीनं वायां गेलास म्हणून. ] जाऊं दे. पुन्हां अपेक्षा निर्माण होऊं लागल्या. ही संसाराची ओढ मला टाळली पाहिजे. मला गेलं पाहिजे. माझी स्टेशनवर जाण्याची वेळ झाली. ती मोटर चुकली, तर पुढं गाडीहि चुकेल.

**सुभाष** : मी मोटर-स्टँडपर्यंत येतों.

**बाबा** : सोबत ? नको. एकट्यानंच जो प्रवास करावयाचा त्याची सुरुवात सोबतीनं कशाला ? तूं येऊं नकोस. मीं सांगितलं तें स्मरणांत ठेव. आणि एकच गोष्ट, देवधर या आडनांवाचं एक घर या गांवांत आहे एवढं जिवंत असेतों माझ्या कानीं असूं दे. माहेरवाशीण म्हणून ताई कधीं या घरांत

आली, तर तोंपर्यंत ही तुळस असूं दे. आपल्या आईला पाणी घाल. अन्नपूर्णे, घर सांभाळ.

( वळकटी उचलतात आणि मागेंहि न बघतां तडक पुढें चालूं लागतात... सुभाष भकास नजरेनं सगळीकडे पाहतो. त्याला कांहीं सुचत नाहीं. वेड्यासारखा त्या गादीवरचा कागद उचलतो. पाहतो. पुन्हां परत तुळशीजवळ येतो. नळावर जातो, पाणी मारतो तोंडावर. वेड्यासारखा बडबडतो. )

**सुभाष** : **एकटेंच हें उरलें अंगण ।**
**डोक्यावर आभाळ ।**
**एकटाच रे तूंच तुला ।**
**तूं आतां तरी संभाळ ।**
**वादळांत झंझावाती ।**
**घरट्यांच्या भिंती गेल्या ।**
**उरलें सुरलें छत्रहि गेलें ।**
**सरल्या आशाहि सगळ्या ।**
**ज्या पायाला धीरच नाहीं ।**
**तोल जिवाला कसला ।**
**बधीर झालें मस्तक**
**प्राणी पायांतच लटपटला ।**
**आतां कशाचें शिखर गांठणें ।**
**पाय टाकण्या आधींच तुटली ।**
**आधाराची शिडी ,**
**वाहतों हा दुर्वांची जुडी ।**

( दारांत रंगराव येऊन उभा राहतो. )

**रंगराव** : अरे सुभास, आमी आले, बघितलीस काय ? तूं रडती कसाला ? तुझी बाप गेला म्हून ?

**सुभाष** : तूं कसा आलास एकाएकीं ?

**रंगराव** : पठाणाकडून दागिना आणून तूं मला दावला. तेला आज महिना झाला. तूं पुन्हा आली कसा नाय म्हणून लांबून बघण्यासाठीं आली. ते येत असतां तुझा बाप जातांना दिसली. म्हणून आंत आली. ते वक्ती तेनं आम्हांला

हाकलूनशी दिला व्हता. नाय, ते दुख तेचा नाय, कारण धंद्यामंदी लाज बाळगुनशी नाय भागत.

**सुभाष** : तूं आलास तें बरं झालं. दागिन्याबद्दल मला तुझ्याशीं बोलायचं होतं.

**रंगराव** : तें होऊनशी जायेल. चांगला झाला तें तूं पठानाच्या तावडींतून सुटलास. पर तुझी बाप कुठं गेली आज सामान घेऊन ?

**सुभाष** : काशीला.

**रंगराव** : अरे वा, फस्कलास झाला काम ! म्हणजे पठाणाच्या तडाख्यांतून सुटला अन् आतां बापच्या पन. तुजा सनी बदलला बघ सुभास. आतां आमी येऊन बसायला मोकळा झालो तुझ्या घरावर. घे, सिग्रेट ओढ.

**सुभाष** : नाहीं, मीं बंद केलीय.

**रंगराव** : अरे, बंद केलीय तर आतां उघड्डूनशी टाक. अरे, आमी इतका इनोद करते पन तूं हंसते बी नाय. तूं आतां अगदीं होटेलचे गल्ल्यावर बसण्याचे लायक झाला. एकदम असा चेहरा करून बसेल ना गल्ल्यावर तर उधार मागण्याची गिऱ्हाइकाची ताकदच व्हनार नाय. घे, घे, सिग्रेट ओढ, गोल्ड फल्लेक हाय.

**सुभाष** : नाहीं, मला नको.

**रंगराव** : अरे, काळजी कशाला करतो तूं ? बाप गेली ना तुझी ? मग घे. चल, मी लावते काडी. घराला आली कसाला मग तुमच्या ?

**सुभाष** : काडी लावायला ?

**रंगराव** : कई बोल्या ! ( टाळी मागतो. ) अरे, तुझी बापपरमानं तूं पर टाळी देत नाय, घर लिहून घेतला का नाय बापाकडून ? अरे, साला ये म्हातारे लई खडूस असते. स्वतः घर बांधतेत, पोरांना उन्हांत टाकतेत आनि आपन काशीला निघून जातेत. आपला आपले बापचा अनुभव हाय. तुझी दोस्त म्हून तुला सल्ला देऊनशी टाकला. आपन काढला आपले बापला घरांतून बाहेर.

**सुभाष** : नालायक ! जन्मदात्या वडिलांना घरांतून काढलंस बाहेर ?

**रंगराव** : एकदम, आईला अन् बापाला. अरे कमावत नाय काय नाय. काय करायची असली बाप. खूप रडला. म्हनला, आईला तर सांभाळ. आपण सोच्छ सांगून टाकला. ते माझा आई नाय; ते तुझा बायको हाय. मला माझी

ी हाय. तिला न्हायला जागा नाय. मग तुझे बायकोला मी कायसाठीं
ळावा ?

**सुभाष :** तिनं जन्म दिला ना तुला ?

**रंगराव :** अरे, ते साला होऊन जाते. मुद्दाम कोन साला काय करते काय ? मंदी रोज आमी भराभर भजी तळते. ते मी तळली म्हून कडईच भजी ल तर चालेल काय ? काय...सका परमान दिला ? या जगामंदी बाप – आय नाय– कोन कोनाचा नाय. मोठं मोठं संत लोक सांगूनशी गेले. मचे होटेलमंदी फोटो नाय का ! ते आमचेपैकींच.

**सुभाष :** अरे, पण तें हॉटेल तुला तुझ्या वडिलांनींच काढून दिलं ना ?

**रंगराव :** मग काय उपकार केलाय काय ? जलम दिला आमाला. पोसणार न त्येचं बाप ?

**सुभाष :** मग त्यांना तू पोसायचं नाहींस ?

**रंगराव :** त्येनीं कुठं पोसली बाप ?

**सुभाष :** ही सबंध घराण्याची परंपरा आहे होय ?

**रंगराव :** न्हाय तर काय ? इतका येवहार कळला नाय ? आपला म्हातार-णचा व्यवस्था नको करून ठेवायला ? नाय पर म्हातारपणीं पोरऱ्या जिवावर गायला बघते. अन् नाय त्येनं पोसला म्हणजे मग चिडतेत. काय केलं तुझ्या ापानं तुझ्यासाठीं ?

**सुभाष :** त्यांचं नांव काढू नकोस. माझ्याबद्दल काय हवं तें बोल.

**रंगराव :** तसा कां म्हून, अरे त्येऱ्याबद्दल मी बोलणार, सोता वकिली ोडूनशी बसला साला आन् तुझ्या नशीबमंदी उदारी आला. ( सुभाष तोंडांत मारतो. ) मीं शिवी दिली म्हून तू मारला काय ? न्हाई, तेची राग न्हाई, कारण धंद्यामंदी लाज बाळगूनशी नाय चालत. तुझा हातला लागली काय ? ण मीं म्हटलं, केला उदारी. बड्या बड्या राष्ट्राला बी भीक मागावा लागतो अमरिकाकडे. तेसाठीं इकता टाकावा काय ? पर नाय. तुझ्या आयला काय तू ारला ? पर नाय, एक दिस ऐकून तरी घेतला काय तुझा ? समदा तुझा दुख ऐकून घेतला आमी, तुझा दया येऊन. कां ? तर म्हटलं आपला दोस्त हाय. बराबरच रस्टिकेट झालाय शाळामंदून. दोस्ती पाळायला पाहिजे. तुला देनं होतं लोकचा, तर आपून तुला युगत सांगितली. अरे, गह्रा उघडून बसला

होता ना. तुला पैसा देण्यासाठी ? ते तूं मिळवू सकला नाय. तुला तीन पान मंदी लकच नाय. मिळवण्याऐवजी हरलास तू पैका. हरलास दोन हजार रुपया. तर तो तुझा नशीबचा गोष्ट झाला. ते पैसा आपन अजून घेतला काय ? घेणार तर नक्कीच, पर अजून कोनाला सांगितला नाय. तुझा आबरू साफ ठेवण्यासाठीं. पर पैसा मिळवण्याचा सल्ला तर सांगितला. आमी दोस्ती पाळला, तर आमी चोर अन् ते थोर ! का, तर ते वकील आनी आमी होटेलवाले. आमचे केस घेत नाय म्हणाली ते तुझे बाप. अपराधी असेल तर आमी केस घेत नाय म्हणाली. अरे, हे काय वकिलीचा न्याय झाला ? अरे, चोरांची वकिली करते नाय तर वकिलीचा धंदा करते कसाला ? चोरीच करावा. सनदची बी भानगड नाय. परीक्षा बी देण्याचा कारण नाय. बिलकूल बिगरभांडवल धंदा. एकदम कॉम्पिडेशन, नाय तर काय ? अरे, साला खानावळ काढून बसते अन् जेवन फकस्त भूक लागला असल तरच मिळते, असा बोर्ड दुकानावर लावूनशी चालेल काय ? इतका पर डोक्सा नाय. वकिली पास झाले कसा ?

**सुभाष :** तूं फार बोलतोस रंगराव.

**रंगराव :** हां, ते साला संवय लागला.

**सुभाष :** सोड ती. नाहीं तर मला सभ्यपणा सोडावा लागेल.

**रंगराव :** का रे, आतां शेवटचा काय बंदोबस्त ?

**सुभाष :** बाबांनीं सोय केलीय. आणि थोड्या दिवसांनीं मी नोकरीवर जाणार आहें ताईच्या गांवीं.

**रंगराव :** येडा. अरे, येवढा घर तुझा आणि तू नोकरी करनार ? तुमचे लोकला साला डोकसाच नाय. मी सांगूं काय ? हें बघ, आपण भागीदारींत धंदा काढनेसाठीं तयार हाय. तुझा हे जागा फसक्लास मोक्यावर हाय. माझं ऐक. थोडा टेबलखुर्चीं, ताटभांडीं, कॉट-गाद्या, घेऊनशी टाक. हे तुळस खणून काढते मी. पारिजातक उखडून टाकते. बास, मोकळा घर एकदम.

**सुभाष :** तुळस, पारिजातक उकरून टाकू ? पाप आहे तें.

**रंगराव :** अरे, पण या कलियुगामंदी पापाला म्हनतेत पुन्य अन पुन्याचे नाव झाला साला पाप. बिघडनेचा मतलबच साला सुदरून गेलाय एकदम. अरे, पंढरपुरात इट्टलाच्या नावांचा जप करत जल्म काढतात ते टांचा घासत मरतात उपासपोटी उनामंदी. परवां ते घेलाशेट मेला. एक कोट पंचावन्न लाख

रुपया खाल्ला तेनं सरकारी कामांत तर महाशिवरात्रीच्या दिवशीं जग सोडला. जलमभर पाप करून गेला तो स्वर्गाला. गेला एकदम पुन्य घेऊनशी. ४० इसम बसूं शकते जेवनासाठीं, माझं ऐक. एक होटेल काढूनशी टाक या घरामंदी, लोजिंग-बोर्डिंग फस्कलास.

**सुभाष :** या घरांत? देवधरांचं घर गांवांत राह्यला पाहिजे, बाबांनीं सांगितलंय.

**रंगराव :** अरे, मंग त्येच्या मंदी काय? 'देवधर लोजिंग–बोर्डिंग' असा नांव दिला की नांव पर ऱ्हायला– घर पर ऱ्हायला. पांच-दहा हजार, लागल तितका पैसा लावते, बोल.

**सुभाष :** अरे, पण मी विचारच केला नाहीं या बाबतींत.

**रंगराव :** विचार करून होते ते वाटोळा आन् अविचारानें करल ते व्हतो गरगरीत. अरे, विचार करून असलीं कामं होतात नाय. तुझा बाप म्हणत होती का आमचे संगतनं तूं बिघडला म्हून. जगून वाचून येल तर कल्याण झालेला बगेल पोराचा. आन् इथं आल्यावर सुखानं परान सोडेल.

**सुभाष :** तूं अतिशय वाईट बोलतोयस् रंगराव. माझं तुझ्याकडे असलेलं कामच महत्त्वाचं आहे म्हणून...नाहीं तर तुझं सुटलेलं तोंड केव्हांच बंद केलं असतं. जन्म कितीहि मोठ्या घरीं झाला असला तरीहि वावरतों तुम्हां लोकांत हें विसरूं नकोस. धोंड्याखालीं अडकलेला हात निघाला कीं, तुझ्याशीं संबंध तोडायचाय मला. गेल्या महिनाभरांत मी तुझ्याकडे आलों नाहीं यावरून तूं समजायला हवं होतंस. पण परमेश्वरानं सुद्धां बुद्धि आणि लाज या दोन्ही गोष्टी तुला दिलेल्या नाहींत. माझ्या चरितार्थाची सोय वडिलांना घरांतून हांकलून काढणाऱ्या मुलाच्या बुद्धीनें करण्याची मला गरज नाहीं. बरं, तें सगळं राहूं दे, मी माझ्या चिंतेंत आहें तेव्हां तूं मला असं सांग, त्या दिवशीं पैसे देऊन पठाणाकडून मी दागिना घेऊन आलों. तुला दागिना दाखवून...बाळू आला वाटतं. ये रे बाळू.

**रंगराव :** आज बंद काय ऑफिस ?

**बाळू :** हवें तेव्हा असायला ऑफिस म्हणजे काय हॉटेल आहे काय तुझें ?– चोरून ठेवलेली साखर डोळ्यावर येऊं नये म्हणून लहर लागेल तेव्हा 'साखरे– अभावीं चहा बंद' असा बोर्ड लावायला !

**रंगराव :** ए बाळू, साला मामलेदाराच्या कचेरींत कारकुनी करतेस म्हून काय झालें, कलेक्टर झाला नाय अजून. एक शब्द टाकेल तुझ्या सायबाकडे तर कायमचा नोकरी निघूनशी जायेल.

**बाळू :** भलतेंच कांहीं बोलूं नकोस हो. तुझ्या हॉटेलांत येऊन कधीं पंधरा पैशाची मिसळ उधार खाल्लेली नाहीं, कळालें काय ? तुझ्या शब्दानें माझी नोकरी जायला ती कांहीं तूं दुसऱ्यांची पळवून आणलेली बायको नव्हे, कळालें काय ?

**रंगराव :** माझ्या खासगी भानगडीत तुला तोंड खुपसण्याचं कारन नाय.

**बाळू :** अरे, खाजगी काय आणि पब्लिक काय ? भानगडीशिवाय आहे काय तुझ्या आयुष्यांत ? सुभाष, तुझ्यावर लक्ष ठेवायला सांगितलंय मला तुझ्या बाबांनीं जातांना. म्हणून या घरांत आलों. याला बघितलं दारांत तेव्हांच म्हटलें मनांत आतां जें या घरांत चाललेंय हें कांहीं बरें नव्हे. याची संगत तूं धरूं नकोस बरें काय ?

**रंगराव :** आतां हे साला उपदेश करते काय तुला ?

**बाळू :** शिवी देण्याचं काम नाहीं हो. मीसुद्धां हनुमान व्यायाम शाळेंत बारा जोर आणि पंचवीस बैठका काढल्यात लहानपणीं. पुन्हां शिवी देशील तर तोंड आणि दुकान दोन्ही एका दिवशीं बंद करून टाकीन.

**रंगराव :** तें काय साला तुमचा हापिस हाय का मुंबई हाय,साला संप करेल आणि दुकान बंद करून टाकेल म्हनन्यासाठीं ? साला तुला नाय म्हटला, तुझ्या हापिसला म्हनालों.

**बाळू :** तुला काय हवें तें म्हण. एक तुला सांगतों, भल्या घरांतलें मूल बिघडविलेंस, बरें नाहीं केलेंस हो. हें म्हणजे कसें झालें कळालें काय ? सबंध मंदिराचें ट्रस्टीजच्या धर्मादाय मिळकतीचा कागद करावा आणि त्यावर दरोडे-खोरानें साक्ष द्यावी तसें झालें, कळालें काय ?

**रंगराव :** तें काय मला कळालें नाय, पण याची जबाबदारी तुझेवर पडली काय ? खायला तूं वालतोस काय त्याचे पोटाला ?

**बाळू :** वेळ आली तर बाबासाहेबांचा मुलगा म्हणून तोंहि घालेन हो आणि घातली तर जोंधळ्याची ताजी भाकरी घालेन, पण तुझ्यासारखी शिळी मिसळ नाहीं घालणार, आदल्या दिवशींची राहिलेली. आणि शिवाय उधारी लिहून

नाहीं ठेवणार वहीवर. शिळी मिसळ, भजीं अन् गव्हाच्या फोलकटाचा, हा लोकांच्या घशांत घालून पैसे खिशांत घालतो, पण एक दिवस तरी इमारत कोसळेल हो अंगावर.

**रंगराव** : घे, सिगरेट ओढ. सोता तर भाड्याच्या घरांत रहाते अन् मिजास कायला करते ?

**बाळू** : भाड्याचे पैसे देण्यासाठीं तुझ्याकडे तर मागितलें नाहीं ना कर्ज ? घाम गाळून पैसे मिळवतों, हॉटेलांत मागच्या बाजूला हातभट्टीची नासकी दारू गाळून नव्हे, कळालें काय ? सबंध समाज किडवतोस, अंगावर फुटेल हो एक दिवस.

**रंगराव** : ए बाळू ! ए सुभास, तूं हेला सांग... माझ्या वाटेला जायेल तर जड जायेल. बोलणं बंद होउनशी जायेल.

**बाळू** : अरे, बोलणें बंद होईल तुझें. तूं नुसतें मला सातबाराचे उतारे काढीत बसलेला असतों ऑफिसांत असें समजूं नकोस हो. नजर आहे माझी तुझ्यावर. तूर्त इतकंच सांगतों, सुभाषला नादीं लावूं नकोस, त्यांतच तुझं हित आहे. सुभाष, मला ऑफिसला जायला वेळ होतोय. प्रथम याला घरांतून बाहेर काढ, मला तुझ्याशीं कांहीं बोलायचंय.

**रंगराव** : अरे, ते सुभाष काय मला घराबाहेर काडते. आमचा त्याचा नाता भावाभावाचे पलिकडचा हाय.

**बाळू** : त्याचें घरबीर घशांत घालण्याचा प्रयत्न करूं नकोस हो. याचे नांवावर जरी घर असलें तरी तिच्या मिळकतीचा ट्रस्ट करून अज्ञानपालक म्हणून मला नेमलें आहे याच्या वडिलांनीं, कळालें काय ?

**रंगराव** : पाहिलीस ? ही तुझा बाप ! इतका पर इस्वास नाय पोरावर. अरे, अरे ! सुभास, काय हा तुझा दुर्दसा !

**बाळू** : उगीच त्याला भलतेंच ऐकवून भडकवूं नकोस हो. सुभाष, तुझ्यावर अधिकार गाजवावा म्हणून नव्हे, पण तुझें हिताचें म्हणून सांगतों हो ! याला प्रथम बाहेर काढ.

**सुभाष** : नाहीं, तसं नाहीं मला करतां येणार.

**बाळू** : कां बरें ?

**सुभाष** : कांहीं नाहीं. मला हवा तसा मी वागेन. मला अडवणारा तूं कोण ?

**बाळू :** भाऊ म्हणेनास का थोरला ?

**रंगराव :** साला समदा हे याचा कारकुनी चालाकी हाय, सुभास. एकटा बघून त्याची इस्टेट गिळायला बघतोस काय ?

**बाळू :** भलतेंच काय बोलतोस ? असले दुष्ट विचार असतील माझे डोक्यांत तर किडे पडतील हो माझे मेंदूंत ! स्वप्नांतसुद्धां यायचे नाहींत मनांत तसले घाण विचार ते जागेपणीं तुझ्या डोक्यांत असतात काय ? सुभाष, मी शेवटचें सांगतों तुला...तुझ्या ताईचा तुला एक खासगी निरोप आहे. कालच आलों मी तिच्या गांवाहून. पण तूं याला जायला सांग.

**रंगराव :** सुभास, हे परसंग अडचणचा हाय. आपण कसल्यापर कागदावर मगाचची येवहार करून टाकते. तुझा पर हात मोकळा होयेल; मागचा दगदग सुटेल.

**सुभाष :** तूं मला दम देऊं नकोस.

**रंगराव :** दम नाय पर...आतां तूं जावे म्हनत असेल तर जाते.

**बाळू :** मला वेळ होतोय हो सुभाष. मी काय करूं ते सांगतोस का ?

**सुभाष :** तूं जा बाहेर, मला याच्याशीं बोलायचंय कांहीं; खाजगी.

**बाळू :** मला जा म्हणतोस ? मी जातों. पण तुझ्या हिताचें तुला कळत नाहीं याचें दुःख होतें म्हणून जातों. तूं मला दूर करून याला जवळ करतोस ? हें बरें करत नाहींस हो. हें म्हणजे कसें झालें कळालें काय ? मामलेदारास दूर करून पट्टेवाल्यास जवळ करावें तसें, कळालें काय ?

**रंगराव :** तुम्ही मला पट्टेवाला म्हणाले काय ?

**बाळू :** भलतेंच समजूं नकोस हो. इतकें तुझें महत्त्व मला वाढवायचें नाहीं, कळालें काय ? याचें महत्त्व याला कळत नाहीं म्हणूनच तुझ्या पंक्तीला बसतो, इतकेंच म्हणणें.

**सुभाष :** तसं नाहीं बाळू, पण तूं जा. माझा पेंच तुला नाहीं सांगतां येत.

**बाळू :** मी तुझ्या हिताचें सांगतों.

**सुभाष :** मला जास्त कठोर बोलायला लावूं नकोस. माझ्या हिताची कळकळ तुला असण्याचं कारण नाहीं. माझं मला तें कळतं.

( रंगराव हंसतो. बाळू हिरमुसला होतो. )

**बाळू :** तूं माझा अपमान केलास काय ? इतका मी तुला वाईट वाटलों काय ?

धाकटा भाऊ समजून तुझ्याशीं वागलों. तुझी परिस्थिति ओळखून तूं मागितलेले पांच रुपये मी अजून परत घेतले नाहींत, यावरून तूं माझें मोठें मन ओळखायला हवें होतेंस.

**रंगराव :** पैसे मागण्याची कारकुनी कावा कळाली काय ? पैसा मागायचा ते मागायचा पर साला दावायचा तो नाय. हाय हाय रे मित्तर ! काय परसंगात गांठलीस तेला. हेच्याजवळ पैसा नाय असा तुला वाटला काय ? हे पांच रुपया उचल.

**बाळू :** मी पैसे दिले होते ते बाबासाहेबांच्या मुलाला दिले होते हो ! रंगरावाच्या मित्राला नव्हे.

**रंगराव :** मग घेतली कशाला ?

**बाळू :** ते पैसे तुझ्यावरून ओवाळून टाकले आणि बाबासाहेबांच्या चरणावर सोडले. तुझे पैसे माझ्या घरांत नको हो. घूस लागेल माझ्या घराला. सुभाष, तूं मला सोडलेंस पण मीं तुला टाकलें नाहीं हो. तूं मला कोणी समजत नसलास तरी मी तुला धाकटा भाऊच समजतों, कळालें काय ? आणि रंगराव, तुला पण सांगून ठेवतों, आज तूं पाय लावलायस माझ्या पायाला पण एक दिवस डोकें लावावें लागेल हो तिथेंच ! इतकेंच सुचवून ठेवतों. ( जातो. )

**रंगराव :** मंग काय सुभास, लोजिंग-बोर्डिंगचा काय करनार इचार ? आपला वाढदिवस पन आलेला हाय दुकानचा. त्या दिवशीं मागचा-पुडचा समदा हिशोब चुकता करूनशीं टाकूं.

**सुभाष :** त्यासाठीं मीं तुला थांबवलेलं नाहीं. जुगारांत हरलेल्या पैशाबद्दल म्हणत असशील तर तूं मला त्या नादीं लावलंयस, मी तुला एकहि पैसा देणार नाहीं. तुला काय करायचं तें करून घे. मला तुझी भीति नाहीं. ती माझी काळजी नाहीं. मला चिंता आहे ती माझ्या ताईची. रंगराव, तो दागिना तुला दाखवून मी पोस्टांत गेलों, त्यानंतरची हकीकत तुला कळाली काय ?

**रंगराव :** काय झाला ?

**सुभाष :** तो दागिना माझ्या खिशांत नव्हता.

**रंगराव :** असा कसा होयेल ?

**सुभाष :** तो चोरीला गेला.

**रंगराव** : खराच ?

**सुभाष** : हें मी तुला विचारतों. तुला त्याची काय माहिती आहे ?

**रंगराव** : तूं आमाला चोर समजते काय ?

**सुभाष** : घडल्याशिवाय कसं म्हणूं ? पण मग तो दागिना गेला कुठं ?

**रंगराव** : अरे, तूं आमाला काय इचारते ? अरेरे, ते बेचारा ताई काय करत असेल ? तेला पत्र तरी घाटलेस काय ? गोखले क्लॉथ स्टोअरले पत्तेवर.

**सुभाष** : कनवाळूपणाचीं नसतीं सोंगं करूं नकोस. कुठाय दागिना, खरं सांग. मी मोठ्या घरांत जन्माला आलों असलों तरी तुम्हां लोकांच्या बरोबर आडरस्त्यानं वावरलेला आहें हें विसरूं नकोस. दागिन्याचा पत्ता काढल्याशिवाय मी राहणार नाही. आणि तुला सांगून ठेवतों रंगराव, माझा तर्क जर खरोखरीच खरा ठरला तर माझ्या ताईला निष्कलंक ठेवण्यासाठीं वाटेल तो कलंक स्वतःवर ओढवून घ्यायची तयारी आहे माझी हें ध्यानांत घे आणि खरं सांग, दागिना कुठं आहे तें तुला माहीत नाहीं ? ( बाहेरून ' सुभाष देवधर ! ' अशी हांक घेऊन एक टपाल आंत येतें, सुभाष पत्र उचलतो. वाचतो. गहिंवरतो.)

**रंगराव** : काय झाला रे, कुणाचा पत्तर ? सुभास, तूं बोलत पण नाय. काय तुझी बाबासाब परत आली ? ( चोरपावलांनीं जातो. दरवाजांत बाबा दिसतात. नमस्कार करतो. लाजून पळतो. )

**बाबा** : ( पुढं येत ) सुभाष, रडतोयस तूं, काय झालं ?

**सुभाष** : ( अनवधानानं ) सांगलीला ये.

**बाबा** : सांगलीला ?

**सुभाष** : बाबा, तुम्ही ?

**बाबा** : भांबावलास कां तूं ? पाणी कां तुझ्या डोळ्यांत ? पत्र कुणाचं आलंय ?

**सुभाष** : ताईचं.

**बाबा** : काय मजकूर विशेष ?

**सुभाष** : ( पत्र न दाखवतां ) कांहीं नाहीं, खुशालीचं आहे. तुम्ही आलांत कसे बाबा ?

**बाबा** : कांहीं तरी मोठा ॲक्सिडेंट झाला आहे; सगळ्या गाड्या बंद आहेत.

**सुभाष** : सगळ्या ?

**बाबा** : होय, सगळे रस्ते बंद आहेत.

# प्रवेश दुसरा

[ ताईचं सासर. दुसऱ्या अंकांत असलेलं दृश्य. पण आतां सामानाची गर्दी दिसत नाहीं. एक स्वतंत्र सतरंजी टाकलेली डाव्या हाताला. उजव्या कोपऱ्यांत एक टी-पॉय. त्याच्यावर अत्तर-दाणी, गुलाब-दाणी, विणलेला टेबलक्लॉथ. हळदी-कुंकवाचा दिवस असावा. व्यापारी पद्धतीची आडवी वही व एक रजिस्टर घेऊन अविनाश हिशोब 'टॅली' करत बसलेला आहे. एक पत्र वाचतो— ]

**अवि० :** "आपण ते देवधर घराना मोठा मानत व्हते. पर ते समदा घराना एकदम खराब हाय. बापाला मोठापनचा ताडा हाय. पोरगा तर नंबर एकचा मौला हाय. मुलगीचा एकेक गुण लगिन झालेवर दिसतेल. ते समदा घरानाच बिघडलेली हाय. कारण बिघडनेचा मतलबच सुदरून गेलाय एकदम. आन ते आमाला हलका म्हनते. बहीण-भाऊ एकमेकचा साथीदार हाये. तेला पठानाचा कर्जा हाये. ते भागवनेसाठी बहीननं आपला एक डाग पठानाला देला. इस्वास ठेवू नका पर त्येची खात्री करूनशी घ्या."... मजकुराच्या जातीवरून लिहिणाराची जात कळली. ( ताई येते. पत्र दडवतो. )

**ताई :** येऊन गेला का पोस्टमन ? होय, पोस्टमन येऊन गेला का ?

**अवि० :** अजून चूक सांपडत नाहीं.

**ताई :** अं ?

**अवि० :** काय ? तूं मला कांहीं म्हणालीस ?

**ताई :** नाहीं, चहा टाकलाय मी. सकाळपासनं सारखं काम करतांय. सुट्टीच्या दिवशींसुद्धां विश्रांति घ्यायची नाहीं का ?

**अवि० :** तुझ्याशीं लग्न केलं त्या दिवशीं झालेली चूक निस्तरतोंय.

**ताई :** कसली चूक ?

**अवि० :** सुरुवातीला झालेली चूक वेळेवारी निस्तरली नाहीं तर हा असा अनर्थ निर्माण करते !

**ताई :** माझी कांहीं चूक नाहीं झाली !

**अवि० :** तूं स्वतःवर कां ओढून घेतेस सगळं ? अलिकडं - अलिकडं अशी भांबावल्यासारखी कां वागत असतेस ? विशेषतः तुझा भाऊ येऊन गेल्यापासून.

**ताई** : नाहीं; आपण लग्न केलं ती चूक झाली असं आपण म्हटलंत, म्हणून मीं म्हटलं.

**अवि०** : ती नाहीं. त्या दिवशीं.

**ताई** : तेंच...त्या दिवशीं—पण त्या दिवशीं अशी कोणती माझी चूक झाली कीं, जी आपल्याला नाहीं कळली ?

**अवि०** : पुन्हां तेंच. अग, तुझी चूक नाहीं बाई, माझी चूक.

**ताई** : कसली ?

**अवि०** : लग्नाच्या वेळीं मी दुकानांत होतों का ?

**ताई** : नाहीं. तें कसं शक्य आहे ?

**अवि०** : मग...नीट समजून घे. अग, त्या दिवशीं दुकानाच्या हिशोबांत झालेली चूक एवढा घोटाळा करून बसलीय कीं, त्या दिवशींपर्यंत सगळा ताळा करून पाहिल्याशिवाय ती निस्तरणार नाहीं...असं माझं म्हणणं.

**ताई** : असं होय ! मला वाटलं...

**अवि०** : काय वाटलं ? तोच तर माझा प्रश्न आहे. लग्नाच्या दिवशीं कोणती चूक तुझ्या हातून झाली आहे कीं, ती सुधारतां न आल्यानं तुला निस्तरावी लागते आहे आणि जी मला कळलेली नाहीं ?

**ताई** : माझी...कांहीं नाहीं.

**अवि०** : मग काय दुःख आहे तुला ?

**ताई** : नाहीं हो. सुखाला जर दुःख असं दुसरं नांव असलं तर तेवढं बरिक आहे.

**अवि०** : मग तूं अशी कावरीबावरी कां असतेस सदा ? हें बघ, जिव्हाळ्यानं विचारणाऱ्या माणसापासून कांहीं दडवून ठेवूं नये, पाहा बरं. कारण पुढं जर त्यांना कांहीं विपरीत कळलं तर त्यांना दुहेरी दुःख होतं. एक तर व्यक्तीचा आपल्यावर विश्वास नाहीं हें दुःख आणि दुसरं ती व्यक्ति आपण समजत होतों तशी नव्हती, लबाड होती, हें दुःख.

**ताई** : नाहीं हो, मी तशी नाहीं. एवढाहि विश्वास माझ्यावर नाहीं का ?

**अवि०** : आहे ना ! म्हणूनच तर विचारतोंय. पहा...पुन्हां डोळे भरून आले तुझे ! कशामुळं तूं एवढी हळवी झालीयस ? [ आंतून शारदाबाई येतात. ]

**शारदा०** : नव्या वस्त्राची घडी एकदां विस्कटली कीं ती सरळ करणें फार

कठीण जातं. हो कीं नाहीं रे अविनाश ?

**अवि० :** कसलं नवीन वस्त्र ?

**शारदा० :** अरे, तूं हिच्याकरितां तो नवीन शालू नाहीं का आणलास ? तर हिला म्हटलं चार बायका यायच्या आहेत गांवांतल्या हळदीकुंकवाला... तर तो नेस. तर ही म्हणे...जुनी पैठणीच आपली मला द्या. आतां तूंच सांग बघू हिला.

**अवि० :** आई, तिला कांहीं सांगायचं नाहीं असं ठरवलंय मीं. ती कुठं आपल्याला सगळ्या गोष्टी सांगते ? तिला काय हवं तें करूं दे.

**शारदा० :** असं नको रे बोलूंस. बिचारी ! ( ताईला उद्देशून ) ताई, आम्हांला तरी तुझं कौतुक करण्याची आपली हौस केव्हां भागवायला मिळायची, सांग बघूं ? गांवांतल्या चार बायका यायच्यात. त्यांना सून बघायची असेल. त्यांना साजरी नको का दिसायला ? चार दागिने घाल अंगावर, शालू नेस. हवं तर संध्याकाळीं दृष्ट काढीन. मीं निऱ्या काढून ठेवल्यात, एकदां वस्त्राची घडी मोडली कीं दुकानदारसुद्धां परत घेत नाहीं.

**ताई :** घरच्याच दुकानांतला शालू आहे ना ?

**अवि० :** पण गिऱ्हाईक घरचं नाहीं येत दुकानांत. नाहीं म्हणजे माझा कांहीं आग्रह नाहीं हं, पण दुकानदार म्हणून सांगितलं...माल परत न घेण्याचं कारण. तुला नेसायचा नसला तर नेसूं नकोस. एकदां घडी मोडली कीं पुन्हां नाहीं बरोबर बसवतां येत. व्यवहारांत काय किंवा संसारांत काय, असंच असतं, नाहीं का ग आई ? एकदां घडी विसकटली कीं विसकटली ! पुन्हां सरळ होणं महाकर्म कठिण.

**शारदा० :** हां, आलं माझ्या लक्षांत हो. तिला कांहीं तरी बोलण्याचं निमित्त काढतोय. जा ग मुली आंत. मी चहा करून ठेवलाय. गाळ आणि घेऊन ये. तोंपर्यंत हा विसरेल. [ ताई जाते. ] कां रे बिचारीला बोलत असतोस ? आधींच बिचारी कसल्या तरी दुःखांत चूर असते.

**अवि० :** तीच सल तर मला एकदां काढायची आहे. तिचं दुःख शोधायचंय. शक्य तर त्यावर इलाज करायचाय.

**शारदा० :** दुःख गोड बोलूनसुद्धां काढतां येतं शोधून. जखमेवर मलम लावायचं असतं, दबावानं नाहीं बरी होत ती.

**अवि०** : जखम असली तर ! आणि करट असलं तर ? निचरा करून टाकलेला बरा, नाहीं का ? व्यथा एक आणि इलाज दुसराच, असं न व्हावं. आम्ही आपल्याकडून तिला काय कमी सुख देतोंय ? पण अंगीं लावूनच घ्यायचं नाहीं असं ठरवलं असलं तिनंच...

**शारदा०** : असं कोण करील रे मुद्दाम ? उगीच कडवट बोलत असतोस तिला.

**अवि०** : तुझी माया आहे तिच्यावर म्हणून तुला तसं वाटतं. पण मी तिला असं बोलतों तें तिच्या हितासाठीं.

**शारदा०** : पण गोडव्यानं जें होण्यासारखं आहे...ज्ञानेश्वरमाउली म्हणते...

**‘ रोग जाय जरी दूध-साखरे तरी निंब का पियावा | ’**

**अवि०** : होय आई. पण अति कौतुकानं नवज्वर झालेल्याला दूधसाखर देणं हें घातकच असतं, असंहि ज्ञानेश्वर म्हणतात.

**शारदा०** : पण नवज्वर झालाय हें कुणीं ठरवायचं ?

**अवि०** : लक्षणांवरून निदान सांगायचं.

**शारदा०** : कसलीं लक्षणं ?

**अवि०** : पाहा न तिचा चेहरा, लग्न झाल्यापासून एकदां तरी हंसलेली दिसली का ?

**शारदा०** : हो, मला दिसली खूपं वेळेला.

**अवि०** : तशी मलासुद्धां दिसली ग. पण तें ओढूनताणून आणलेलं हंसूं. पांढऱ्या शुभ्र धोतराला मध्येंच एखादी काळी किनार असावी तशी दुःखाची एक सुरकुती हंसत असतांनासुद्धां तिच्या चेहऱ्यावर ओढलेली दिसते ती का ? कसली चिंता आहे तिला ? कोणतं दुःख दडून बसलंय तिच्या मनांत ? तें मला उखडून काढायचंय. रागावूं नकोस आई माझ्यावर. पण सबंध संसार मला तिच्याशीं करायचाय. आज मीं या गोष्टीचा छडा लावायचं पक्कं ठरवलंय. मग त्यासाठीं मला थोडं कठोर व्हावं लागलं तरी हरकत नाहीं.

**शारदा०** : अरे, पण तिला कदाचित् आपल्या घरची आठवण येत असेल, वडील डोळ्यांपुढं येत असतील.

**अवि०** : मग जा म्हटलं माहेरीं, तर मग जात कां नाहीं ?

**शारदा०** : तुला दुःख होऊं नये म्हणून.

**अवि०** : अशी राहून होणाऱ्या दुःखापेक्षां तशी जाऊन झालेलं दुःख मला

परवडेल. तसं नाहीं आई, यापेक्षां कांहीं तरी वेगळं कारण आहे.

**शारदा०** : कांहीं तरीच असतं तुझं बाबा ! तुम्हां मुलांना लग्नाच्या बायका आल्या हाताशीं कीं दावणीला बांधलेल्या गाई गोठ्यांत आल्यासारखं वाटत असतं. तुमच्या मनांत आलं कीं त्यांनीं चारा खाल्ला पाहिजे. तुमच्या मनांत आलं कीं त्यांनीं मान हालविली पाहिजे. त्यांना कांहीं स्वतःचं मन आहे का नाहीं ? तूं म्हणतोस तें अगदींच सगळं खोटं असेल असं नाहीं, पण थोडा विचार करावा. थोडं तिचं ऐकावं. थोडं आपलं करावं. बघ मी पाहातें तिला विचारून, आणि हें बघ...आजचा दिवस तरी तिला कांहीं बोलूं नकोस. चार बायका यायच्यात. त्यांच्यादेखत शोभा नको. ( अविनाश रंगरावचं पत्र तिच्या हातीं देतो तें वाचून ) नाहीं रे, असं असणार नाहीं. अशीं दुसऱ्याच्या संसारावर बिब्बा घालणारीं नतद्रष्ट माणसं पुष्कळ असतात जगांत. त्याच्या भाषेवरून धाटणी कळत नाहीं का त्याच्या विचाराची ?

**अवि०** : म्हणजे मला कांहीं कळतच नाहीं ?

**शारदा०** : नाहीं रे बाबा, कळत नाहीं मलाच. एकटी आहें ना मी ? तुझ्या आधारावर राह्यचं. असतें कपाळानं धड तर कशाला इतका प्रसंग येता ?

**अवि०** : आई, आई— ( तिच्याजवळ जाऊन ) नाहीं ग नाहीं. तुला तसं म्हणायचं माझ्या मनांतसुद्धा नव्हतं. आई, तूं गैरसमज नको करून घेऊंस. डोळे पूस, पूस बघूं डोळे. आई, ए आई, रागावलीस होय माझ्यावर ? आई...

**शारदा०** : नाहीं रे बाबा, रागावून करूं काय ? चालायचं कसं ? प्रत्येकाच्या संसारांत रोज चालणाऱ्या गोष्टी आहेत या. आज इथं तर उद्यां तिथं. [ ताई येते. ] ये मुली. चहा आणलास ?

**अवि०** : साखर घातलीय का ? का कालच्या वरणासारखं ? अग आई, काल हिनं वरणांत डाळच घातली नव्हती, बाकी सर्व ठीक.

**ताई** : तें काल चुकून झालं.

**शारदा०** : चुकूं दे. मोठा चवीनं जेवणारा आहेस, ठाऊक आहे ! तुला समजली केव्हां रे डाळ नसलेली ?

**अवि०** : जेवण झाल्यावर.

**शारदा०** : तेंसुद्धां हिनं सांगितल्यावरच ना ? मग झालं तर. घे चहा. दे ग त्याला.

**अवि०** : घ्या, आपल्या वडिलांनींच सांगितलंय...' साखरच आहे, तरी पण गोड मानून घ्या.'

**शारदा०** : तोंड का रे असं केलंस ?

**अवि०** : साखरेला सॅकरिनची चव आलीय. अति गोड ना !—म्हणून कडू.

**शारदा०** : तो तुझ्या जिभेचा कडवटपणा आला असेल साखरेला.

[ आंत जाते. ]

**अवि०** : तुझी बाजू घ्यायचा मक्ताच घेतलेला दिसतोय आईनं.

**ताई** : खरंच सांगा, माझा राग येतो आपल्याला हल्लीं ?

**अवि०** : शूः ! त्या बाबतींत बोलायचं नाहीं. राग येत असला तरी–

**ताई** : माझं चुकतं का कांहीं ?

**अवि०** : छे छे, चुकतं माझंच. आपली बायको नेहमीं हंसतमुख असावी, तिला कसलं दुःख होऊं नये असं मला वाटतं, तें माझंच चुकतं. परमेश्वरानं तशी घडण केलीय तुझ्या चेहऱ्याची असं समजून मीं स्वस्थ राह्यला हवं. तूं नेहमीं हंसतच असतेस; फक्त तुझा चेहराच तसा दिसत नाहीं दोष तुझा नाहीं, चेहऱ्याचा आहे. घे, चहा घे.

**ताई** : नाहीं, मला नको.

**अवि०** : नको, ठीक आहे. तूं घेतेस असं समजून मी आनंद मानतों.

**ताई** : द्यावा इकडं. आतां घेत नाहीं असं समजून दुःख नाहीं ना मानणार ? ( कप घेते. ) अजून पोस्टमन नाहीं आला ?

**अवि०** : नाहीं. रोज कुणाच्या पत्राची वाट बघत असतेस ग, इतक्या आतुरतेनं ?

**ताई** : कांहीं नाहीं. बाबा काशीला चाललेत...त्यांचं कांहीं तरी पत्र...

**अवि०** : आलं तर तें तुला कळवणार नाहीं का मी ?

**ताई** : तसं नाहीं, पण भाऊ येऊन गेल्यापासनं, कांहीं टपाल नाहीं म्हणून ही हुरहूर वाटते.

**अवि०** : येवढंच ना ? येईल पत्र आज ना उद्यां. त्याला कांहींच वाटत नाहीं आणि तूं मात्र उगीचच चिंता करत बसतेस. हें बघ, उद्यां नाहीं पत्र आलं तर मी वाईला माणूस पाठवून चौकशी करीन, पण तूं प्रसन्न राहा बाई. यासाठीं एवढी धडपड करायची– [ शारदाबाई येतात. ] आणि तुझा चेहरा—

**शारदा०** : आलास का पुन्हां तिच्या चेहऱ्यावर ?

**अवि०** : किती छान दिसतो असं मी म्हणणार होतों.

**शारदा०** : मुली, तुझे दागिने बघितले मी आत्तां, जरा रिठ्याच्या पाण्यानं धुवावेत म्हणून. तुझी माहेरची मोनहमाळ कुठं दिसत नाहीं ग ?

**ताई** : असं कसं होईल ? परवां तर होती. मी शोधतें. जाईल कुठं ?

**शारदा०** : गेली असं नाहीं म्हणत मी, तूंच ठेवली असशील कुठं डाव्या उजव्या हातानं. [ ताई जाते. दारांत एक पोस्टमन येऊन उभा राहतो. ]

**पोस्टमन** : रामराम साहेब.

**अवि०** : रामराम. या महाराज, काय आणलंय ?

**पोस्टमन** : त्याचं काय आहे, एक एक्स्प्रेस डिलिव्हरी लेटर आहे.

**अवि०** : पोस्टमन होय तुम्ही ? आणि युनिफॉर्म नाहीं ? मीं ओळखलं नाहीं.

**पोस्टमन** : त्याचं काय आहे, जुना धुवायला गेलाय आणि नवा शिवायला गेलाय.

**अवि०** : म्हणून एक्सप्रेस डिलिव्हरी साध्या डिलीव्हरीनंतर होय ?

**पोस्टमन** : त्याचं काय आहे, तें कालचं आहे.

**अवि०** : अरे वा ! म्हणजे तें आजच्यापेक्षां नवं झालं कीं.

**पोस्टमन** : नाहीं साहेब. त्याचं काय आहे, पोस्टमन नवीन आहे. त्याला पत्ता नाहीं सांपडला, म्हणून मास्तरनीं मुद्दाम पाठवलं. म्हणजे मी जुना माणूस. बरेच दिवस रजेवर होतों. रामराम !

**अवि०** : रामराम ! कां हो, आतां थांबलांत ?

**पोस्टमन** : नाहीं साहेब, त्याचं काय आहे; दिवाळीला मी नव्हतों ना... आमचं...

**अवि०** : पोस्त ? आलं लक्षांत. म्हणजे हें बघा, त्याचं काय आहे, एक्स्प्रेस डिलिव्हरी लेटर आणि एक दिवस लेट आणून द्यायचं म्हणजे मिळतं पोस्त. दुकानावर येऊन घेऊन जा.

**पोस्टमन** : त्याचं काय आहे—

**अवि०** : असूं दे.

**पोस्टमन** : दुकानांत येतों. [ जातो. ]

**अवि०** : उशिरां पत्र आणून लेकाचा वर पोस्त मागतोय. आई, हिचं पत्र

आहे. हूरहूर लागली होती. फोडूं का ? वडिलांचं पत्र दिसतंय. एक हंसवण्याची संधि आलीय. आपण घ्यावी. आई, तुझ्या साक्षीनं फोडतोंय ग !

**शारदा०** : हें घ्या, तुम्हां नवरा-बायकोंत माझी कसली रे साक्ष ! ( अविनाश पत्र फोडतो, त्याचा चेहरा बदलतो. ) कुणाचं रे पत्र हें ?

**अवि०** : आई हिच्या चिंतेचं कारण समजलं.

**शारदा०** : बघ, मी सांगत नव्हतें ?

**अवि०** : आई, मोहनमाळेबद्दल ती काय म्हणत होती ग ?

**शारदा०** : अरे, ठेवली असेल कुठं तरी तिनंच.

**अवि०** : असं ती म्हणाली ?

**शारदा०** : अरे, शोधत असेल घरांत.

**अवि०** : सोंग करत असेल शोधण्याचं !

**शारदा०** : म्हणजे ?

**अवि०** : हें तिच्या भावाचं आलेलं पत्र ऐक— " ताई, तुझं पत्र मिळालं. पठाणाकडून मीं मोहनमाळ आणली, पण ती चोरीला गेली. शोधांत आहें. मला क्षमा कर. –तुझा भाऊ."

**शारदा०** : तसं नसेल रे. प्रत्यक्ष तिला पत्र दाखव, ती काय म्हणते तें बघ आणि नंतर काय तर्क करायचे ते कर.

**अवि०** : तर्क कसले आई ? स्वच्छ तिचा भाऊ लिहितोय, " तुझं पत्र मिळालं. माळ आणली पण ती चोरीला गेली." म्हणजे मोहनमाळ इथं नव्हती. हिला तें माहीत होतं तरी आम्हांला सांगते– 'परवां तर होती; आतां मी शोधतें.' खरं लपवतेय. इतकं चांगलं वागून हें फळ कशासाठीं ?

**शारदा०** : तिच्या भावाची चूक असेल, ती त्याला वांचवत असेल.

**अवि०** : पण माझ्याशीं खोटं कशासाठीं ? माझ्यापासून ती हें लपवते. मी जगांत विश्वास टाकायचा कुणावर ? नाहीं आई, या गोष्टीचा निकालच लागला पाहिजे. जोंपर्यंत तिच्या मनांतली रुखरुख जाणार नाहीं तोंपर्यंत मला समाधान मिळणार नाहीं. आज मोहनमाळ लपविली, उद्यां आणखी कांहीं लपवील. भावाला पाठीशीं घालायचं असलं तर तिनं माहेरीं जावं.

**शारदा०** : अरे, त्याच्या अपराधाचं प्रायश्चित्त तिला कां ?

**अवि०** : तिनं त्याला पाठीशीं घातलं म्हणून.

**शारदा०** : कर बाबा, तुझ्या मनांत येईल तें कर. [ ताई येते. ] सांपडली का मुली मोहनमाळ ?

**ताई** : नाहीं सासूबाई, मी शोधून पाहिली. कपाटांत नाहीं. ट्रंकेंतहि नाहीं. परवां तर होती.

**अवि०** : परवां असती तर हें कशाला आलं असतं ? घरांतच नसेल तर ट्रंकेंत कुठून येणार ?

**ताई** : घरांत होती.

**अवि०** : खोटं बोलूं नकोस. जा माझ्या डोळ्यांसमोरून—

**ताई** : सासूबाई,– ( शारदाबाईजवळ जाते. हलक्या हातानं तिला बाजूला करून शारदाबाई आंत निघून जातात. )

**अवि०** : रडूं नकोस ! रडणंहि खोटं. खोटं सगळं. कुठंय मोहनमाळ तें सांग ! खरं सांग. घरून येतांना आणली होतीस का ?

**ताई** : घरून ?

**अवि०** : घरून म्हणजे तुझ्या माहेरून.

**ताई** : मला आठवत नाहीं.

**अवि०** : मग उद्यां सकाळच्या गाडीनं माहेरीं जा.

**ताई** : माहेरीं ?

**अवि०** : होय, माहेरीं ! मोहनमाळ शोध आणि मिळाली तरच परत ये. समजलं ? हें तुझ्या भावाचं पत्र वाच– [ पत्र तिच्या पुढं टाकतो. ती उचलते. ] खोटं बोलते— माझ्याशीं खोटं बोलते. ( पुटपुटत अविनाश आंत जातो. )

**ताई** : ( पत्र वाचून ) भाऊ, तूं काय केलंस रे हें !

( आंतून लांबून गाण्याचे स्वर )

**पापासाठीं पुण्याईची अशीच होते दैना**
**पुण्य राहतें कांठावरतीं, पापी गंगास्नाना ।।**
**अशांची अशीच होते दशा,**
**अशा दशेला नांव न दुसरें,**
**अहो हीं, नवग्रहांची दशा ।। १ ।।**

**पापी होता रावण म्हणुनी**
**करितसे अग्निदिव्य जानकी**
**पाप कुणाचें शाप कुणाला**
**नियतीची रीतच ही काय कीं**
**रामायण सांगतो वाल्मिकी**
**म्हणे ही रामाची ग्रहदशा**
**तशी उर्मिला तिथें उपाशी**
**सीतेची ही दशा**
**अशांची अशीच होते दशा ॥ २ ॥**

## प्रवेश तिसरा

[ माहेरचं अंगण. तुळशीपुढं समई आहे. पाटावर बसून तुळशीजवळ बाबा ज्ञानेश्वरी डोळ्याजवळ धरून वाचत असतात. आंतून 'लेक भाग्याची भाग्याची...' ही ताईची ओवी कानावर पडत असते. ]

**बाबा :** स्थितप्रज्ञस्य का भाषा...( हा श्लोक आणि त्याच्यापुढचे इतर श्लोक वाचत असतां बाळू आपटे येऊन उभा राहतो. कोट, हॅट, बूट, आतां त्याच्या कमरेला पट्टा आला आहे. पुस्तक खालीं ठेवून—)

**बाबा :** कोण सुभाष ? अरे, कुठं होतास रे पंधरा दिवस ? तुझी रोज ताई आठवण काढते आहे आल्यापासून. तूं काय करून ठेवलंस हें तिचं ?

**बाळू :** तुम्हीं मला ओळखलें नाहीं काय ? मी सुभाष नव्हे हो. बाळू नव्हे काय आपट्यांचा ?

**बाबा :** बाळू, मीं ओळखलेंच नाहीं रे. म्हणजे गेले पंधरा दिवस जवळचं सुद्धां माणूस ओळखतां येत नाहीं. वस्त्र दिसतं पण माणूस नाहीं ओळखत डोळ्याला.

**बाळू :** अरे अरे, मला ठाऊक नव्हतें हो, म्हणून विचारलें. उपमर्द केला तुमचा, ओळखलें नाहीं काय असें विचारून.

**बाबा :** अरे, मग त्यांत काय झालें ? वयोमानानं होतं असं. दूरदृष्टि

आली कीं, जवळची दृष्टि जायचीच. संन्यासाकडे लक्ष लागलं कीं, संसारांत विरक्ति यायचीच. तसंच हें. बरं, कां आला होतास ?

**बाळू** : शुभ वर्तमान कळालें म्हणून. नमस्कार करावयास आलों.

**बाबा** : मग शिरस्त्याप्रमाणें पेढे नाहीं का आणलेस ?

**बाळू** : आणलेत. म्हणजे आज अर्धा किलो आणलेत.

**बाबा** : म्हणजे वजन वाढलं म्हण कीं पेढ्यांचं ? तेंच म्हटलं मीं.. तूं यायचास म्हणजे एक शुभ वर्तमान घेऊन तरी...नाहीं तर पेढे घेऊन तरी.

**बाळू** : किंवा नमस्कार करण्यासाठीं तरी (पाया पडतो.)

**बाबा** : आशीर्वाद आहे ! काय वार्ता आहे ? मामलेदार झालास का ?

**बाळू** : आपल्या आशीर्वादानं मामलेदार झालों— पण तें टेंपररी, दुसऱ्याच्याऐवजीं.

**बाबा** : बाळू, त्या मानानें तूं लवकर मामलेदार झालास, नाहीं ?

**बाळू** : लवकर म्हणजे ? दोन 'डिपोर्टमेंटल एक्झामिनेशन्स' एकदम दिल्या. ॲंबिशन पुरी झाली. हेडक्लार्क झालों होतों त्या दिवशीं म्हटलें होतें मनांत कीं, एक दिवस मामलेदार होईन त्या दिवशीं बाळू आपटे हें नांव सांगेन. नमस्कार केला तो त्याचा हो. पण पेढे आणले ते दुसऱ्याच कारणासाठीं.

**बाबा** : काय, लग्न ठरलें काय तुझें ?

**बाळू** : तें तर ठरलेंच, दामल्यांच्या सरस्वतीबरोबर.

**बाबा** : चला, सुखांत पडली मुलगी.

**बाळू** : पण पेढे त्याचे नव्हेत हो.

**बाबा** : मग आणखी काय ?

**बाळू** : ते माझेविषयीं नाहीं. आणले होते माझ्यासाठीं पण वांटतों आपल्यासाठीं.

**बाबा** : माझ्यासाठीं ? कां ? दूरदृष्टि आली म्हणून ?

**बाळू** : ती होतीच आपल्याला. म्हणूनच आपले प्रयत्न यशस्वी झाले. आज मला ऑफिसांत...आज प्रथमच ऑफिसांतले काम चुकवून बाहेर पडलों. म्हणजे आतां मामलेदार झालों ना ? तेव्हां आतां ऑफिसांत विचारणारे कोणी नाहीं, कलेक्टर येईपर्यंत. असें करणें चूक, पण चुकवलें आपल्यासाठीं. लखोटा आलाय सरकारी. पानसरे वकिलांच्या नांवानें.

**बाबा** : कसला लखोटा ?

**बाळू** : विश्वनाथ सोमणाची जन्मठेप रद्द झाली म्हणे. त्याचे पेढे आणले.

**बाबा** : आं ? विश्वनाथ सोमण सुटला ?

**बाळू** : होय, आपल्या खटपटीला यश आलें.

**बाबा** : आण इकडे तो पेढा. ( तुळशीपुढं ठेवतात. ) विरक्त व्हायला लागलोंय, पण संसार पुन्हां आपल्यांत ओढतोय. अग ताई, मी जरा पानसरे वकिलांकडं जाऊन येतो हं. विश्वनाथ सोमण सुटला. अरे बाळू, तो सुभाष कुठं भेटला का ?

**बाळू** : नाहीं भेटला. पण तर्क आहे माझा, भेटेल. आज भेटेल. आपण चिंता करूं नका. आतां मी घेतों त्याला वळणावर. त्या रंगरावाच्या तावडींतून सोडवतोंय मी त्याला. त्याचा मी आज केलाय बंदोबस्त. [ ताई येते. ]

**ताई** : मला हांक मारलीत बाबा ?

**बाबा** : अग, एक आनंदाची बातमी आणलीय बाळूनं.

**ताई** : सुभाषचा पत्ता लागला कुठं ?

**बाबा** : पाहिलंस ? हिला आनंदाची बातमी एवढी एकच.

**बाळू** : भावाचें प्रेम बहिणीला असायचेंच हो.

**बाबा** : ताई, विश्वनाथ सोमण सुटला. खटपटीला यश आलं. एक कलंक दूर झाला. यानं आणलीन बातमी.

**ताई** : होय बाळू ?

**बाळू** : मी नुसतीच बातमी आणली हो. पण केस सोडवली यांनींच.

**बाबा** : मी कसली ? नुसते कागदपत्र माझे. मेहनत पानसरे वकिलांची हो ! स्नेह सांभाळला त्यांनीं. दिल्लीच्या इतक्या वाऱ्या केल्या त्या निरपेक्षबुद्धीनं. निव्वळ मित्राचं काम करायचं म्हणून. बाळू, नवीन पिढीला शिकायचं असलं तर हा आदर्श ठेवा डोळ्यांसमोर, या निःस्वार्थ मैत्रीचा. प्रथम त्यांचे आभार मानले पाहिजेत. अरे, घेऊं का हे तुझे पेढे ?

**बाळू** : घ्या ना ! त्यांत विचाराचें काय ?

**बाबा** : ताई, घे हा !

**ताई** : आणि भाऊला ?

**बाबा** : अग, आहे कुठं तो ?

**ताई** : येईल तो !

**बाबा** : येईल. आशा सुटेना देव भेटेना ! ( पेढे देतात. ) मी येतों जाऊन, ताई.

**बाळू** : मी पोहोंचवायला येऊं काय ?

**बाबा** : चार पावलांवर तर त्यांचं घर. आत्तां येतों जाऊन. [ जातात. ]

**ताई** : बाळू, बैस ना.

**बाळू** : या खाटेवर बसलें तर चालेल काय ? नाहीं म्हटलें, खालीं बसलें तर पँटची इस्त्री मोडेल म्हणून म्हटलें हो.

**ताई** : तूं केव्हांपासून इस्त्रीला जपायला लागलास ?

**बाळू** : खुर्चीसाटीं इस्त्रीला जपावें लागतें. माझी अँबिशन पुरी झाली. माझी मामलेदार म्हणून नेमणूक झालीय, टेंपररी. पण ऑफिसांत वचक नाहीं राहात, इस्त्री नसली तर.

**ताई** : म्हणजे वचक कपड्यांचा का तुझा ?

**बाळू** : म्हणजे तसा माझा चेहरा बावळटच नाहीं का, म्हणून कपड्यांतून थोडें अवसान आणावें लागतें उसनें शिवाय माझें लग्न ठरलें ना ? तेव्हां आतां स्त्री घरांत यायची म्हणून आधीं इस्त्री जपायला हवी. म्हणजे पुढें स्त्री जपतां येईल. मी थोडासा विनोद केला. तुला कळालें काय ?

**ताई** : आं ? हो, अगदीं मामलेदार झालास असें वाटतें.

**बाळू** : वाटलें ना ? तेंच तें ! त्याचें काय आहे, सोसायटींत वावरायचें म्हणजे असा विनोद करावा लागतो मधून मधून.

**ताई** : असं होय ! लग्न ठरलं म्हणतोयस ? कुणाशीं ?

**बाळू** : पण आत्तांच तिचें नांव कसें घ्यावें ?

**ताई** : कां ? लाजतोस ?

**बाळू** : तसं नव्हे ग ! पण आत्तांच नांव कसें घ्यावें ? अग, तें ठरलेंच. आपल्या पेठेंतील सरस्वतीबरोबरच. अग, ती...ती नाहीं का...मास्तरांची मुलगी ?

**ताई** : सरस्वती ! तिच्याशीं ठरलें तुझें लग्न ? बाळू, तो सुभाष कुठं भेटला होता का रे ?

**बाळू** : नाहीं, भेटला नाहीं. पण माझा अंदाज आहे, तो त्या रंगरावकडेच

राहतो असें, मला वाटतें हो. वाटतें म्हणजे नुसतें वाटतें. तसें असेलच असें नाहीं हो. ...

**ताई :** बघ रे त्याला. त्याच्यासाठीं मी परत आलेंय. आणि तो दिसला-सुद्धां नाहीं मी परत आल्यापासून. तो जेवतो कुठं ? राहतो कसा ? मला कांहीं कळलं नाहीं. त्याला भेटलास तर त्याला म्हणावं... 'घरीं ये. मी तुझी वाट बघतें. मी तुला कांहीं म्हणत नाहीं. कसलाहि दोष देत नाहीं. चोरीला गेलेली असली मोहनमाळ तरी जाऊं दे. पण तूं परत ये. माझी मोठी वाईट परिस्थिति आहे.' तूं कोणाजवळ बोलूं नकोस बाळू. पण माहेरीं आलीय ना मी... ती परत न जाण्यासाठीं.

**बाळू :** सांगतेस काय भलतेंच !

**ताई :** तुला मी तो निरोप दिला होता ना मोहनमाळेचा ?

**बाळू :** तो त्यानं ऐकलाच नाहीं ग, त्या रंगरावाच्या नादानं.

**ताई :** तर ती मोहनमाळ चोरीला गेली म्हणे भाऊच्या हातून.

**बाळू :** रंगरावाकडे असणार, जाते कुठं ? नंबर एकचा बिलंदर चोर तो !

**ताई :** 'ती परत आण तरच परत ये' असं सांगितलंय ह्यांनीं. बाबांनीं मला अजून विचारलं नाहीं. बाबांनीं विचारलं, 'तू परत कां आलीस ?' तर मला उत्तर देतां यायचं नाहीं. 'घरचं पत्र कां नाहीं ? परत कधीं जाणार आहेस ?' असं विचारलं तर काय सांगूं बाबांना ? माझी मोठी कुचंबणा झालीय रे. आणि ज्याच्यासाठीं परत आलें तो तोंडसुद्धां दाखवीत नाहीं.

**बाळू :** मी सांगूं का ताई ? हा कागद करून दिलाय ना बाबांनीं घराचा, त्याच्या नांवानं, तर आज त्यांचें ठरलेंय कीं, हें घर त्यानें लिहून द्यायचें रंगरावाला.

**ताई :** छे, छे ! असं नाहीं होणार. भाऊ असं कधींच करणार नाहीं. पण माझा भाऊ कुणालाच कळला नाहीं. तुम्हां सगळ्यांना तो वाईटच वाटत आला. तुम्ही सगळे त्याचा राग राग करतां. मला बाबा तरी आहेत, पण आई गेल्यापासून तो एकटा आहे. तो तसा नाहीं रे !

**बाळू :** तसें असेलच असें नाहीं हो. पण जर तसें असलेंच तर तसें घडणार नाहीं हें मात्र नक्कीच.

**ताई :** खरेंच ? तुझ्या तोंडांत साखर पडो !

**बाळू** : त्याला वेळ आहे ग अजून. आज अगोदर रंगरावचें निघेल कांडांत म्हणजे आतां अकरा वाजले ना, म्हणजे आतां गेलेच असतील ते पोलीस त्याच्या घरावर झडती घेण्यासाठीं.

**ताई** : म्हणजे रे काय ?

**बाळू** : त्याला वाटलें असेल, मी नुसती कारकुनी करतोंय म्हणून. पण आम्हां कारकुनांचीं फौंटनपेनें एकदां बाहेर पडलीं कीं भल्याभल्यांची वाचा बंद करून टाकतात... हें नसेल त्याला कळलें ! पोलीस कचेरी आमचे शेजारीं असते नव्हे काय ? रंगराव जुगार खेळतो, चोरीचा माल विकत घेतो, हातभट्टी चालवतो, म्हणजे दारूची नव्हे काय ? आणि आज मला असें कळालें आहे कीं, आज अकरा वाजतां चोरटें सोनें त्याच्या घरांत येणार आहे. कॉन्फिडेन्शल आहे हो. नाहीं तर कुठं बोलशील. साताराच्या डी. एस. पी.च्या ऑर्डर्स आहेत. आतां त्याच्या घराची झडती होईल. त्याला एकदां तुरुंगांत जाऊं दे, म्हणजे मग आमचा सुभाष मोकळा होईल. त्यानं आणिक धंदे केले असते तरी मला कांहीं वाटलें नसतें. पण भल्या घरांतलें मूल बिघडविलें ना त्यानें, म्हणून माझें डोकें बिघडलें हो. मीं तुला सांगितलें नव्हतें काय कीं, मी तुझ्या घरावर लक्ष ठेवेन म्हणून ?

**ताई** : हें बघ, जर रंगरावच्या घरांत असला तर त्याला भेट. त्याला म्हणावं, 'मी तुझ्यावर रागावलें नाहीं, पण तूं परत ये.'

**बाळू** : सांगेन हो मला भेटला तर. येऊं आतां ?

**ताई** : हो. तुला ऑफिसांत जायचें असेल ना ?

**बाळू** : हो, जायला हवें. म्हणजे त्याचं काय आहे, लाइफमध्यें ऑनेस्टी पाहिजे.

( बाळू जातो. ताई सुभाषच्या खाटेजवळ जाते. बसते. पांघरूण काढते. )

**ताई** : भाऊ, तूं काय करून ठेवलीस ही माझी अवस्था ! आणि स्वतःची काय करून घेतलीयस ! ( वही हातीं लागते. वाचते— )

**तुझ्या सुखास्तव ओवाळिन ही दुबळी जीवनकुडी**
**वाहतों ही दुर्वांची जुडी !**

( सूटकेस घेऊन बाळू परत येतो. )

**बाळू** : तूं भलतेंच काय म्हटलेंस ग ताई, कायमची आलें म्हणून ! हें

बघितलेंस का कोण आलें तें? हे तुझे 'हे' आणि ह्या...—[ शारदाबाई आणि अविनाश येतात, पाय धुतात. ]

शारदा० : हा ऐकेनाच. तूं कशाला आणलंस सामानबिमान?

बाळू : आणायलाच हवें. मामलेदार झालों तरी ऑफिसांत हो! येथें या घरांत तिचा भाऊ आणि मी एकच हो!

शारदा० : मामलेदार झालास?

बाळू : टेंपररी. अँबिशन पुरी झाली. बरें, येऊं?

शारदा : हो, ये हो, मुला.

बाळू : बरें आहे ताई! आतां येतों. येतों म्हणजे परत नाहीं येत. आतां जातों. [ जातो. ]

शारदा० : [ ताई पायां पडते. ] औक्षवंत हो!

ताई : आपण कशा आलांत?

शारदा० : तुझ्या वडिलांनीं तुला विचारलं नाहीं, तूं परत कां आलीस म्हणून?

ताई : नाहीं!

शारदा० : पाहिलंस? त्यांचं मन किती मोठं आहे!

अवि० : हो!

शारदा० : हो काय? आणि ताई, तुला खरं सांगूं का? मोठ्या तावा-तावानं तुला बोलला आणि मग रोज विचारत होता... 'ती परत कधीं येणार' म्हणून.

अवि० : म्हणजे? तुझं काय म्हणणं तिनं परत यायलाच नको होतं वाटतं?

शारदा० : हें माझें नाहीं, तुझें म्हणणें होतें. तूंच सांगितलें होतेंस ना तिला ती मोहनमाळ सांपडली तरच परत ये म्हणून!

अवि० : हो, पण 'नाहीं सांपडली तर परत येऊं नकोस!' असं कुठं मीं म्हटलं होतं?

शारदा० : जाऊं दे तें. आपली चूक कबूल करावी.

अवि० : तेंच मी हिला सांगत होतों. काय झालें मोहनमाळेचें?

ताई : मोहनमाळ सांपडली नाहीं अजून.

अवि० : अग, मला कळवायचं नाहीं का?

**शारदा०** : मुली, आणि मोहनमाळेसारख्या साध्या कारणासाठीं तुला माहेरीं पाठवायला आम्ही निष्कांचन का आहोंत ? आम्हीं तुला परत पाठविलें होतें तें तूं आपल्या भावाला पाठीशीं घालत होतीस म्हणून. आणि दडवायच्या गोष्टी त्या कुणापाशीं ? ज्याच्याबरोबर संसार करायचा त्याच्यापासून ? मुली, लग्नांत अंतरपाट बाजूला होतो तेव्हां अंतर संपतें दोन मनांतलें. सात पावलांची सात जन्मांची जोडीदारी करायची ती एकमेकांच्या विश्वासासाठीं. दुसऱ्याचाच काय पण स्वतःचासुद्धां अपराध एकमेकांपासून नाहीं दडवायचा. म्हणून त्या वेळीं तुझ्याविषयीं कळवळा येऊनसुद्धां मीं तुला पाठीशीं घातलं नाहीं, तो माझा अपराध ठरला असता म्हणून.

[ मागें उभे असलेले बाबा येतात. ]

**बाबा** : अगदीं योग्य. अगदीं बरोबर. आपराध्याला पाठीशीं घालणं हा फार मोठा अपराध. आतां लक्षांत आलं. यासाठीं ही परत आलेली आहे, म्हणजे हिला शासन झालं. पिता देऊं शकला नाहीं तें पतीनं दिलं. चांगलं दिलं. असो ! आपण निघालांत सांगलीहून ! हो ना ?

**शारदा०** : हो !

**ताई** : आपण पत्र पाठवलं होतंत बाबा ?

**बाबा** : नाहीं तर आम्हांला कळायचं कसं, तूं परत कां आलीस तें ?

**ताई** : मग मला कां नाहीं विचारलं ?

**बाबा** : तुला काय विचारायचं ? त्यांचा आमचा करार झाला होता ना ? तुझी कांहीं चूक झाली तर त्यांनीं आम्हांला क्षमा करायची ! आम्हीं करार पाळला, त्यांनीं करार पाळला ! किती वेळ झाला आपल्याला येऊन ?

**अवि०** : हें आत्तांच. कपडेसुद्धां नाहीं उतरवले अंगावरचे.

**ताई** : बाबा, जाऊन आलांत पानसरे वकिलांच्याकडून ?

**बाबा** : म्हणजे मीं आपलं मोठेपण तुझ्या सासूच्या कानांवर घालावं म्हणून हा प्रश्न केलास होय ? जा, या लोकांना चहा वगैरे देशील का नाहीं करून ? [ ताई आंत जाते. ]

**शारदा०** : कसलें मोठेपण ?

**बाबा** : आम्हीं आपली केस जिंकली, विश्वनाथ सोमण सुटला. जन्मठेपेंतून.

**अवि०** : विश्वनाथ सोमण सुटला ? अभिनंदन ! म्हणजे आपण कायदा-

बदलायला लावलांत ? [ शारदाबाई आंत जातात. ]

**बाबा :** अन्याय्य कायदा बदलणं हा आमचा पेशाच आहे ! आपचा वकिलीचा पेशा लहानसहान समजूं नका ! इंग्रज सरकारलासुद्धां कायदा बदलायला लावणारा एक मराठी वकील होऊन गेला आमच्या महाराष्ट्रांत. तोंपर्यंत नुसती फांशी होती. मरेपर्यंत फाशी— हँग टिल डेथ— हा शब्दप्रयोग त्रिखंडावर राज्य करणाऱ्या इंग्रज सरकारला लोकमान्यांच्या महाराष्ट्राने शिकविला. विश्वनाथ सोमण सुटल्याचा आनंद त्याच्यापेक्षां मला जास्त झाला. कारण तो निरपराध होता. अपराध्याला पाठीशीं घालण्यासाठीं वकिलीचा पेशा जन्माला आलेला नाहीं. अपराध्याला पाठीशीं घालणं हा झाला वकिलीचा धंदा ! आणि निरपराध्याला पाठीशीं घालणं हा झाला वकिलीचा पेशा ! वकिली हा पेशा असावा, धंदा नव्हे ! डॉक्टरचा पेशा जसा रोगी बरें करण्याचा, औषधांत पाणी मिसळण्याचा नव्हे. तसेंच वकिलीचें. कोर्टांत वकील हा अपराध्यापेक्षां लहान असावा आणि न्यायाधीशापेक्षां मोठा. अरे, कोर्टांत बोलल्यासारखा आज मी घरांतच लागलेंय कीं बोलायला. बरोबर ! ! वकिली परत आली ना, म्हणूनच ती अंगांत आली. चला, आपण आंत जाऊं या सुभाष . . .

**अवि० :** हो ! आल्यापासून ते आम्हांला कुठं दिसले नाहींत ?

**बाबा :** हो, अग ताई, यांचं सामान ने आंत.

( जरा वेळ अंगण मोकळं आहे. बाहेरून पोलिसांच्या शिट्टया ऐकूं येतात. ताई बाहेर येते. सूटकेस उचलते. )

**ताई :** सगळ्यांचं सगळं चांगलं झालं पण आई, माझ्या भाऊचं काय ?

**सुभाष :** ( दारांत उभा राहून ) ताई— ताई—

**ताई :** भाऊ, आलास ! माझा निरोप बाळूनं सांगितला ना ? किती दिवस तुझी वाट बघायची रे ! इतके दिवस होतास कुठं ? जेवत कुठं होतास ? रंगरावच्या हॉटेलांत ? मिळत होती का भाकरी घरच्यासारखी ? किती वाळलायस बघ ! हें बघ, सगळं चांगलं झालं. मोहनमाळ गेली म्हणून असं पळून जायचं ? मी तुझ्यावर रागावेन का कधीं ? हें बघ, मला परत न्यायला आल्या आहेत सासूबाई. हा पेढा घे. बाबांची वकिली सुरू झालीय. तेसुद्धां आज आनंदांत आहेत. नसूं दे मोहनमाळ. मी घालतें सगळ्यांची समजूत.

**सुभाष :** ताई, मीं तुझी मोहनमाळ आणलीय.

**ताई** : आणलीयस ना ? उगीच बोलत असतात तुझ्याविषयीं कांहीं वेडंवांकडं. आतां मी देतें पटवून सगळ्यांना, माझा भाऊ किती चांगला आहे तो. चल बघूं घरांत जेवायला. पाय धुऊन घे.

**सुभाष** : ताई, या घरांतल्या माणसांच्या पंक्तीला बसण्याची माझी योग्यता नाहीं. फार वेळ मला इथं थांबतां येणार नाहीं. पोलीस खालीं उभे आहेत. बाबांना सांगूं नकोस. तीन शिट्ट्यांच्या आंत परत येण्याच्या अटीवर तुमच्या घरांत न येण्याची विनंति त्यांनीं ऐकली. हा घराचा कागद परत बाबांना दे. मीं पोलिसांना सांगितलंय, मी फक्त माझ्या ताईला भेटून येतों, पण तुम्ही घरांत येऊं नका. या घरांत पोलीस आले तर लोक बाबांना काय म्हणतील !

**ताई** : काय सांगतोस भाऊ तूं हें ? काय केलेंस ?

**सुभाष** : चोरी. तुझं नुकसान न व्हावं यासाठीं मी मोहनमाळ शोधत होतों. सांपडली. रंगरावच्याच घरांत ! पण चोर म्हणून मी सांपडलों नाहीं ग ताई ! तर सोन्याच्या सांठ्यासाठीं रंगरावची झडती घेण्यासाठीं आलेल्या पोलिसांनीं त्याचा साथीदार म्हणून मला पकडलें. निव्वळ मी तिथं होतों म्हणून. सुकल्याबरोबर ओलं जळतं तसा मी जळालों. संगत नडली, कुसंगतीची कीड मरते, पण झाड पूर्णपणें पोखरल्यावर, हेंच खरं. रंगरावनं माझी पुरी संगत केली ... शाळेंतून रस्टिकेट होण्यापासून ती तुरुंगांत जाईपर्यंत. ( शिटी वाजते ) ताई, पहिली शिटी झाली. बाबांची वकिली सुरू झाली ना ? बाबांना सांग मला जास्तींत जास्त शिक्षा व्हावी म्हणून प्रयत्न करा. आतां तरी मी या चांगल्या माणसांच्यापासून लांब राहीन. मी दुर्जनांची पर्वा करीत नाहीं. मला सज्जनांची भीति वाटते. मला तुझी भीति वाटते. फांसावर जाणाऱ्या एका मुलानं आपल्या आईच्या मुस्कटांत मारली. हो, ती गोष्ट मला आठवते. ताई, कां मला प्रत्येक वेळीं पाठीशीं घातलंस ? कां माझ्यावर इतकं प्रेम केलंस ? कां माझ्या वाईट गोष्टी बाबांना सांगितल्या नाहींस ? मला तें बरं वाटत होतं. पण तुला माझं बरं कळत नव्हतं का ? ताई, माझी सुधारण्याची इच्छा होती. पण मला संधि मिळत नव्हती. आज मिळाली. कायद्यानं आणून दिलीय. आईजवळ माझ्यासाठीं तूं आशीर्वाद माग. तिकडून येतांना तरी मी सुधारून येईन. आईचा मुलगा म्हणून, तुझा भाऊ म्हणून, बाबांचा लहानपणचा पप्पू म्हणून ! ( शिट्टी वाजते. ) " वाहतों ही दुर्वांची जुडी । " ताई, माझी तेवढी

वही देतेस, उशीच्याखालची ? सज्जनांनीं अनेकदां आपले अनुभव लिहिले असतील, हे दुर्जनांचे अनुभव आहेत. ताई, हा वाल्याकोळी आतां वाल्मीकि होण्यासाठीं चालला आहे.

**मरा मरा म्हणतां म्हणतां वाल्याचा वा।ल्मिकी झाला ।**
**मज म्हणतिल माझेपाठीं, उपजला, बिघडला, गेला ॥**
**चुकलेल्या यात्रेमधला, या चुकल्या यात्रेमधला**
**मीच तो चुकलेला कापडी**
**वाहतों ही दुर्वांची जुडी ॥**

लग्नाच्या वेळीं तूं माझे पाय धरायला आलीस त्या वेळीं मी पाय सोडून पळालों. आज पुढं करतोंय. माझ्या पायां पड. तूं माझी लहान बहीण आहेस. माझा आशीर्वाद घे. तुझं भलं होईल ! ही बदमाषाची भूतदया आहे, हा काळ्या दगडांतला पाझर आहे ! ( तिसरी शिट्टी वाजते. ) ताई, मला गेलं पाहिजे. [ सुभाष जातो. ]

**ताई :** भाऊ, ( तुळशीवृंदावनापुढें येऊन ) आई, कोणी नाहीं आतां त्याचं ! तुझा शब्द मला नाहीं पाळतां आला. आई, आयुष्यांत मी त्याच्या-साठीं कांहींहि करूं शकलें नाहीं. बाबासुद्धां त्याच्याविरुद्ध आहेत. ते त्याला कधींच सोडवणार नाहींत व मी तरी काय करूं ?

[ आंतून बाबा, अविनाश, शारदाबाई येतात. ]

**बाबा :** चिंता करूं नकोस ताई. मी त्याला सोडवणार आहें. मीं सगळं ऐकलंय. भाऊ निरपराध आहे.

**ताई :** हा कागद !

**बाबा :** घराचा— विश्वनाथ सोमणासाठीं काढून ठेवलेली पगडी आज पुन्हां डोक्यावर चढवलीय आणि या पगडीला आजपावेतों अपयश ठाऊक नाहीं. मी आजच भाऊला सोडवणार... एक इच्छा मनांत ठेवून. ( ताई भाऊच्या खाटेजवळ मुसमुसत बसलीय. शारदाबाई जवळ येऊन तिच्या पाठीवरून हात फिरवीत आहेत. बाबा दरवाजांतून बाहेर पडतात. ) ‘ सुसंगति सदा घडो, सुजन वाक्य कानीं पडो !...’

[ आणि इथेंच अखेरचा पडदा पडतो. ]

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
नों. दि.

ग्र. क्रं. ५१९४२५२

IRBK-0119925

**IRBK-0119925**